
॥ श्री गुरुशरणं ॥

नित्यशुध्दं निराभासं निराकारम् निरंजनम् ।
नित्यबोधं चिदानंदम् सद्गुरु त्वम् नमामि ॥



# प.पू. सद्गुरु श्री. सिध्दयोगेश्वर महाराज

एकसष्ठी समारंभ स्मृतिग्रंथ २२-१०-१९८८

# अनुक्रमणिका


प्रास्ताविक ..... 5
बाबांचे अवतार कार्य ..... 8
खरा योगी कोण? ..... 8
बालपणापासून वैराग्यवृत्ती ..... 9
गिरनारचे आकर्षण ..... 10
दत्तात्रयांचे मार्गदर्शन ..... 10
बाबांचे घराणे ..... 12
धर्मानिष्ठ आजोबा ..... 13
आजोबांना दत्तात्रयांनी दिलेली भेट ..... 14
बाबांचे वडील शूर व धर्मनिष्ठ सेनानी ..... 16
वडिलांना आलेला अनुभव ..... 16
बाबांचा जन्म ..... 17
बाबांचे शिक्षण ..... 18
शिक्षण काळांतही तत्व चिंतन ..... 19
मृत्यूबाबतचे विचार ..... 19
साक्षात्कार ..... 20
मला भेटायला ये! ..... 20
चिंतनातून समाधी ..... 21
मुंबईत आगमन ..... 22
प्रत्यदी जगनमातेचे दर्शन ..... 23
मंत्ररहस्य ..... 24
वैवाहीक जीवन ..... 25
साईबाबांचे दर्शन ..... 27
गोरक्षनाथांनी बाबांना व आईना दर्शन दिले ..... 28
सद्गुरू प्राप्ती ..... 31
दिक्षेनंतरचा साघना काळ ..... 33
देवत्व प्राप्ती ..... 35
माईंना आलेले देवी अनुभव ..... 36
आईंना आलेले अनुभव -त्यांच्याच शब्दांत ..... 39


ghagmaharaj.guru

योगीनी अम्मा यांच्या कुटीतील अनुभव ..... 41
नाशिकचा अनुभव ..... 44
एक नवा अनुभव ..... 47
ये, धांवत ये, विठ्ठला ..... 49
"महायोगाचे सामर्थ्य" ..... 50
“एक असाही अनुभव” ..... 53
श्री गुरुकृपा ..... 56
माझी पाठराखीण ..... 61
गुरु माऊलीच्या मंत्राचा माहिमा ..... 63
बाबांच्या मंत्रशक्तीची किमया ..... 65
"आशा" ..... 67
साधनेचा महिमा ..... 68
प्रत्येक जीव परमेश्वर आहे! ..... 70
गुरुविण देव नाही दुजा..... ..... 71
महान अनुभूती ही दिव्य कृपेची ..... 76
"माझं सासर" ..... 78
पुनर्जन्म ..... 79
मोक्षाची गुरुकिल्ली "शक्तिपात योग" ..... 83
आम्ही पायाचे पाषाण! ..... 96
शब्दांच्या पलिकडे ..... 98
कर्मातील प्रेम महत्वाचे! ..... 100
गीतेचे महत्व ..... 101
परिमाण! ..... 102
चक्राचे रहस्य ..... 103

ghagmaharaj.guru

# प. पू. सद्‌गुरु श्री सिध्दयोगेश्वर महाराज
## -: एकसष्ठी समारंभ समिती :-

अध्यक्ष : समाजरत्न डॉ. प्रतापराव वि. माने
कृषी, उद्योग व गृहनिर्माण सल्लागार

उपाध्यक्ष : श्री. कृष्णराव के. नायडू I. A. S.

स्वागताध्यक्ष : ॲड. शशिकांत आ. पवार
अध्यक्ष, मराठा महासंघ

सेक्रेटरी : श्री. नामदेव वा. चव्हाण B. Com. F. C. A.

सहसेक्रेटरी : श्री विजय व. प्रधान
श्री. प्रभाकर म. काजरोळकर B. A. (Hons)

खजिनदार : श्री. सुरेश ब. सावंत

सहखजिनदार : श्री. मधुकर शि. कदम
श्री उमाकांत अ. सावंत

-: सदस्य :-

डॉ. राजन भा. गायकवाड M. B. B. S.
श्री. खेतशी खि. पटेल (उद्योगपती)
श्री. अशोक दा. राऊत
श्री. मुरलीधर ना. नलगे
श्री. शंकर सि. आवळे
श्री. सुहास द. सावंत
श्री. शशिकांत रा. घाग
श्री. दिनकर ह. सोनारिकर
श्री. नरसिंह ता. नाईक
श्री. दामुअण्णा ता. कुळकर्णी

श्री. आप्पासाहेब शं. सरनोबत B. E. (Civil)
श्री. सुंदरशेठ रा. टाकळे
श्री. प्रल्हाद पु. गोडगे
श्री. रमेश ग. पावसकर
श्री. प्रकाश दि. देशपांडे
श्री. सुरेश ह. धर्माधिकारी
श्री. विनायक स. लाड
श्री. उदय र. नाटेकर
श्री. विठ्ठल ल. काकड
श्री. गजानन ज. माने

— समस्त साधक बंधु —

## प्रास्ताविक

डॉ. प्रतापराव विष्णुराव माने

सामान्य माणसाला आयुष्यात दशकांचे उंबरठे ओलांडत बालपणापासून किशोरावस्था, तारूण्य, सांसारिक जीवन, मध्यमवयीन अवस्था, मुलांचे शिक्षण लग्न आदि जबाबदारी ते निवृत्तीपर्यंत पोहचल्यावर, एकसष्टी साजरी करताना, कृतार्थ जीवन जगल्याचा आनंद आणि समाधान लाभतं. जीवनातील तो एक महत्वाचा टप्पा असतो. यश अपयश हे नेहमी तुलनात्मक असतं अन् मानण्यावरहि अवलंबून असतं. परंतु लाखो व्यक्तिंमध्ये प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा इतिहासावर उमटवून ठेवणाऱ्या व्यक्ति हरेक पिढीत जन्माला येतात पण अशा व्यक्ति मोजक्याच असतात.

असामान्य अशा या आगळ्या व्यक्तिंकडे कुणी नेता म्हणून आदरानं पहातं तर कुणी गुरू म्हणून श्रद्धेच्या भावनेनं मान देतं. सदाचार अन् सदविचार, सत्य अन् न्याय, निती, प्रेम, शांती, आनंद, सुख, मानवता, आत्मशोध, आमरण प्रभुचरणी अन् पर्यायाने गुरुचरणी लीनता, आत्मविकास या सर्व मूल्यांची जोपासना वाढ करायचं शिक्षण याच गुरूंनी समाजाला दिलं आहे. असे हे गुरू वतीत असतात. काल अन् पंचागानुसार वर्ष, हे त्यांच्या दृष्टीनं नगण्य असतं. परंतु त्यांच्या शिष्यांच्या, साधकांच्या दृष्टीने तो एक सोहळा असतो. गुरुंची एकसष्टी साजरी करणे म्हणजे समाजाने आपली श्रध्दा व प्रेम व्यक्त करणे, ऋण फेडणे अन् असंच मार्गदर्शन चिरंतन लाभो अशी प्रार्थना करणे होय.

प. पू. सिद्धयोगेश्वर महाराज यांच्या एकसष्टीनिमित्त आयोजित केलेल्या या शुभप्रसंगी ही स्मरणिका प्रकाशित केली जात आहे. "बाबा" म्हणून नावाने आधिक लोकप्रिय असलेले महाराज जन्माने श्री वसंतराव घाग. अर्थात् त्यांचा आणि माझा परिचय असाच झाला. त्यांची मुलगी चि. सौ. अनिला ही माझी सून. माझा धाकटा मुलगा चि. शेषराज याची पत्नी म्हणजे व्यावहारिक नात्याने श्री. वसंतराव व मी व्याही व्याही. एक निकटचा नातेवाईक, जवळ जवळ समवयस्क, त्यांच्या असंख्य साधकांपैकी किंवा शिष्यवर्गातील नासूनहि बौध्दिक पातळीवर विशिष्ट विषयांसंबंधी त्यांच्याबरोबर चर्चा करण्यात आनंद मानणारा, त्यांच्या मुलांजावयांप्रमाणे त्यांना "पप्पा" म्हणून हाक मारणारा आज या त्यांच्या एकसष्टीनिमित्त "जीवेत् शरदः शतम्" अशी शुभेच्छा व्यक्त करीत आहे.

चमत्कार करणारे अन् आपल्या नादी लावणाऱ्या "महाराज" "स्वामी" आणि "बाबा" अशांची संख्या बोकाळल्याने आजची सुशिक्षित तरूण पिढी, विज्ञानाचा विद्यार्थी, अध्यात्म वा योग किंवा साधना या शब्दांकडे उगीचच शंकेखोरपणे बघतात. टोकाची भूमिका घेऊन अंधश्रध्दा निर्मूलन करायला निघालेली माणसे श्रध्देवेर घाला घालायला सज्ज झाली आहेत. घरात कोळीष्टके झाली म्हणून ती

ghagmaharaj.guru

काढायला हवी व घर साफ करायला हवं. घर पाडून टाकणं हा त्यावरील उपाय नव्हे. अध्यात्म म्हणजे काय याचं प्राथमिक ज्ञानहि न मिळविण्याचा प्रयत्न जर झाला नाही तर दुसरं काय अपेक्षित आहे म्हणा.

योगायोग म्हणून एक गंमत आठवते. आमचं घराणं, मी, पत्नी, सर्व मुलं उच्चशिक्षित, महाराष्ट्राबाहेर दिल्लीसारख्या ठिकाणी राहिलेली, परदेश पर्यटन झालेलं. लोकांच्या दृष्टीने राहणीमान किंचित् पाश्चात्य अशा परिस्थितीत अध्यात्मिक मार्गात असलेल्या घाग घराण्यातील चि. अनिला विज्ञाननिष्ठ मानेंकडे कितपत मोकळेपणाने वावरू शकेल, तिचा कोंडमारा तर होणार नाही ना अशी कांही साधकांना शिष्यांना आलेली प्रामाणिक शंका. अर्थात् शेषराज-अनिलाच्या सुखी संसाराने व आमच्या माने कुटुंबात प्रत्येक व्यक्तिला संपूर्ण विचार स्वातंत्र्य असल्याने या प्रश्नाचे उत्तर सर्वाना समाधानकारक मिळाले आहेच. पण त्या विशिष्ट समयी अध्यात्मिक प. पू. सिद्धयोगेश्वर महाराज यांच्या विचारसरणीचे व अध्यात्म-विज्ञान यांच्या परस्पर संबंध नव्हे एकात्मतेविषयक ज्ञानाच्या आकलनाचे दर्शन त्यांच्याशी बोलण्यात मला झाले.

मी स्वतः भक्तिमार्गी नसून ज्ञानमार्गी आहे. पत्नी संपूर्णतः भक्तिमार्गी आहे व तिचा पूजाअर्चा अशा कर्मकांडावर प्रखर विश्वास आहे. समाजात आणि कुटुंबात कांही नियम पथ्ये पाळावी लागतात. ती मी पाळतो. कारण जीवन ही तडजोड आहे. ईश्वर म्हणजे काय ही संकल्पना निरनिराळ्या दृष्टीकोनातून मांडण्याचा यत्न मी अनेक वर्षे करत आहे. वैज्ञानिक दृष्टीकोनातून ईश्वराची व्याख्या म्हणजे ती एक उर्जा-प्रकाशउर्जा होय असे मी मानतो.

अध्यात्म आणि विज्ञान यात संघर्ष असल्याचा एक गैरसमज आपण करून घेतला आहे. वास्तविक ही दोन्ही बऱ्याच वेळा एक तरी असतात किंवा पूरक असतात. अध्यात्म ईश्वराचा शोध मानसशास्त्रीय मार्गाने घेत असते तर विज्ञान शास्त्रीय उपकरणांद्वारा. एकात मनःचक्षूचा उपयोग होतो तर दुसऱ्यात चर्मचक्षंचा. अध्यात्माने मानवाची भौतिक प्रगती होत नाही हे खरे आहे तसेच विज्ञान मानवाला मानसिक शांती देऊ शकत नाही. प्रत्येकजण संत तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर, चैतन्य, मीरा होऊ शकणार नाही आणि सर्व संगपरित्याग करणार नाही. त्यागाची प्रेरणा अध्यात्मिक विचारातच सापडेल. पण व्यावहारिक स्पर्धात्मक जगात तरूण पिढीला हे रुचणार नाही.

मानवाची भौतिक आणि मानसिक दोन्ही आघाडयांवर प्रगती हवी मगच वैयक्तिक शांती व सुख आणि सामूहिक सामंजस्य व सहकार्य निर्माण होईल. वेदांनी काय सांगितले पहा :-

सर्व खल्विदं ब्रम्ह - "छादोग्योपनिषद"
हे सारे जे आहे ते ब्रम्ह आहे, मग पुढे पहा :

अहं ब्रम्हास्मि - "याज्ञवल्क्य."
मी ब्रम्ह आहे. आता याचेंच दुसरे रूप पहा :

तत्वमसि - "भगवदगीता"
तू तेंच आहेस म्हणजे तूंच ब्रम्ह आहेस.
आणि शेवटी खऱ्या ज्ञानाचा आग्रह धरत याज्ञवल्क्य बजावतो - विज्ञानानंदम म्हणजे ब्रम्ह
विज्ञानाचा आनंद म्हणजे ब्रम्ह.
विज्ञान म्हणजे काय तर ब्रम्ह जाणून घेणे.

संपूर्ण विश्वाच्या एकतेचा संदेश आपल्या वेदांनी आणि गीतेने दिला. ज्याला आपण फक्त अध्यात्मिक भूमिकेतून बघतो त्या या संदेशातून सांगितलं आहे की हे जे सर्व आहे, तू स्वतः, तुझ्या सभोवतालचं विश्व, ते सर्व काही तू जाणून घे आणि तेच विज्ञान होय.

साधकांना माहित आहे की आपल्या दोन भुवयांच्या मध्ये किंचित् वर जो बिंदू आहे तेथे "आज्ञाचक्र" असते. आतां हे योगाचे थोतांड म्हणणाऱ्यांनी जरा वैद्यकीय शास्त्राचा संदर्भ पहावा. येथे आंत मेंदूच्या खाली असते एक ग्रंथी जिचे नांव आहे "पिनिअल". भगवान श्री शंकराचा तिसरा नेत्र दाखविला जातो ते हे स्थान. एकेकाळी ही ग्रंथी वर पृष्ठभागावर होती परंतु उत्क्रांती झाली तशी ती कपाळाच्या आंत गेली. योगायोग व गंमत नव्हे पण सत्य असे की ही ग्रंथी रचनेत आपल्या दोन डोळयांप्रमाणेच आहे आणि एके काळी ती आपल्या डोळ्यांप्रमाणेच कार्य करीत असावी असे मेरीलँडच्या दोन अमेरिकन वैज्ञानिकांनी १९८६ साली लिहिले आहे.

आज जगात अध्यात्मात पुढे गेलेल्या देशांमध्ये तिबेट, भारत अशा अशियाई देशांचा समावेश आहे. आपण विज्ञानाची कास धरून २१ व्या शतकाकडे झेपावत आहोत. अशा वेळी आपली संस्कृती, परंपरा यांना न विसरतां जुन्या शास्त्रांचा नवीन वेज्ञानिक दृष्टीकोनातून उपयोग करून आपल्याला पुढे जायचे आहे. सामान्य माणसाला आज शाळा विद्यापीठातून विज्ञान शिक्षण उपलब्ध आहे. पण अध्यात्म मार्गातील जाणते गुरू मात्र नाहीत. श्री वसंतराव घाग उर्फ आमचे "पप्पा" आणि आपल्या सर्वाचे बाबा यांनी शक्तीपात दीक्षा देऊन समाजातील गुणीजनांना आत्मविकासाचा मार्ग दाखविला आहे. त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो अशी पुनश्च एकदां शुभेच्छा.


## बाबांचे अवतार कार्य

ना. बा. चव्हाण
बी. कॉम., एफ. सी. ए., एस. ई. एम.



नदीकाठी असलेल्या गर्द वनराईत पर्णकुटी उभारून, किंवा बर्फाच्छादित पर्वतराजी हिमालयाच्या गुहेंत सर्वसंग परित्याग करून, अहोरात्र, अत्यंत कठिण अशी तपःश्चर्या करून, आत्मसाक्षात्कार करून घेतलेल्या अनेक सत्पुरूषांची चरित्रें, आपल्या वाचनात येतात. त्याचप्रमाणे संसारांत येणाऱ्या अनंत अडचणींना, मोठया धैर्याने तोंड देवून, परमेश्वरी साक्षात्कारांचे उच्चतम ध्येय साध्य केलेल्या, परमपुरुषार्थी योग्यांची चरित्रे आपण वाचतां. या व्यवहारी जगतातील सर्व सामान्य जनांचा, उपक्षेने त्याग करून, त्या सर्वापासून दूर एकांतात रहाणाऱ्या परमेश्वर प्राप्तसाठीं योग साधना करणाऱ्या योग्यांपेक्षाही परमात्म्याने निर्माण केलेल्या या जगांत, प्रारब्ध कर्मानुसार प्राप्त झालेल्या या संसारातील सुख:दुखाचे आघात, मोठ्या धैर्याने सहन करून शम (मनोनिग्रह), दम (इंद्रियावरील ताबा), शौच (अन्तरबाहय पवित्रता), क्षमा, नम्रता, ज्ञान, विज्ञान, अस्तित्व या स्वाभाविक कर्माचे मोठया निश्चयात्मक बुध्दीने पालन करून सर्व कर्मे, त्या जगन्नियंत्या परमात्म्याच्या संतोषासाठी आपण करीत आहोत, असे मानून त्या सर्व कर्माचे फळ, त्याच्याच चरणी अर्पण करून त्याच्या प्राप्तिसाठी साधना करणारा योगीच श्रेष्ठ होय.

## खरा योगी कोण?



सर्वसाधारण लोकांची संन्यासी, योगी, म्हणजेच दाढी- जटा वाढलेला, अंगावर भगवी वस्त्रे धारण केलेल्या व जन सामान्यांपासून दूर रहाणारा तो योगी, अशी कल्पना असते. परंतु परमेश्वर प्राप्तिसाठी, योग्याने संन्यास घेऊन, जनता-जनार्दनापासून दूर राहिलेच पाहिजे असे नाही. वास्तविक आपल्या वैयक्तिक समाधानासाठी दूर राहाणारा योगी आपला स्वतःचा उत्कर्ष करून घेण्यासाठी अर्धोन्मिलीत दृष्टी ठेवून योग साधनेत गढलेला असतो. अशावेळी तो भौतिक कर्मे सोडून, स्वार्थी तृप्तीच्या एकाच इच्छेने वेडा झालेला असतो. पण संसारात राहून ज्ञान साधना करणारा योगी, इतरे-जनांचे काहिहि होवो, परंतु कोणत्याही प्रकारे आपलाच वैयक्तिक उत्कर्ष होवून, आपल्याच परमेश्वरप्राप्तीचे, उच्चतम ध्येय प्राप्त व्हावे, अशा

ghagmaharaj.guru

प्रकाराचा स्वार्थी हेतू ठेवीत नाही, ज्या परमेश्वराने जन्माला घातले आहे, त्यानेच आपल्यासाठी कर्मेही निर्माण केलेली आहेत, असे तो मानतो. परमेश्वराला प्रिय वाटतील अशा प्रकारे कर्मे करून, भक्तियुक्त अंतःकरणाने त्याच्या प्राप्तिसाठी प्रयत्न करीत असतो. तोच पुरूष खरा योगी होय.

*अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः |*
*स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः*
*|| भ. गी. अ. ६ ||*

कर्म फलाच्या इच्छेचा त्याग करून, जो आपले कर्तव्य समजून कर्म करतो, तो संन्यासी आहे व योगीही आहे. निष्क्रिय यज्ञादी भौतिक कर्माचा त्याग करून रहाणारा संन्यासी-योगी नव्हे!

संन्यास घेवूनही जर त्याच्या ठिकाणी कर्मफलाची इच्छा असेल, तर तो केवळ वेष धारण करण्याने कोणीहि योगी होवू शकत नाही. जो योगी होवूं इच्छितो, जो परमात्म प्राप्तिच्या आत्यंतिक तळमळीने योगारूढ होण्याचा अभिलाषी आहे, अशा भक्ताने भगवंताने सांगितलेल्या वरील श्लोकांप्रमाणे कर्म करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे आत्मसाक्षात्कार प्राप्त करून घेतलेले प. पू. सद्गुरु "श्रीसिध्दयोगेश्वर महाराज" हे प्रत्यक्ष उदाहरण आहे.



## बालपणापासून वैराग्यवृत्ती

तसे पाहिलें तर बालपणापासूनच महाराजांच्या ठिकाणी वैराग्यवृत्ति नांदत होती. संसार, तसेच लोकसंग्रह त्यांना प्रिय वाटत नव्हता. प्रारब्ध कर्मानुसार प्राप्त झालेले भोग भोगूनच संपवावयाचे, हया वृत्तीनेच ते संसार करीत होते. नोकरीत असतानासुद्धा कामावर जातायेता, सतत आत्मचिंतनात मग्न असत. घरी आल्यावर ध्यानधारणा चालत असे. संसार चालला होता, परंतू त्यांत त्यांचे मन रमत नव्हते. संसारातील क्षण-भंगुरतेचा जसजसा त्यांना अनुभव येऊ लागला, तसतसे दिवसें-दिवस परमेश्वर प्राप्तिसाठी संसार सोडून जाण्याचे विचार त्यांच्या मनात येऊन ते अस्वस्थ होऊ लागले. ऑफिसमधून सुटल्यावर समुद्रकिनारी किंवा मुंबईबाहेर कसलीहि वर्दळ नसलेल्या जागेत, एकांतात राहू लागले. चिंतनातून ज्यावेळी ते भानावर येत तेव्हांच ते घरी परतण्यासाठी निघत, मग ती वेळ केव्हां रात्री एक वाजलेली असायची किवां दोनची असायची. कित्येकदा तर सर्व रात्रभर ते आत्मचिंतनासाठी बाहेर राहून सकाळी घरी परतायचे. इथें घरची माणसें रात्रभर वाट पाहत, काळजी करत. सौ. माई म्हणजे महाराजांच्या पत्नी, महाराज जेवल्याशिवाय स्वतः

त्या अन्नाला स्पर्श करीत नसत. त्यामुळे त्यांना अनेकदा उपवासहि घडत असत. व रात्र रात्र महाराजांच्या येण्याकडे डोळे लावून वाट पहात असत. दिवसामागून दिवस जात होते. महाराजांच्या अंतरीची तळमळ वाढतच होती. आपल्याला या जन्मातच जर परमेश्वराचे दर्शन झाले नाही तर? या नकारात्मक विचाराने ते बेचेन होत. या वासनामय संसारांत राहून, जन्ममरणाच्या यातायातीतून आपली सुटका होणे असंभवनीय आहे असा त्यांचा पक्का निश्चय झाला होता.



## गिरनारचे आकर्षण

लहानपणी शाळेंत असल्यापासूनच महाराजांना हिमालय व गिरनार या पर्वतांविषयी विलक्षण आकर्षण वाटे. या गिरीराज पर्वतांच्या गुहांमध्ये एकांतात परमेशवरप्राप्तिसाठी ध्यान धारणा करणारें महान योगी रहातात. हा देह सोडून मुक्त झालेले महात्मे सुध्दा, साधकांला त्यांच्या मार्गात उन्नती करण्यासाठी, अदृष्य रूपाने किंवा मानवी देह धारण करून सर्वतोपरी मार्गदर्शन करतात, असे त्यांना ऐकून माहित होते. तेथे गेल्यास आपली व महान सिध्द पुरुषांची गाठ पडून, आपले इच्छित साध्य होईल, असे त्यांना वाटू लागले. दिवसामागून दिवस जात होते, तसतसे या एका विचारानेच त्यांचे मन घेरले जावून ते अस्वस्थ होऊ लागले. गुरू प्राप्तिसाठी त्यांचा जीव तळमळू लागला, एक दिवस त्यांनी सर्वस्वाचा त्याग करून, घराबाहेर निघून जाण्याची आपल्या मनाची तयारीही केली होती. आपल्या पत्नीच्या नांवे एक चिठ्ठी लिहिली की, "मी ईश्वरप्राप्तिसाठी घराबाहेर निघून जात आहे. माझा कोणत्याही प्रकारे शोध घेण्याचा प्रयत्न करु नये. तुमच्या उदरनिर्वाहाची काळजी तो शक्तिमान दयाधन प्रभू निश्चित घेईल. तुम्हांला काहिही कमी पडूं देणार नाही. जर तुम्ही गांवी गेलांत, तर आपल्या जमिनीतून येणाऱ्या उत्पन्नावर तुमच्या उदरनिर्वाहाची सोय उत्तम प्रकारे होवू शकेल" ही चिठ्ठी लिहून, ती सौ. माईंच्या उशाखाली ठेवून दिली होती.



## दत्तात्रयांचे मार्गदर्शन

त्या दिवशी नेहमीप्रमाणे रात्री दोनच्या सुमारास ध्यानाला बसले. थोडयाच अवधीत त्यांचे देहभान नष्ट होवूंन बाहय संवेदना लुप्त झाल्या, अशा स्थितीमध्ये ध्यानाच्या गूढ अवस्थेमध्ये त्यांना एक दृश्य दिसूं लागलें. ज्या खोलीत ते बसले होते, त्या खोलीमध्ये निळसर रंगाचा मंद मंद प्रकाश पसरला. त्या शांत आणि मनाला धुंद करणाऱ्या

निळसर प्रकाशांत एक तेजस्वी ज्योत दिसूं लागली. ती ज्योत हळू हळू मोठी होऊं लागली. मोठी होत असतानाच त्या दिव्य ज्योतीमध्ये "भगवान दत्तात्रयांचे" दर्शन होवू लागले. "तीन शिरें, सहा हात" तोंडावर असिम तेज - अशा भगवान दत्तात्रयांनी दर्शन देताच, महाराजांच्या ठिकाणी असणारे अष्ट सात्त्विक भाव उफाळून त्यांच्या नेत्रांतून अश्रूधारा वाहूं लागल्या. श्रीदत्तात्रयांचे दोन्ही चरणकमल आपल्या हातांनी घट्ट धरूनं त्यावर मस्तक ठेवले. नेत्रांतून वाहणाऱ्या अश्रूंनी (साश्रु नयनांनी) भगवंतांचे चरण धुतले, थोडयाच वेळांत भगवंतांनी आपल्या दोन्ही हातांनी महाराजांना उठवून जवळ घेतले व आपल्या हृदयाशी घट्ट धरून दृढ आलिंगन दिले, महाराजांचे कपाळाचे अवघ्राण केले. व विचारले "संसार सोडून पळून जाण्याचा विचार आहे का? पण लक्षांत ठेव पूर्वकर्मानुसार लाभलेल्या या संसारातून पळून जाणे हे भ्याड वृत्तिचे लक्षण आहे. जर मला-परमपुरुषाला भेटावयाचे असेल तर योगमुक्त होऊन सर्व कर्माचे फळ मला अर्पण करून कर्म करीत रहा. आत्मस्थिती प्राप्त होण्यासाठी सर्व वासनांचा क्षय करून, या व्यवहारी जगांत अनासक्त भाव ठेवून, माझे सतत चिंतन करीत कर्तव्य कर्म करीत रहा. ही माझी आज्ञा मानलीस तरच तुला परममोक्षपद प्राप्त होईल." भावनावेगामुळे महाराजांच्या तोंडून शब्दही उमटत नव्हते. ते फक्त भगवान श्रीदत्तात्रयांच्या दैदिप्यमान सुंदर मुखकमलांकडे पहातच राहिले. महाराजांच्या नेत्रातून सारख्या अश्रुधारा वहात होत्या. भगवानांनी आपला सुकोमल हस्त महाराजांच्या मुखावरून फिरवीत विचारले "तुझ्या मनांत काही मागावयाचे आहे काय?" त्यावेळी महाराजांनी एकच मागणे मागितले की, "भगवान् या भवगसागरातून सुखरूप तारून नेवून, तुझ्या सत्य स्वरूपाचे दर्शन देवून घडवून देईल अशा महान सद्गुरूंची प्राप्ति व्हावी." भगवंत आपल्या धीरगंभीर आवाजांत म्हणाले की, "या संसारातच ज्ञानसाधना व योगसाधना करीत रहा योग्य वेळ येताच, इथेच तुझ्या इच्छेप्रमाणे गुरुंचा लाभ होईल." तत्काळ महाराजांनी प्रभू दत्तात्रयांचे पाय धरून विनवणी केली की, "मला कशातच स्वारस्य वाटत नाही, त्याचबरोबर काय करावे तेही कळत नाही, म्हणून आपण सतत मार्गदर्शन करावें व आपल्या सत्य स्वरूपाचे दर्शन होवून "आत्मसाक्षात्कार होईल असा आशिर्वाद द्यावा." भगवान दत्तात्रय "तथास्तु" म्हणाले व अंतर्धान पावले.

अशा प्रकारच्या प्रसंगामुळे गुरुच्या शोधासाठी संसाराचा त्याग करण्याचा विचार महाराजांना सोडावा लागला, कारण भगवान श्री दत्तात्रयांची तशी आज्ञाच होती. मुमूक्षू जनांना मार्गदर्शन करण्याची भगवान दत्तात्र्यांची किर्ती त्यांच्या परम भक्तांना माहितच आहे. "दत्त" म्हणताच हजर राहून आपल्या भक्तांचे तारण करणारा म्हणून आपण सर्व त्यांना "दत्तात्रय" म्हणतो. भगवान दत्तात्रयामुळेच सर्वांची सुखः दुखे जाणून घेणारे, दुःखाचे निवारण करणारे महाराजांसारखे सिद्ध पुरूष आपणास लाभले आहेत.

संसारात राहून सर्व साधक पुत्राचे व दुःखाने पिडित होऊन आलेल्या प्रत्येक दुःखी जीवाचे कल्याण करण्यासाठी, खुद्द भगवान श्री दत्तात्रयच महाराजांच्या शरीरांत वास करीत आहेत. याचा प्रत्यय सर्व साधकांना, तसेच भक्ति व श्रध्दापूर्वक येणाऱ्या प्रत्येकाला आलेला आहे.

महाराजांचे सर्व जीवन चरित्र इतर महान सिध्द पुरुषांप्रमाणेच वैचित्र्याने भरलेले आहे. अगदी बालपणापासून त्यांना अज्ञाताची ओढ लागून राहिलेली होती.

*प्राप्य पुण्यकृतां ल्लोकनिषुत्त्वा शाशवतीः समा |*
*शूचीनां श्रीमंता गेहे योग भ्रष्टो भिजायते ||*
*|| भ. गी. ६.४ ||*

अथवा

*योगिनामेव कुले भवति धिमताम |*
*एतद्धि दुर्लभतरं लोक जन्म यदीद्दशम*
*|| भ. गी. ६.४२ ||*

पूर्व जन्मांत अनेक वर्षे योगाभ्यास केलेला योगी, योगभ्रष्ट झाल्यास, त्याला मृत्यूकनंतर, परमेश्वराच्या राज्यांत ज्या ठिकाणी पुण्यवंत लोकांना प्रवेश दिला जातो, त्या उच्च कोटीतील लोकांत प्रवेश मिळतो. त्या ठिकाणी अनंत कालपर्यन्त आपले जीवन व्यतीत केल्यानंतर, परत तो मृत्यूलोकांत, पुण्यवंत श्रीमंत कुळांत जन्माला येतो, किंवा ज्ञानवान योग्यांच्या कुळांत जन्माला येतो. खरोखर अशा प्रकारचा जन्म या लोकी मोठा दुर्लभ आहे. वरील गीतेंतील श्लोकांप्रमाणे महाराजांचा जन्म अशाच श्रीमंत व शुध्दाचरणी, ज्ञानवान कुळात झाला.

## बाबांचे घराणे



महाराजांचे घराणे अगदी पूर्वापार पासूनच ईश्वर भक्ति व जनसामान्याची सेवा करण्याविषयी प्रसिध्द होते. रावजी हे महाराजांच्या पणजोबांचे नांव. ते एक महान धन्वंतरी होते. त्यांच्या घरी आध्यात्मिक ओढ असलेल्या अनेक मुमूक्षूंची वर्दळ असे. त्याचप्रमाणे साधनेत उच्चतम अवस्था लाभलेले सिध्द योगीही त्यांच्या घरी येत असत. घरांत

नेहमीच आध्यात्मिक चर्चा व नाम-संकिर्तन चालूं असे. आजूबाजूच्या गावांतील तसेंच दूरदूरच्या लोकांना "रावजीराव" हे रोगांचे अचूक निदान करून औषधोपचार करीत. हे माहीत असल्यामुळे, श्रीमंतापासून ते दिनदुबळयापर्यंत, व्याधीने जर्जर झालेले, अनेक लोक त्यांच्याकडून औषधोपचार करून, व्याधिमुक्त होण्यासाठी येत असत. अशा लोकांवर मोफत औषधोपचार केला जात असे. व्याधीग्रस्त लोकांची सेवा करण्याचे त्यांचे व्रतच होते. त्याच प्रमाणे त्यांचे दुसरे एक विलक्षण व्रत होते. त्यांच्या जेवणाच्या पंक्तिला कोणीतरी अतिथी आवश्यक असे, तो जर नसेलच तर रस्त्यावरून जाणारा कोणीही वाटसरू सुद्धा चालत असे. ज्या दिवशी पंक्तिला कोणीच मिळाले नाही तर त्यांना उपवासही घडत असत, परंतु असा प्रकार क्वचित घडे.




## धर्मानिष्ठ आजोबा

पणजोबांच्या निर्वाणानंतर महाराजांच्या आजोबांनीही तोच वारसा चालविला. त्यांची दिनचर्या रोज ठरल्यासारखी होती. पहाटे उठून नित्य नैमित्तीक कर्मे आटपून, देवपूजा, ग्रंथवाचन, ध्यान-धारणा झाल्यावर, गडी माणसांना शेतांतील कामाची माहिती देवून कामावर पाठविले जात असे. त्याच प्रमाणे त्यांच्या वडिलांनी, नाडी परिक्षा करून कशा प्रकारे औषधोपचार करावा? यांची संपूर्ण महिती त्यांना दिली असल्यामुळे येणाऱ्या व्याधिग्रस्त लोकांवर उपचारहि करावे लागत. रात्रौ जेवण झाल्यावर गावांतील आजूबाजूच्या वाडीवरून अध्यात्माची ओढ असलेले लोक, परमात्म ज्ञानाविषयी चर्चा करण्यासाठी येत. केव्हां केव्हां या चर्चा इतक्या रंगत असत कि रात्रीचे १/२ केव्हां वाजत ते कळतही नसे. आजीने सकाळच्या कामाबद्दल आठवण केल्यावरच, चर्चा थांबवून लोक आपआपल्या घरी जात. आठवडयातून प्रत्येक सोमवार, गुरुवार व शनिवार हे तीन दिवस, त्याचप्रमाणे महिन्यांतून येणाऱ्या दोन्ही एकादशीना रात्री भजनाचा कार्यक्रम होत असे. त्यावेळी एखाद्या अभंगावर प्रवचन होई. संपूर्ण चातुर्मासांत ग्रंथाचे वाचन होत असे, ते ऐकण्यासाठी रोज भाविक लोक जमा होत. अशा प्रकारे दिनक्रम चालूं होता.

महाराजांच्या आजोबांना चार मुलगे होते. तेही या त्यांच्या धार्मिक कृत्यांत मदत करीत. या चारही मुलांवरती भक्तिचे संस्कार घडत होते, व त्यांत ती चारही मुलें रमून जात होती.

ghagmaharaj.guru

## आजोबांना दत्तात्रयांनी दिलेली भेट



कोकणासारख्या आपल्या स्वतःच्या शेतीत आजोबा ऊसांची लागवडही करीत होते. प्रत्येक वर्षी गुऱ्हाळ लावून ऊसाच्या रसापासून गुळ तयार केला जात असे. एके दिवशी असेंच रस काढण्याचे काम चालूं होते. इतक्यात दहाबारा संन्यासी-साधू पाणी पिण्याच्या निमित्ताने घरी आले. आजोबांनी त्यांचे स्वागत करून, बसण्यासाठी आसन दिले व "काय इच्छा आहे असे विचारले", त्या साधूपैकी जे मुख्य होते त्यांनी पाणी पिण्याची इच्छा दर्शविली. पाणी देण्यांत आले, व त्याचबरोबर गुळ तयार करण्यासाठी काढलेल्या रसांतून पिण्यासाठी यथेच्छ रसहि देण्यांत आला. संन्याशाच्या मुखावरील तृप्तीचे समाधान पाहून आजोबांना आनंद झाला संन्याश्यांच्या प्रमुखाने आजोबाकडे प्रसन्नतेने पाहून, तुझ्या घराण्याची कीर्ती सर्वत्र होईल. तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील असा आशीर्वाद दिला व त्यांना सांगितले कि "मार्गशिर्ष महिन्याच्या सप्तमीला" पूर्णत्वाला गेलेले एक महान योगी येतील, तेव्हां तुला जे पाहिजे असेल ते त्यांच्याजवळून मागून घे. आम्हां सर्वांचे आशीर्वाद तुझ्या घराण्यावर रहातील", असे सांगून ते सर्व संन्यासी निघून गेले. आजोबांना अत्यंत आनंद झाला व संन्याशांनी सांगितलेल्या दिवसाची ते वाट पहात राहिले.



तो दिवस जवळ आला परंतु का कुणास ठावुक? त्याच दिवशी काही तांतडीच्या, सरकारी कामानिमित्त, आजोबांना तालुक्याच्या सरकारी कचेरीत जावे लागले. त्यांचे तिन्ही मुलगे नोकरी निमित्त बाहेरगांवी गेले होते. सर्वात लहान चिरंजीवच फक्त शेतीवाडीवर देखरेख ठेवण्यासाठी गांवी आजोबांजवळ रहात होते. आजोबांनी जाण्यापूर्वी घरांतील सर्व माणसांना येणाऱ्या महात्म्याचे योग्य प्रकारे आदरातिथ्य करण्यास बजावले व "मी संध्याकाळी परत येईन" असे सांगून तालुक्याला निघून गेले. मार्गशिर्ष माहेन्याची त्या दिवशी सप्तमी होती. संध्याकाळी सूर्य पश्चिम क्षितीजावरून नुकताच अदृष्य झाला होता. तोच भगवे वस्त्र धारण केलेले एक योगी दरवाजांत येवून उभे राहिले. अगोदरच कल्पना होतीच. आजी व लहान चिरंजीव वाट पहातच होते. आल्या आल्याच दरवाजाबाहेर उभे राहूनच ते योगी आजोबांची चौकशी करू लागले. आजी व धाकटया चिरंजीवांनी दरवाजांत उभे राहून चौकशी करणाऱ्या योग्याच्या चरणावर पाणी ओतून त्यांचे चरण धुतले व साधू महाराजांना घरांत घेवून योग्य आसनावर बसविले. घरांतील सर्वांची एखाद्या परिचिताप्रमाणे साधू महाराजांनी चौकशी केली. घरातील सर्वांना आजोबांची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवू लागली. सर्वांचे डोळे त्यांच्या येण्याच्या वाटेकडे लागले होते रात्र पडू लागली संन्याशी आसनावरून उठले व त्यांनी स्नानासाठी विहिरीवर जाण्याची इच्छा

Copyright © ghagmaharaj.guru

ghagmaharaj.guru@gmail.com

दर्शविली. ते नेहमी, त्रिकाल थंड पाण्यानेचे स्नान करीत असे त्यांच्या बोलण्यावरून समजले. ते विहिरीवर गेले व स्नान करून परत आले. विहिरीच्या जवळच दोन औदुंबराचे वृक्ष होते. अजूनही ते वृक्ष आहेत. तेथे मला बसावयाचे आहे. असे म्हणून ते त्या वृक्षाजवळ गेले. त्या ठिकाणी त्यांना आसन घालण्यांत आले. त्यावर ते बसले, व एक समई आणण्यास सांगितली. त्या समईच्या मंद प्रकाशांत ते ध्यानमग्न अवस्थेत बसले. इकडे आजोबांना येण्यास जसा जसा उशीर होत गेला तस तशी घरांतील सर्व माणसांना काळजी वाटू लागली. रात्रीचा पहिला प्रहर उलटून गेला, सर्वांनी आजोबांची येण्याची आशा सोडून दिली. उद्या सकाळी येतील अशी मनाची समजूत करून स्वस्थ राहिले. योगी ध्यानातून उठण्याचे चिन्ह दिसेना. ते समाधि अवस्थेतून जागृतावस्थेंत येण्याची वाट पहात बसणाऱ्या सर्वांना मध्य रात्रीनंतर निद्रादेवीने घेरले. पहांटे ज्यावेळी आजीला जाग आली, तेव्हां त्या समईच्या प्रकाशांत औदुंबराच्या वृक्षाजवळ बसलेला योगी निघून गेल्याचे दिसले. तिने आपल्या चिरंजीवाला उठविले. त्यांनीही शोध घेतला. पण त्याचा काहिही उपयोग झाला नाही. घरांतील सर्वांना त्यांच्या जाण्याने अत्यंत दुःख झाले. दुसऱ्या दिवशी आजोबा घरी आले. त्यांना "योगी" येवून गेल्याचे समजल्यावर. ते स्वतःला दोष देवू लागले. रात्रभर समईतील ज्योत जळूनहि त्या समईतील एक थेंबही तेल कमी झाले नव्हते, याचे सर्वांना आश्चर्य वाटले व योग्याच्या सामर्थ्याची कल्पना आली. एवढा महान योगी आपल्या घरांत येवून भेट होऊं शकली नाही, याबद्दल आजोबांना शोक झाला. ते खिन्न झाले. त्यांची अन्नावरून वासना उडाली. असे तीन-चार दिवस गेल्यावर एका रात्री त्यांना दृष्टांत झाला. ते योगी त्यांच्या स्वप्नात आले व म्हणाले, "तुझी व माझी भेट झाली नाही याबद्दल खेद करूं नको. मी इथे ज्या कारणासाठी येवून गेलो, ते कार्य झाले आहे." अशा तऱ्हेने आपली ओळख करून देतांच आजोबांनी त्यांचे चरण धरले व अश्रुंनी ते धुवून काढले. त्या योग्यांनी त्यांचे सांत्वन करून सांगितले कि "मी ज्या वृक्षाच्या छायेखाली बसलो होतो त्या ठिकाणी निर्गुण उपासना करण्यासाठी पादुका स्थापन कर. जो ज्या पादुकांची मनोभावनेने उपासना करील त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण होतील." एवढे सांगून त्या योग्याचे दत्तमुर्तीत रूपांतर होवून ते अन्तर्धान पावले. त्यांच्या आज्ञेप्रमाणे त्या ठिकाणी दत्त पादुकांची स्थापना करण्यांत येवून सर्व माणसे त्यांची पूजा करु लागली. आजही या कुटुंबातील सर्व व्यक्तिंना कोणीतरी अज्ञात शक्ती मार्गदर्शन करीत असते याचे प्रत्यंतर येते.



आजोबा वृध्द झाले. त्यावेळी अक्कलकोट निवासी स्वामी समर्थांची कीर्ती त्यांच्या कानावर आली होती. त्यांच्या दर्शनासाठी आजोबांचा जीव तळमळत होता. परंतु वृध्दावस्थेमुळे, त्या काळी प्रवासांची साधने उपलब्ध नसल्या कारणाने कोकणांतून सोलापुर जिल्हयातील अक्कलकोटला जाणे,

म्हणजे एक दिव्यच होते. त्यामुळें स्वामींची व त्यांची भेट होऊं शकली नाही. पुढे नोकरी निमित्ताने गेलेली सर्व मुलें सेवानिवृत्त होवून परत गांवी आली.त्यांचीही इच्छा स्वामींचे दर्शन घेण्याची होती. पण त्यावेळी स्वामी आपला देह सोडून गेले होते. काही दिवसांनी चिपळूण मुक्कामी स्वामींचे एक शिष्य आले, त्यांचे नांव गोपाळ स्वामी कुळकर्णी, त्यांची व वडिल चिरंजीव म्हणजे महाराजांचे वडील यांची भेट झाली. तेव्हां पासून महाराजांच्या घरी स्वामींची भक्ती होवू लागली.



## बाबांचे वडील शूर व धर्मनिष्ठ सेनानी

महाराजांचे वडिल व तीन नंबरचे चुलते हे ब्रिटीश गव्हर्नमेंटच्या फौजेत नोकरीला होते, दोन नंबरचे पोलिसमध्ये, आणि सर्वात धाकटे वर सांगितल्याप्रमाणे गावीच शेतीवाडीवर देखरेख करण्यासाठी आजोबांजवळ राहिले होते. सर्वात मोठे बाळाजीराव, महाराजांचे वडिल घरची सांपत्तीकस्थिती चांगली होती, तरीही क्षात्रवृत्तीला अनुसरून ते सेन्यांत भरती झाले. त्यावेळी भारतावर इंग्रजांचे राज्य होते. इंग्रजाच्या सैन्यांत स्वतःच्या कर्तबगारीमुळे ते लौकिकास पात्र झाले होते. सन् १९१४ सालच्या पाहिल्या जागतिक महायुध्दांत शौर्य गाजविल्याबद्दल इंग्रज सरकारनें मानाची चिन्हें व नाशिक जिल्हयांतील नांदगांव तालुक्यांत नायडोंगरी येथे १४९ एकर जमिन त्यांना "इनाम" म्हणून दिली. सदर जमिन अजूनही वारसा हक्काने महाराजांची आहे.

बाळाजीराव हे सैन्यांत लेफ्टनंट या हुद्यापर्यनत पोहचले होते. एक कर्तबगारी व शूर अधिकारी म्हणून त्यांचा सैन्यांत लौकिक होता. युध्दाच्या धुमश्चक्रित त्यांना मृत्युचे तांडवनृत्य पहाण्याची सवय झाली होती. परंतु मृत्युचे रहस्य समजले नव्हते. ते रहस्य त्यांना एका युध्दाच्या आघाडीवर असताना घडलेल्या घटनेने समजले. व त्यांना ज्ञान-प्राप्ती झाली. त्या प्रसंगाचे वर्णन करीत असतांना त्यांनी सांगितले किं-

## वडिलांना आलेला अनुभव



एका प्रसंगी इंग्रजांच्या बाजुने सीमेवर आपल्या बटालियन मधून ते आघाडीवर होते. दहाबारा दिवस युध्दाची धुमश्चक्री चालू होती. दोन्हीं सैन्य निकराने युध्द करीत होती. स्वतःचा बचाव करून शत्रूवर हल्ला करण्यासाठी खंदकात बसून लपून छपून युध्द चालू होते. दोन्ही बाजूचे अनेक सैन्य मारले जात होते. परंतु त्यांत कोणालाच यश प्राप्त होत नव्हते.

ghagmaharaj.guru

एक दिवस युध्द थंडावल्यासारखे झाले. रात्रीची वेळ होती. ते खंदकातच पहारा करीत बसले होते. इतक्यांत त्यानां आपल्या जवळच कोणीतरी असल्याचा भास झाला, आजूबाजूला पाहिले कोणीच दिसले नाही. एक अदृष्य शक्ति त्यांच्या अगदी जवळ आल्यासारखी वाटली,"व त्या शक्तिच्या तोंडून ध्वनी आले किं, "उद्या तुझी इथून बदली होईल, मी तुझ्या पाठीशी आहे. " व ती शक्ति तेथून गेल्याचा भास झाला. युध्द थांबले नव्हते, आश्चर्य असें किं दुसऱ्या दिवशी संध्याकाळी, त्यांची बदली दुसऱ्या ठिकाणी झाल्याची ऑर्डर मिळाली. त्याप्रमाणे त्यांची ताबडतोब बदली होवून ते दुसरीकडे गेले. त्यानंतर चार दिवसांनी एक भयंकर बातमी त्यांच्या कानावर आली. पूर्वी ते ज्या तुकडीतून युध्द करीत होते, ती सैनिकांची तुकडी शत्रूपक्षाकडून संपूर्णपणे मारली गेली होती आणि या बातमीचा त्यांच्या मनावर अत्यंत खोल परिणाम झाला. ज्या आपल्या सहकाऱ्यांवर नितांत प्रेम केले त्यांची कलवेर पाहून त्यांचे हृदय पिळवटून गेले. एक दिवस आपणा सर्वानाच असे जावे लागणार आहे. हे शरीर नश्वर आहे, असा कधीही न येणारा विचार त्यांच्या चित्तात घर करून राहिला. आपली जर जन्म-मृत्युंच्या चक्रातून सुटका व्हावयास पाहिजे असेल तर एका आत्मज्ञानाशिवाय दुसरा मार्ग नाही, असे विचार त्यांच्यावर झालेल्या पूर्व संस्कारामुळे येवू लागले. पूढे निवृत्तीनंतर रोज ध्यान-धारणा-जप-गीता पठण तसेंच रामायण व इतर धार्मिक ग्रंथाचे वाचन-मनन करीत पुढील सर्व जीवन ते एका विरक्त योग्याप्रमाणे जगले.



## बाबांचा जन्म

अशा पराक्रमी, धर्मनिष्ठ, पित्याच्या आणि जयवंती नामक प्रेमळ निरागस साध्वी मातेच्या उदरी, मार्गशीर्ष कृष्ण सप्तमीला गुरूवार दि. १५. १२. १९२७ रोजी पूणे खडकी येथे महाराजांचा जन्म झाला. हा एक योगायोग होता. कांही वर्षांपूर्वी याच दिवशी एका साधूनी त्यांच्या आजोबाना भेट दिली होती गुरूवार होता महाराजांचे पाळण्यांतील नांव वसंत असे ठेवण्यांत आले. वसंताच्या आगमनाने सृष्टीमध्ये नवे चैतन्य निर्माण होवून सर्व सृष्टी आनंदाने भरुन जाते. वृक्ष, वेली, फळा, फुलांनी बहरून जातात. पक्षी आनंदाने नाचतात-गातात तसेच या वसंताने कित्येक निराश व्यक्तिंच्या जीवनांत आनंद फुलविलाआहे. सर्वत्र अपयशाने खचून गेल्यामुळे, इहलोकाची जीवन यात्रा समाप्त करावी, असे विचार आलेल्या दुःखी जीवांना आपल्या सामर्थ्यांचा हात देवून त्यांचे जीवन यशस्वी केले आहे. सर्वांशी प्रेमाची वागणूक असल्यामुळे त्यांच्याकडे येणारा प्रत्येक माणूस आपले सर्व विसरून त्यांचे चरणी लीन होतो. त्यांच्या योगसिद्धी चमत्काराच्या गोष्टी अनुभवून त्यांचे साधक पुत्र त्यांना सिध्द योगेश्वर महाराज म्हणू लागले आणि तेव्हांपासून ते सर्व लोकांत सद्गुरू सिध्दयोगेश्वर घाग महाराज म्हणून ओळखले जावू लागले, येणारे सर्व लोक त्यांना

Copyright © ghagmaharaj.guru  ghagmaharaj.guru@gmail.com

महाराज किंवा बाबा म्हणत. असे हे प.पू. सिध्दयोगेश्वर घाग महाराज यांचे मार्गदर्शन लाभले म्हणून सर्व साधक स्वतःला धन्य समजतात. भगवान दत्तात्रेयांनीच भक्तांना मार्गदर्शन करून परम पदाला नेण्यासाठी महाराजांच्या रूपाने अवतार घेतला आहे. अशी सर्व साधकांची श्रध्दा आहे.

## बाबांचे शिक्षण







महाराजांचे वडील निवृत्त झाल्यावर दहिवली या स्वतःच्या गांवी येवून राहिले. दहिवली हे खेडेगांव आहे. गांवी शिक्षणाची सोय नसल्यामुळे, मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून त्यांनी पुढाकार घेवून शाळा चालू केली. तसेच आजुबाजूच्या अनेक खेडेगावांत फक्त मराठी चौथीपर्यंतच शाळा होत्या. त्यांच्या पुढील शिक्षणाचि आबाळ होत असे. त्या मुलांना पुढील शिक्षण मिळतच नसे. अशा मुलांची शहराच्या ठिकाणी रहाण्याची सोय झाल्यास त्यांना पुढील शिक्षण घेणे सुलभ होईल, म्हणून त्यांच्यासाठी शहरातच काही तरी केलेच पाहिजे, याचाच ते विचार करू लागले. या त्यांच्या विचारातून त्यांना एक कल्पना सुचून सैन्यातून निवृत्त झालेल्या व सैन्यांत असलेल्या लोकांना एकत्र जमवून चिपळूण या शहराच्या ठिकाणी त्यांनी सन १९३६ साली "मराठा मिलिटरी बोर्डींगची" स्थापना केली. त्या ठिकाणी गरीब विद्यार्थ्यांना अल्प खर्चात रहाण्या-जेवण्याची सोय करून दिली. विद्यार्थ्यांना कमी खर्चात शिक्षण मिळावे म्हणून ब्रिटिश गव्हर्नमेंटकडून मानधन मिळवून दिले. अशा प्रकारे गरीब व फौजेत असणाऱ्या व सेवानिवृत्त झालेल्या लोकांच्या मुलांची शिक्षणाची चांगल्या प्रकारे सोय झाली. याच बोर्डींगमध्ये सुरूवातीला त्यांनी आपल्या दोन्ही मुलानां शिक्षणासाठी ठेवले. त्यावेळी महाराज केवळ ९ वर्षाचे होते. एवढया लहान वयांत आई-वोडलांना सोडून आलेल्या मुलांना प्रेमाची वागणूक व ज्याच्या योगे शिक्षणाचो आवड निर्माण होईल अशा त-हेची वागण्याची आवश्यकता होती, परंतु ज्यावेळी एखाद्या मुलाला असा प्रसाद मिळत असे, तेव्हां महाराजांचे मन दुःखी कष्टी होत असे. आधीच मृदू असणाऱ्या महाराजांच्या अन्तःकरणात कालवाकालव होत असे. दिवसामागून दिवस जात होते. महाराज अतिशय विचारमग्न असायचे, वेळ मिळेल तेव्हां देवळांत जावून देवाचे दर्शन घेणे, व सबंध मोकळा दिवस नामस्मरणांत घालविणे, असा त्यांचा 'दिनक्रम चालू होता. खेळांत त्यांचे फारसे लक्ष नसे. त्यांचे सवंगडीही त्यांच्या या वागण्याने बुचकळ्यांत पडत असत. पुढे पुढे तर ते आतिशय शांत होत गेले. त्यांचे नेत्र सतत अज्ञाताचा शोध घेत असायचे. अभ्यासात पाहीजे असावे तसे लक्ष नसे. नेहमी कोठे तरी एकांतात जावून ते ध्यान-मग्न बसत.



## शिक्षण काळांतही तत्व चिंतन

वास्तविक ते वय म्हणजे मुलांबरोबर खेळण्या-बागडण्याचे. परंतु त्यांत ते रमत नसत. आपल्या बाल सवंगडयांच्या आग्रहास्तव क्वचित प्रसंगी ते त्यांच्याबरोबर खेळण्यास जात असत त्यांना एकच छंद होता तो म्हणजे एकांतात बसणे त्यासाठी ते नदीच्या काठी असणाऱ्या वृक्षाच्या छायेंत किंवा डोंगरावर असणाऱ्या दाट झाडीत, एखाद्या मोठया दगडावर जावून बसत. भगवंताचे ध्यान करणे, तसेच आपण कोण? कोठून आलो? व कोठे जाणार? जन्माला येणे वा मृत्यू पावणे म्हणजे काय? जन्मापूर्वी मनुष्य कोठे असतो व मृत्यू पावल्यानंतर तो कोठे जातो? एक दरिद्री कुटुंबात तर दुसरा श्रीमंत कुटुंबात जन्माला येतो असे कां घडते? जे जे उत्पन्न होते त्यांचा नाश होतो, तर शाश्वत काय आहे? ते कोठे सापडेल? या पंचभूतात्मक शरीराची हालचाल कोण घडवून आणतो इत्यादि प्रश्न त्यांना सतत भेडसावित असत. या प्रश्नांचा विचार करीत ते तासन्तास एकांतात बसत असत.

## मृत्यूबाबतचे विचार



त्यांच्या बालमनावर प्रकाश टाकणारी अशीच एक घटना घडली महाराजांच्या एका मित्राच्या वडीलांचे निधन झाले होते. महाराज त्या ठिकाणी गेले होते. मित्राच्या वडिलांचा देह अजून तिथेच होता. जमलेले लोक दुःखाने, त्या गेलेल्या माणसांबद्दल आपापसांत बोलत होते कि "बिचारा" चांगला होता. जन्मभर सर्वांशी प्रेमाने वागून, आपला संसार चांगला चालविला होता. पण अर्ध्यावर सोडून निघून गेला. हे शब्द ऐकतांच महाराज विचार करू लागले किं मित्राचे वडील तर इथेच आडवे पडले आहेत, मग तो गेला, तो चांगला होता, असे भूतकाळांत हे लोक का बोलत आहेत? मग गेला तो कोण? व इथे जे शरीर पडलेले आहे तो कोण? अशा अनेक प्रश्नांनी त्यांच्या मनांत काहूर माजविले. या घटनेचा त्यांच्या बालमनांवर फार मोठा परिणाम झाला. हा देह म्हणजे मी नव्हें, हा देह नश्वर आहे. जो पर्यन्त आंतील "मी" म्हणजे जीवात्मा आहे, तो पर्यन्त या शरीराला किंमत आहे या अचेतन शरीराची हालचाल करणारा कोणीतरी निराळाच आहे! असे त्यांना सतत वाटू लागले व त्यांचे आत्म-चिंतन होऊं लागले. वयाच्या दहाव्या वर्षीच महाराजांना भगवान दत्तात्रयांनी स्वप्न दृष्टांत देवून मंत्र सांगितला होता. त्या मंत्राचा जप करण्यासाठी नदीकांठी किंवा एखाद्या

एकांतात असणाऱ्या देवळांत जावून बसत. अशा वेळी त्यांचे नेत्र आपोआप बंद होऊन ध्यान चालूं होत असे. या स्थितीत किती वेळ जात असे त्याचे त्यांना भान नसे.



## साक्षात्कार

एक दिवस शाळा चालूं असतांना शाळेत न जातां ते सरळ नेहमी जात असत त्या डोंगरावरील गर्द झाडीत लपलेल्या देवीच्या मंदिरात गेले. देवीचे दर्शन घेवून मंदिराच्या जवळील दाट झाडीत असलेल्या एक वृक्षाखाली जावून ध्यानस्थ बसले. इकडे शाळा चालू झाली होती. आपला मित्र शाळेत दिसत नाही असे पाहून विनायक आगाशे या मित्राचे मन बेचैन झाले त्यांचे महाराजांवर अतिशय प्रेम होते. शाळेंत गैर हजर असलेला आपला मित्र कोठे असेल हे त्याला माहित होते. दुपारच्या मधल्या सुटीत, आपल्या एका दुसऱ्या मित्राला बरोबर घेवून तो सरळ निघाला व ज्या ठकाणी महाराज ध्यानमग्न बसले होते त्या ठिकाणी आला. त्यांची दृष्टी देहाचे भान विसरून बसलेल्या त्या बाल योग्यावर गेली. ते दोघेही भितीने गर्भगळीत झाले. त्या दोघांच्या तोंडून शब्दही फुटेना, कारण ते दृश्यच भयंकर होते. या दोघांची चाहूल लागताच एक भला मोठा भुजंग महाराजांच्या मांडीवरून झरकन निघून जातांना त्या दोघांनी पाहिले. तो भुजंग दूर निघून गेल्यावर विनायकने महाराजांना हलवून जागृत केले. त्यांना आपल्या बरोबर घेवून शाळेची वाट धरली. जातांना, रस्त्यात त्याने ही सर्व घटना महाराजांना सांगितली व विचारले किं, "तुला या प्रसंगाची भिती वाटली नाही काय?" महाराज त्याला म्हणाले कि "जर त्याचे अस्तित्वच कळले नाही, तर भिती कशी वाटणार?" त्याचवेळी आगाशे व त्याच्या मित्राला समजले किं आपला मित्र ध्यानाच्या किती उच्चतम गाढ अवस्थेत असतो ते! त्या दोघांनी ही गोष्ट आपल्या काही खास मित्रांना सोगतली. तेव्हां पासून त्यांच्या सवंगडयांच्या मनांत महाराजांविषयी अत्यंत आदराची भावना निर्माण झाली. शालेय जीवनापासूनच त्यावेळचे त्यांचे सर्व सवंगडी महाराजांना योगीच समजून त्यांच्या जवळ आदराने वागत असत.

## मला भेटायला ये!



अशीच एक दुसरी घटना चोथ्या इयत्तेत असतांना घडली. संस्कृतचा तास चालू होता. शिक्षक शिकवत होते. पण त्याकडे महाराजांचे लक्ष नव्हते. त्यांचे चित्त कोठे तरी अज्ञाताचा शोध घेण्यांत गढले होते. त्यांना एक आवाज ऐकूं

आला. "मला भेटायला ये." तास संपला, तसेच महाराज सरळ निघाले ते शहराबाहेर जवळच असलेल्या दत्त मंदिरात हजर. भर दुपारची वेळ होती. बाहेर ऊन रणरणत होते. एकांतात असणाऱ्या देवळाच्या आसपास कोणीही नव्हते. मंदिराच्या गाभाऱ्यात पाऊल टाकणार तोंच एक भला मोठा, पिवळा धमक, नाग फणा उभारून दरवाजात महाराजांकडे पाहून फुत्कार टाकीत होता महाराजांनी हात जोडून नमस्कार केला व म्हणाले कि, "आज्ञा झाली म्हणूनआलो आहे. आपणांस योग्य वाटेल तसे करावे" असे म्हणताच, त्या नागाचे, डोळे दिपविणाऱ्या, तेजस्वी प्रकाशांत रूपांतर होऊन, ते तेज सरकत सरकत दत्तमूर्तीत विसर्जन पावले. भक्तांची पौरिक्षा घेणाऱ्या भगवंताची ही सुध्दा एक परिक्षा पध्दत असावी.

शहराबाहेरील एकांताचे वातावरण महाराजांना नेहमी आकर्षित करीत असे. ते वातावरण त्यांना खुणावित असे. बोलावित असे. तेथील गर्द वनराईत व नद्यांचे काठ महाराजांना अतिशय प्रिय वाटत असत. वाशिष्टी नदीच्या जवळ असलेल्या गांधारेश्वराच्या मंदिरात जावून दर्शन घेतल्यावर जवळच नदी काठांवरील भव्य वृक्षाखाली ते तासनतास ध्यान-मग्न अवस्थेत बसत. केव्हा केव्हा झाडांवरील पक्षांशी, वृक्षांच्या पानांशी, नदीतील झुळझूळ वाहाणाऱ्या पाण्याशी, मंद मंद सुगंधीत व स्वच्छंद वाहाणाऱ्या वाऱ्याशी, तसेच रात्रीच्या वेळी आकाशांत लुकलुकणाऱ्या ताऱ्यांशी. त्यांचा मुक संवाद चालत असे. या अफाट विश्वाच्या उत्पत्तीचे, जीवाच्या जन्म-मृत्युचे, तसेच ज्या परमेश्वरांने हे सुंदर विश्व निर्माण केले, त्या परमेश्वराच्या सत्य स्वरूपाचे रहस्य समजून घेण्याचे त्यांचे प्रयत्न तेव्हा चालूं होते. अशा वेळी संध्याकाळी आपल्या घरटयांकडे पक्षी निघून, संध्याकाळचे रात्रीत रूपांतर होत असे हे त्यांना समजत नसे. त्यांच्या वेळी-अवेळी येणाऱ्या प्रकारांबद्दल व त्यांच्या बोर्डींग मध्ये, मुलांची देखभाल करण्यासाठी ठेवलेल्या अधिकाऱ्यांची धावपळ होत असे. ते नेहमीच चिंतेत असत." तुझ्या वडिलांना या तुझ्या वागण्याबद्दल सांगेन" असा दमही देत. वडिलांच्या कानावरही ही गोष्ट घालण्यात आली. त्यांना याबद्दल कल्पना नसल्यामुळे आपला मुलगा फुकट जात असल्यासारखे वाटे. त्यांनी महाराजांना समजावून सांगण्याचा खूप प्रयत्न केला. परंतु काहिही उपयोग झाला नाही.



## चिंतनातून समाधी

अशाच एका पौर्णिमेच्या रात्री, नदीकाठच्या वट वृक्षाखाली ते बसले होते. पूर्ण चंद्र उगवून, त्यांच्या दुधाळ किरणांनी आसमंत न्हावून निघाला होता. पानांनी भरलेल्या वृक्षाच्या फांद्यांतून जीमिनीवर पडलेल्या चंद्र प्रकाशाने जणू सुंदर रांगोळीचे काढली होती. अशा वेळी महाराजांचे चिंतन चालू होते, ते निसर्गाच्या निस्वार्थीपणाचे.

कोणत्याही प्रकारची आपेक्षा न ठेवता तो सर्व जीवांची सेवा करीत असतो. आणि इतर जीव या निसर्गाने उधळलेल्या संपत्तीचा नि:संकोचपणे उपभोग घेते असतात. कसल्याही प्रकारचा स्वार्थी हेतू न ठेवता! यत्किंचितही दुजा भाव न ठेवतां, सर्वांना तो ज्याला जसे पाहिजे तसा उपभोग घेवू देणे, ही भूमाता, पर्वत, नद्या, झाडें, वेली, चंद्र - सूर्य, वारा, शत्रू-मित्रत्वाचा भाव न ठेवतां सर्वासाठी सारखे उपयोगी पडत असतात. सुख शांती साठी धडपडणाऱ्या प्रत्येक माणसांने, त्यांचे मनापासून अनुकरण करण्याचा प्रयत्न केला तर हे जग आनंदाचे व शांतीचे नंदनवन बनेल!

त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येक साधकाला बाबांच्यावर नितांत श्रद्धा असणाऱ्या अनेक भक्ताना त्यांच्या निस्वार्थीपणे प्रेम करणाऱ्या गुणांमुळे या निसर्गाच्या गुणांचाच महाराजांनी स्वीकार केला आहे, असा अनुभव येतो. त्यांच्याकडे येणाऱ्या सर्वांवर ते पुत्रवत् प्रेम करतात. म्हणून सर्व साधक त्यांना "बाबा"म्हणून संबोधतात.

## मुंबईत आगमन



महाराजांचे शालेय शिक्षण चिपळूण व बेळगांवला झाले. पुढे नोकरी निमित्ताने ते मुंबईला आले. मुंबईत त्यांनी सुरूवातीला ४/५ ठिकाणी नोकरी केली, व शेवटी एका प्लास्टिक इंडस्ट्रिजच्या ऑफिसमध्ये १९ वर्ष नोकरी केली. या काळांत त्यांना निरनिराळ्या तऱ्हेचे अनुभव आले. थोड्याशा श्रीमंत अमाप पैसा मिळविणारे तसेच रात्रंदिवस काबाड कष्ट करून उपाशीपोटी जीवन जगणारे, प्रसादतुल्य बंगल्यात राहणारे, तसेच थंडीवाऱ्यापासून कसे बसे संरक्षण व्हावे म्हणून रस्त्याच्या कडेला झोपडी बांधून राहणारे असे लोक त्यांना दिसले. श्रीमंत अधिक सुख मिळविण्यासाठी तर गरीब आपल्या हालअपेष्टा संपवून सुख मिळावे यासाठी रात्रंदिवस अविश्रांत श्रम करीत आहेत. परंतु खरोखरच यांना सुख प्राप्त होईल कां? असे विचार त्यांना सतावत.

या संसाराचे गणितच मोठे विचित्र आहे! गणितामध्ये नेहमी मोठया संख्येतून लहान संख्या वजा होते, पण या संसाराच्या गणितात लहान संख्येतून मोठी संख्या वजा होते. म्हणजे एखाद्या माणसाला परमेश्वराच्या कृपेने अनेक गोष्टी लाभल्या आहेत, व एखादी गोष्ट त्याला मिळाली नसेल तर इतर मिळालेल्या दहाही गोष्टींचे विस्मरण होऊन तो एका गोष्टीसाठीच दु:खी होतो. एखाद्याजवळ सत्ता प्राप्त झाली आहे, संपत्ती आहे, पत्नी आहे, नोकरचाकर आहेत, आरोग्य आहे. सर्व काही आहे, म्हणजे वास्तविक तो सुखी असावयास पाहिजे. परंतु त्याच्या दुर्दैवाने त्याला पुत्र संतती नसेल तर! या एका गोष्टीतून बाकीच्या गोष्टीत त्याला सुख लाभत नाही. म्हणजेच या एका संख्येतून बाकी मिळालेल्या सर्व

ghagmaharaj.guru

गोष्टी वजा होतात. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर कोणत्या ना कोणत्यातरी काळजीचे चिन्ह दिसत असते. या सुखासाठी घडपडणाऱ्या लोकांच्या जीवनांत जराही शांती दिसत नव्हती. त्यामुळे महाराजांच्या मनाला दु:ख होत असे. जीवनात जर खरी शांती लाभावी असे वाटत असेल तर त्याने गरजेपुरते अर्थ मिळवून ईश्वर चिंतन करावे. तरच त्याला खऱ्या शांतीचा लाभ होईल असे त्यांना वाटते. याच काळांत त्यांच्या अनेक योग्यांशी भेटी झाल्या. त्याचप्रमाणे मंत्र शास्त्रात प्रविण असणाऱ्या काही लोकांजवळ त्यांचे फार चांगले संबंध होते. महर्षि विनोद यांच्याजवळही ३-४ वेळा भेटीचा योग आला. या भेटीच्या वेळी मंत्रशास्त्रावर चर्चा होत असे. तसेच इतरही या आध्यात्मिक मार्गात प्रगति केलेले लोक महाराजांना भेटण्यासाठी येत असत.

महाराजांनी अनेक मंत्रांची अनुष्ठाने करून, त्यांच्या सिध्दी प्राप्त करून घेतल्या, या काळात अनुष्ठाने होत होती, यज्ञ केले जात होते.



## प्रत्यदी जगनमातेचे दर्शन


अशाच एका अनुष्ठान समाप्तिच्यावेळी यज्ञ केला गेला. यज्ञासाठी गोपाळशास्त्री जोशी गुरुजी, फडके गुरुजी, चित्रे गुरुजी व जोशी आडनांव असलेले एक ज्ञानी पुरूष मुद्दाम या यज्ञासाठी गोपाळ शास्त्रीबरोबर आले होते. यज्ञाला सुरुवात झाली. महाराज व आई यजमान म्हणून बसले होते मंत्राच्या शेवटी "स्वाहा" म्हणून आहुती टाकण्यात येत होत्या. जवळ जवळ दोन ते अडीच तास मंत्राहुती चालू होत्या. वातावरणांत गंभीर पावित्र्य निर्माण झाले होते. "स्वाहा" म्हणून सर्वजण मोठया तन्मयतेने । मंत्राच्या शेवटी यज्ञात आहुती देत होते. पूर्णाहुतीला आणखी अर्धा तास अवकाश होता. तोच गोपाळशास्त्री बरोबर आलेल्या जोशींनी मंत्र सावकाश म्हणा असे त्यांच्या बरोबर आलेल्या सर्व ब्राम्हणांना सांगितले. यज्ञातील अग्नी अतिशय प्रज्वलित झाला होता. या प्रज्वलित झालेल्या अग्निच्या ज्वालेमधून श्वेत वस्त्र परीधान केलेली सर्वालंकार धारण केलेली, मुखकमलावर दिव्य तेज झळकत आहे, अशा चतुर्भुज "आद्य शक्ति" देवी-अंबेने दर्शन दिले. यज्ञ ज्वालेतून देवीने प्रकट होवून नतमस्तक झालेल्या महाराजांना व आईना स्मित मुखाने आशीर्वाद दिला व यज्ञ ज्वालेत अदृश्य झाली. आहुती देता देताच महाराज व आई यज्ञसामग्री बाजूला करून जमिनीवर मस्तक ठेवून नमस्कार करीत आहेत, हे पाहून बाकीच्यांना आश्चर्य वाटले. थोडा वेळ दोघंही भानावर नव्हती. मंत्र चालू होऊन पूर्णाहुती झाली. आरती नैवेद्य होऊन सर्वजण बसले असतां ज्यांचा ज्ञानी म्हणून वर उल्लेख केला आहे ते जोशी इतरांना सांगू लागले कि माझे भाग्य मोठे म्हणून मी इथे आलो, आज मला कृतार्थ झाल्यासारखे वाटते. महाराज व आईनी नमस्कार केला तेव्हां

मीहि नमस्कार केल्याचे आपण पाहिलेत. महाराजांमुळे आज आम्हाला देवीचे प्रत्यक्ष दर्शन झाले. आशीर्वाद प्राप्त झाला. त्या ठिकाणी असलेल्यांपैकी फक्त महाराज-आई व श्री. जोशी यांनाच दर्शन झाले होते. आपली अनुष्ठानें सफल झाली म्हणून महाराजांना व आईना अत्यंत आनंद झाला. श्री. जोशी महाराजांना म्हणाले आज आपल्यामुळे मला श्रीजगवदंबा मातेचे दर्शन झाले, मी कृतार्थ झालो.

त्यानंतर जोशींनी गोपाळशास्त्रींना विचारले कि हे महाराज कोणाच्या मार्गदर्शनाखाली एवढी कठिण अनुष्ठाने करतात. गोपाळशास्त्रीनी सांगितले कि, "त्यांचा माझा बरेच दिवसांचा परिचय आहे, ज्योतिषशास्त्रावर चर्चा करण्यासाठी ते माझ्याकडे केव्हां केव्हां येतात. ते योगशास्त्र व मंत्रशास्त्रावर अधिकारवाणीने बोलतात. परंतु त्यांनी अजूनपर्यन्त कोणालाही गुरू केलेले नाही. हे त्यांना वाचनांतून किंवा पूर्वजन्मीच्या ज्ञानांतून प्राप्त झाले असले पाहिजे. मी त्यांच्याकडे १०-१२ यज्ञांना तरी आलो आहे. ते एक महान व्यकिते आहेत म्हणून मी आदराने येतो. आज माझ्यबरोबर येण्याचा आपणालाही योग आला" आपल्यामुळे मला आज अलभ्य लाभ झाला, असे जोशी म्हणाले.

पुढेही अनेक अनुष्ठाने झाली. मंत्रासिध्दी प्राप्त झाल्या. तेच मंत्र आज संसारात निराश झालेल्या लोकांना आशेचा किरण देण्यास उपयोगी पडत आहेत. सांसारिक अडचणींनी ग्रासलेल्या अनेक लोकांना स्वतः सिध्द केलेले मंत्र देवून, त्यांच्याकडून साधना-जप करवून घेवून त्यांना अडचणीतून मुक्त केले जात आहे. महाराजांच्या आशीर्वादांत केवढे मोठे सामर्थ्य आहे, हे सर्व साधक जाणतात.

## मंत्ररहस्य



येणाऱ्या कोणत्याही आर्त । माणसाचे । संकट महाराजांच्या करूणामय दृष्टीने नाहीसे होते, असें असतांना महाराज मंत्र देवून त्याला रोज नियमाने मंत्र जप केलास तरच तुझे काम होईल असे कां सांगतात? असा प्रश्न भित भितच एका निष्ठावंत साधकांने महाराजांना विचारला होता. तेव्हां महाराज म्हणाले, कि, "मंत्र देण्यामागे एकच उद्देश आहे, येणाऱ्या प्रत्येक माणसाचे मनोदौबर्ल्य नाहीसे होऊन त्याच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा. मंत्र जप केल्यामुळे काम झाल्यास त्याच्या ठिकाणी प्ररमेश्वराबद्दल भक्ती निर्माण व्हावी, तो भक्तिमार्गी व्हावा, ज्या कामासाठी मंत्र जप केला व ते काम झाले तर त्याला निश्चितच पुढे असे वाटू लागेल किं अशीच मी परमेश्वराची भक्ती करीत राहिन, तर संसारात येणाऱ्या संकटाची तीव्रता कमी होऊन आपला संसार सुखाचा होईल. या त्याच्या भूमिकेमुळे तो भकतिमार्गी बनून नितीनियमाने वागण्याचा प्रयत्न करतो. आपल्यामध्ये असलेले दुर्गुण टाकून चांगले गुण अणण्याचा प्रयत्न करतो. या त्याच्या वागण्याचा त्याच्या घरांतील माणसांवर चांगला परिणाम होतो. मुलांवर सुसंस्कार घडतात. अशा

त-हेने जर त्याच्या ठिकाणी चांगले गुण आले तर तो एक आदर्श नागरिक बनेल, या एकाच उद्देशाने मंत्र दिला जातो -" प्रश्नकर्त्या साधकाचे समाधान झाले. वास्तविक बाबांकडे येणाऱ्या प्रत्येक श्रध्दाळू भक्ताच्या संकटांचे निवारण बाबांच्या सामर्थ्यशील आशिर्वादानेचे होत असते. परंतु त्यासाठी येणाऱ्या माणसाची बाबांच्या ठिकाणी भक्ति व श्रध्दा असली पाहिजे, असा सर्व साधकांचा अनुभव आहे.

असेच दिवसामागून दिवस जात होते, बाबांची खडतर साधना चालू होती. शरीराला अनंत कष्ट देवून मंत्राच्या सिध्दी प्राप्त करून घेतल्या होत्या. तरीसुध्दा बाबा संतुष्ट दिसत नव्हते. नेहमी उदासीन दृष्टीने कोणत्यातरी विचारांत बसलेले असत. त्यांची दृष्टी ज्या परमेश्वराच्या कृपेने त्या मंत्रदेवता साहयभूत झाल्या त्या परमात्म्याच्या दर्शनासाठी आतुर झाली होती. पूर्वी मंत्रानुष्ठाच्या वेळी संध्याकाळी ६ वाजता महाराज कामावरून सुटल्याबरोबर तडक घरी येत असत. आल्याबरोबर १०-१५ मिनिटांनी चहा घेवून स्नान करून पद्मासनात मंत्रजपाला बसत असत. रात्री साडेबारा ते १ वाजता रोजची ठराविक जपाची जपसंख्या पूर्ण झाल्यावर आसनावरून उठत असत, नंतर जेवण. परंतु आता त्यांनी अनुष्ठाने करण्याचे बंद केले होते. त्यांना एकच तळमळ लागून रांहली होती, ती म्हणजे परमात्म्याच्या दर्शनाची.

अनुष्ठानाच्या पूर्ततेसाठी वेळेवर घरी येणारे बाबा आता कामावरून सुटल्यावर लगेच घरी न येता स्वतःच्या आत्मानुसंधानात गर्क होऊन एकांतवासासाठी पाय नेतील तिकडे चालत जात असत त्यांचा बहुतेक प्रवास पायीच होत असे बहुतेक वेळी ते निर्मनुष्य असणाऱ्या समुद्राच्या किनारी खडकावर बसलेले असत 'किंबा उपनगरांतील कोणत्यातरी झाडीत ध्यानमग्न अवस्थेत बसत असत.



## वैवाहीक जीवन

१९५५ मध्ये, महाराजांचे पूजनीय गीताई बरोबर लग्न झाले. संसाराचा गाडा मोठ्या कुशलतेने हाकणाऱ्या त्या आदर्श गृहीणीजवळ ज्यावेळी भेट झाली, तेव्हां मी सहजच महाराजांविषयी काही सांगण्याची विनंती केली त्यांनी नेहमीप्रमाणेच हसतमुखाने संमती दर्शविली. त्या म्हणाल्या त्यांच्याविषयी सांगण्यास मला आनंदच होईल. त्या बोलू लागल्या, पूर्व जन्माच्या पुण्याईवर विश्वास ठेवावा लागतो. कारण या जन्मात मी काही अशी पुण्याई केलेली नव्हती, कि ज्या योगे या अवतारी पुरुषाबरोबर माझे लग्न व्हावे. ज्याप्रमाणे इतर "नववधू संसारांत पदार्पण करताना ज्या इच्छा आकांक्षा. हृदयाशी बाळगतात, त्याप्रमाणे मीही त्यातली एक होते. माझ्या माहेरचे वातावरण काही आध्यात्मिक विचार रुजवून पोषक करण्याला 'सहाय् यभूत: ठरणारे नव्हते. आमच्या लहानपणीच आई अनंतात विलिन झालेली. आम्हां तिन्ही भावंडांचे वडिलच सर्व काही करीत. पूढे तेही परमेश्वराच्या घरी निघून गेले. आम्ही तिन्ही मुले पोरकी झालो. अशा

वेळी देवी करणीच म्हणाना मी चुलत भावांकडे असतांनाच मला मागणे आले. कोणत्याही प्रकारे अडचण न येता या महापुरूषाबरोबर लग्न झाले. सुरूवातीला माझ्या पतीविषयी, या बाबतीत मला काहीच माहिती नव्हती. जस जसे दिवस जावू लागले, तस तशी त्यांच्या असंसारी वृत्तीची ओळख पटू लागली. नववधूच्या मनात असणाऱ्या इच्छा आकांक्षा माझ्याहि ठिकाणी होत्याच. तेव्हां मीहि माझ्या पती देवाला त्यांच्या आध्यात्मिक मार्गात अडथळा निर्माण होणार नाही, अशा प्रकारे त्यांच्या जीवनांत समरस व्हावयाचे ठरविले, ठरविले म्हणण्यापेक्षा परिस्थितीमुळे मला व्हावेच लागले. नाहीतर ते घर सोडून केव्हांच निघून गेले असते. मी माझ्या परिने त्यांच्या आध्यात्मिक मार्गात अडचण होणार नाही अशा त-हेने वागण्याचा प्रयत्न करीत होते. ही एक तारेवरून चालण्याची कसरत होती. प्रथम प्रथम संसारात मला अवघडल्यासारले वाटत असे. परंतु लवकरच मी त्यांच्या प्रत्येक गोष्टीत समरस होवून वागू लागले. 'त्यांच्या अंगी असलेल्या दैवी गुणांचा मला जसा जसा प्रत्यय येवू लागला तस तसा माझ्या मनांत त्यांच्याविषयी अत्यंत पूज्य व आदरभाव निर्माण होवू लागला. एका योग्याची मी सहधर्मचारिणी होईन ही कल्पना नव्हती. लग्नापूर्वी आई व वडील दोघोहे नसल्यामुळे माझ्यावर पडलेल्या जबाब-दारीमुळे म्हणा, किंवा मुळातच माझा स्वभाव चैनीकडे आकर्षित न होणारा असल्यामुळे म्हणा, त्यांच्याशी संसार करतांना मला जड गेले नाही घरांतील संस्कारांमुळे मी हि देवपुजा, स्तोत्र पठण, मंत्र जप करू लागले. त्यांत मला रसही वाटू लागला. दिवसा, दुपारी कामे आटोपल्यावर धार्मिक ग्रंथाचे वाचनही होऊ लागले.

चरितार्थासाठी कराव्या लागणाऱ्या नोकरी व्यतिरिक्त जो वेळ मिळत असे तो सर्व वेळ महाराज योग साधना, नामस्मरण, चिंतन व तत्त्वज्ञान विषयक ग्रंथाचे वाचन यांत घालावेत असत. वेदांतातील महान वाक्यांवर त्यांचे सतत चिंतन असे. "अहं ब्रह्मास्मि" म्हणजे "मी ब्रम्ह आहे". याची प्रत्यक्षानुभूती मिळावी यासाठी त्यांचा जीव व्याकुळ होत असे. त्यासाठी त्यांची रात्रीदवस धडपड चालू होती. या काळात त्यांच्या अनेक योगी सत्पुरूषांबरोबर भेटी झाल्या. त्यांच्या जवळ चर्चा झाल्या. तसेच देह सोडून गेलेल्या योग्यांनी त्यांची अध्यात्म मार्गात प्रगती व्हावी म्हणून मार्गदर्शन करण्याच्या निमत्ताने स्वप्न दृष्टांतही दिले. मार्ग चालू होता, परंतु आंतरिक तळमळ शांत होत नव्हती.

आपल्याला जे पाहिजे ते मिळत नाही. म्हणून "भेटी लागे जीवा लागलीसे आंस" अशी त्यांच्या जीवाची तळमळ होत होती. आपली ही तळमळ शांत करील अशा सत्पुरुषांच्या शोधांत महाराज होते. सन् १९४९-५० चा काळ होता. एका समाधीस्थ झालेल्या सत्पुरुषांचे नांव त्यांच्या कानी आले. मुंबईला त्या काळी त्यांची असावी तशी प्रासध्दी नव्हती. एका सद्गृहस्थाने, ओवीबध्द चरित्र असलेला ग्रंथ महाराजांना वाचावयास दिला. महाराजांनी तो ग्रंथ संपूर्ण वाचून काढला. तो ग्रंथ म्हणजे "साईलीलामृत". त्यावेळे पासून महाराजांची साईबांबांवर भक्ति जडली. अशा सत्पुरूषाने आपल्याला दृष्टांत देवून

मार्गदर्शन करावे असं त्यांना सारखे वाटू लागले. त्यांच्या समाधीचे तरी दर्शन घडावे, ही इच्छा प्रबळ होऊ लागली. परंतु सहा माहिने असेच निघून गेले.

## साईबाबांचे दर्शन



एके दिवशी पहाटेच्या वेळी महाराजांना दृष्टांत झाला, त्या दृष्टांतात साईबाबा दारकामाईत धुनीजवळ बसलेले दिसले. पुष्कळ भक्त बाबांच्या दर्शनासाठी जमले होते. एक एक भक्त दर्शन घेवून जात होता. त्याला बाबा उदीचा प्रसाद देत होते. सर्वांचे दर्शन झाल्यावर सर्व लोक आपापल्या घरी निघून गेले. फक्त महाराजच शेवटी राहिले होते, पायऱ्या चढून महाराज बाबांच्याजबळ गेले. साश्रूनयनांनी महाराजांनी बाबांच्या चरणावर मस्तक ठेवले. तोच बाबांनी आपल्या दोन्ही हातांनी वर उठवून आपल्या बाहूमध्ये महाराजांना दृढ आलिंगन दिले व बाजूला नेवून खाली बसविले. स्वतः विश्रांतीसाठी जमिनीवर आडवे झाले. आपला पाय महाराजांच्या मांडीवर ठेवला. महाराज भक्तिभावाने बाबांचे पाय चेपू लागले. थोडयाच वेळांत साईबाबांनी स्मितमुखाने महाराजांकडे पहात आशीर्वाद दिला व धुनीसाठी लाकडे आणण्यास सांगितली, दृष्टांत संपला. याचाच अर्थ ज्ञानाग्नीत संकल्प, विकल्प, आशा-आकांक्षा, विकारांची आहुती देण्याची आज्ञा झाली होती.

वरील दृष्टांत होईपर्यन्त शिर्डीला जाण्याचा योग महाराजांना आला नव्हता. १९५१ साली महाराज शिर्डीला गेले. महाराज जेव्हा शिर्डीला गेले तेव्हा दृष्टांतातील सर्व देखावा जसाच्या तसा त्यांना पहावयास मिळाला. महाराजांनी समाधी मंदिरात जावून समाधीचे दर्शन घेतले. त्यावेळी आता साईबाबांचा जो संगमरवरी पुतळा आहे तो नव्हता. त्या ठिकाणी पका खुर्चीवर बाबांचा फोटो ठेवलेला असे - त्यावेळचे शिर्डीचे वातावरण गंभीर व कोणत्याही त-हेची जास्ते वर्दळ नसलेले होते. महाराजांनी, बाबांच्यावेळी असणाऱ्यांपेकी कांही व्यवितंच्या भेटी घेतल्या. त्यापेकी लक्ष्मीबाई जिला साईबाबांनी शेवटी जातांना ९ रूपये दिले होते त्या भेटल्या महाराजांनी बाबांविषयी काही माहिती विचारली ती त्यांनी मोठया भक्तीभावाने सांगितली. तसेच म्हाळसापतीचे चिरंजीव मार्तंड यांचीही भेट घेतली बाबांवर महाराजांची श्रध्दा बसली, व त्यांच्या सिध्दत्वाबददल मनांत पूज्यभाव निर्माण झाला.

त्यानंतर साईबाबा महाराजांच्या स्वप्नांत व ध्यानावस्थेत नेहमी येवून योगांच्या गूढ रहस्यमय क्रियाबाबत मार्गदर्शन करीत असत. असेच एकदा स्वप्न दृष्टांतात साईबाबांनी महाराजांना दृढ आलिंगन देवून त्यांच्या कपाळाचे चुंबन घेवून, त्यांच्याकडे कृपादृष्टीने पहात विचारले, "तुला काय पाहिजे?" महाराजांनी सद्गदित आवाजात सांगितले कि, "मला काय पाहिजे तेच सांगता येत नाही." दोघेही

एकमेकांच्या डोळयात पाहू लागले - महाराजांचे देहभान हरपले. इतक्यांत साईबाबांनी महाराजांना सावध करून ते बोलू लागले की, तुला जे काय पाहिजे ते मिळेल. परंतु मी जे मागेन ते तूं देशील कां?" महाराज क्षणभर गोंधळले, बाबा काय मागणार आहेत? असा विचार पडला. तोच बाबा म्हणाले कि "समचरणाची सेवा कर" याचा अर्थ निर्गुण निराकाराची उपासना करणे, ब्रम्ह आणि माया या दोहोंना समान लेखून त्यांची भक्ती करणे. महाराजांनी त्यावेळी साईबाबांना विनंती केली की, "बाबा आपण नेहमी स्वप्नांत येवून मला मार्गदर्शन करतां, परंतु आपण मला जागेपणी सगुण स्वरूपांत दर्शन देवून आशीर्वाद द्यावा, म्हणजे माझे जीवन धन्य होईल." साईबाबांनी त्यावर मार्मिक उत्तर दिले ते सर्व साधकांनी, भक्तांनी लक्षात ठेवण्यासारखे आहे. साईबाबांनी सांगितले, "अरे हे जसे स्वप्न म्हणून म्हणतोस, तसेच जागृतीतील घटनाही स्वप्नातच आहेत." "हे जसे स्वप्न तसेच तेही स्वप्नच." तुला मार्गदर्शन करण्यासाठी, साधनेत प्रगती होऊन आत्मसाक्षात्कार घडविण्यासाठी, साक्षात्कारी सद्गुरूंची प्राप्ती होईल" असा त्यांनीच आशीर्वाद दिला होता.



## गोरक्षनाथांनी बाबांना व आईना दर्शन दिले

केव्हां केव्हां महाराज साधनेला एकांतवास मिळावा म्हणून रात्रीचे समुद्राकनारी किंवा अन्यस्थळी जात असत. एकदा असेच समुद्रकिनारी, खडकांवर ध्यानावस्थेत बसले होते. बराच वेळ गेला. पहाटे पाच-साडेपाचची वेळ असेल. जवळ बसलेली माणसे दिसू शकतील एवढा उजेड पडला होता. इतक्यांत त्यांच्या पाठीमागे बसलेल्या माणसाच्या हालचालींमुळे महाराजांचे ध्यान भंगून त्यांनी मागे पाहिले. तीन संन्यासी, आपल्या पाठीमागे. जवळच बसून काहि योगिक क्रिया करतांना त्यांना आढळले. थोडा वेळ गेला असेल, ते आपल्या किग्रेत असतांना विशेष दसल न घेता, महाराज निघून गेले. दुसऱ्या व तिसऱ्या दिवशीही, पहिल्या प्रमाणेच. ते तीन संन्यासी महाराजांच्या मागे येवून बसले. महाराज एकांतवासासाठी त्या ठिकाणी येत असल्यामुळे, आता या ठिकाणी आपल्याला एकांतवास मिळणार नाही असे वाटल्यामुळे ते मनांतून थोडे चिडलेही. आता साधनेसाठी दुसरे एखादे एकांतातील स्थळ शोधावे, या विचाराने ते घरी परतले. तो दिवस गेला. रात्री माई जेवणाचे काम आटपून महाराजांचे पाय चेपीत बसल्या होत्या. त्याच आडवे पडलेल्या अवस्थेत महाराजांचे देहभान सुटून ते ध्यानमग्न अवस्थेत गेले. त्यांच्या ध्यानामध्ये, एक तेजःपुंज संन्यासी दिसू लागला. २५ ते ३० वर्ष वयाच्या या योग्याने अंगावर भगवी वस्त्रे परिधान केली होती. सुदृढ अंगकाठी असलेल्या या योग्याचा वर्ण गौर होता, भेदक डोळे, रेशमासारखी पिंगट दाढी व जटा, खांकेला झोळी, हातात कमंडलू व चिमटा अशी मुर्ति



ghagmaharaj.guru

महाराजांसमोर उभी राहिली. त्यांनी महाराजांना विचारले, "काय ओळखले का मला?" महाराज त्यांच्याकडे पहातच राहिले. या संन्यासी योग्याला पाहिल्याचे त्यांना आठवण झाली. आपल्या मागे येवून बसणाऱ्यांपैकी हेच ते मुख्य संन्यासी याची खात्री झाली. दोन तीन दिवस आपल्या पाठीमागे बसणाऱ्या या योग्यांची साधी विचारपूसही केली नाही, याबद्दल महाराजांना अतिशय दुःख झाले. त्यांचे नाव विचारण्याचीही आपल्याला बुद्धी कशी झाली नाही. याबद्दल मनांतल्या मनांत ते आपल्यालाच दुषण देवू लागले. तोंच ते योगी आपल्या धीरगंभीर आवाजात बोलू लागले - "माझे नाव गोरक्षनाथ, तुझ्या साधनेत प्रगती व्हावी, तुला भेटावे अशी इच्छा झाली म्हणून तुझ्या मागे येवून मी बसत असे." प्रत्यक्ष गोरक्षनाथाच्या तोंडचे शब्द ऐकतांच महाराजांना त्यांना न ओळखण्याबद्दल अत्यंत दुःख झाले. त्यांच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहू लागल्या. प्रत्यक्ष योगीयांचे योगी गोरक्षनाथ आपल्याजवळ बसूनही, आपण त्यांची साधी चौकशी केली नाही. त्यांची ओळख न पटल्यामुळे दर्शनालाही मुकलो. या एकाच विचारांने ते स्वतःला दुषण देवू लागले. क्षणांत स्वतःला सावरून त्यांनी गोरक्षनाथांच्या तेजःपुज मुखाकडे पाहिले. व त्यांचे चरण धरून परत दर्शन देण्याची विनंती केली. गोरक्षनाथांनी आपल्या दोन्ही हातांनी महाराजांना उठविले. आपला हात त्यांच्या मस्तकावरुंन फिरविला व सांगितले कि, "उद्या पहाटे, दिवस उजाडण्यापूर्वी, मी तुला दर्शन देण्यासाठी येईन." परंतु मी गोरक्षनाथ आहे ही गोष्ट तुइयाशिवाय कोणालाही माहित असतां कामा नये. साक्षात भगवान गोरक्षनाथ घरी येणार म्हणून प्रथमतः महाराजांना आनंद झाला, परंतु दुसऱ्या कोणालाहि बोलू नको अशी आज्ञा झाल्यामुळे त्यांचा विरस झाला. घरी येवूनही जीने आयुष्यभर साथ दिली त्या गीताईलाहि कोण येणार आहे? याची कल्पना दिली नाही तर नाथांचे आदरातिथ्य कसे करणार? असा प्रश्न पडला. म्हणून महाराजांनी नाथांना विनंती केली कि, "नाथ, आपण येणार असल्याची कल्पना मी माझ्या पत्नीला देण्याची परवानगी असावी." आपण सर्व काही जाणताच! गोरक्षनाथांनी ही विनंती मान्य केली परंतु आदरसत्कारासाठी थांबणार नाही असे सांगतले. सूर्योदयापूर्वी लांबूनच मी "अल्लख निरंजन" हे शब्द उच्चारीन, हे माझे शब्द ऐकतांच, तुम्ही दरवाजांत उभे राहूनच माझे दर्शन घ्या. तुझ्या विनंतीनुसार मी फक्त तुम्हां उभयतांना दर्शन देवून जाईन." गोरक्षनाथ आपण केलेला आदरसत्कार स्वीकारणार नाही, याबद्दल महाराज दुःखी झाले. तीन दिवस भेटूनही आपण त्यांची ओळख करून घेतली नाही म्हणून रागाने ते आपला आदरसत्कार स्वीकारणार नाहीत असे वाटले. नाथांनी महाराजांच्या मनांतील भाव ओळखला. गोरक्षनाथ म्हणाले, "माझे तुझ्या बाबतीतील इच्छीत काम झाले. तुम्ही दोघांनी भक्तीभावाने केलेली मानसपुजा मला आवडेल." महाराजांचे समाधान झाले. वरील ध्यानाचा प्रसंग चालू असताना महाराजांच्या नेत्रांतून वहाणाऱ्या अश्रुधारा व चेहऱ्याबरील भाव पाहून माईंनी महाराजांचे पाय चेपण्याचे थांबवून त्यांच्या मुखाकडे पहातच राहिल्या होत्या. महाराज जेव्हां भानावर आले तेव्हां ही सर्व गोष्ट त्यांनीच माईना सांगितली. रात्री जेवण

करून सर्व झोपी गेले परंतु नाथांच्या भेटीच्या आतुरतेमुळे रात्रभर दोघांनाही झोप लागली नाही. पहाटे स्नान वगैरे करून दोघेही नाथांच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहात होती. आपणाकडून कोणतीही चूक होऊ नये, या गोष्टींची ती दोघेही काळजी घेत होती.



पहाट होत चालली, क्षणाक्षणाने दोघांच्याही मनांत दर्शनासाठी उत्कंठता वाढत होती. माईनी दरवाजापुढे स्वच्छ करून रांगोळी काढली, आणि उदबत्त्या लावल्या. दोघेही दरवाजांत बसून नाथांच्या येण्याची आतुरतेने वाट पाहू लागली. थोडा वेळ गेला असेल इतक्यात मनाला मोहून टाकणाऱ्या सुगंधाने वातावरण भरून गेले त्या सुगंधाच्या वातावरणाच्या पाठोपाठ लांबूनच "अल्लख निरंजन" असे उच्च खाने उच्चारलेले शब्द कानी पडले. दोघांचेही शरीर थरारले. दोघेही दरवाजाबाहेर येवून उभी राहिली. ती तीन दिवस प्रत्यक्ष पाहिलेली व ध्यानावस्थेत दर्शन दिलेली, तेज:पुंज मुर्ती पहातांच दोघांच्या मनांतील "अष्टसात्विक भाव" जागृत होऊन, त्यांच्या डोळ्यांतून आनंदाच्या अश्रुधारा वाहूं लागल्या. तशा स्थितीत विनम्र भावाने दोघांचेही हात जोडले गेले. समोर उभ्या राहिलेल्या त्या तेज:पुंज योग्याचे वय २५ ते ३० च्या दरम्याने असावे. गौर सतेज वर्ण, पिंगट केस, अंगावर भगवी कफनी, उजव्या हातात चिमटा, डाव्या हातात कमंडलू, खाकेत झोळी, उजव्या हातांतील चिमटा डाव्या हातात घेवून आशिर्वादासाठी हात उंचावलेल्या त्या योग्याच्या मुखाकडे पहाता पहातां त्या दोघांनी नाथांचे चरण धरले. डोळ्यांतून बहाणाऱ्या आनंदाश्रूंनी त्यांचे चरण धुवून अन्तःकरणांतील प्रेममय भक्ती त्यांना अर्पण केली. डोळ्यांतील दिव्य ज्योतीने त्यांना ओवाळले. गोरक्षनाथांनी "मनातील सर्व इच्छा पूर्ण होतील" असा प्रसन्नतेने आशीर्वाद दिला आणि क्षणांत जसे आले तसे निघून गेले. एक स्वप्नवत दृश्य संपल्याचे दुःख उभयतांना झाले. परंतु त्याचबरोबर आपण किती भाग्यवान, कि प्रत्यक्ष भगवान गोरक्षनाथांनी आपणांस साक्षात दर्शन दिले, याचा आनंदही झाला. गोरक्षनाथ गेल्यावरही बराच काळ वातावरण सुगंधीत राहिले होते.

महाराजांच्या साधनकाळांत अनेक चमत्कार घडले. तसेच त्यांना दिव्य अनुभवही आले. त्यापेकीच वरील एक महाराजांच्या जीवनांत अशा प्रकारे अनेक महात्मा, दिव्य व्यक्तींचा स्पर्श व आशीर्वाद मिळत गेले व त्यांना दिव्यत्वता लाभली गेली. प्रारब्धाचे भोगणे संपत आले व पुढे लवकरच अकल्पितपणे सद्‌गुरूंचा त्यांना लाभ झाला.


महाराजांचे चारित्र्य, भक्ती व योगसाधना पाहून, अनेक लोक त्यांच्याकडे आकर्षित होऊ लागले होते. त्यांच्या सहवासांत राहून आध्यात्मिक मार्गदर्शन होईल या इच्छेनेहि लोक येत असत. परंतु एकांतवास प्रिय असणारे महाराज, या लोकांपासून नेहमी अलिप्त दूर राहाण्याचा प्रयत्न करीत असत. त्यातूनही जर कोणी भेटलाच तर त्याला विनम्रतेने सांगत असत कि, "अजून मलाच जर परमेश्वराच्या

सत्य स्वरूपाचे दर्शन झाले नाही, तर आपल्याला त्या मार्गाबद्दल मौ काय सांगू? अजूनही मी अपूर्ण आहे." असे सांगून त्या माणसाला वाटेला लावले जात असे.



याच काळांत महाराजांना भगवान दत्तात्रयांचे दर्शन झाले होते आणि गुरूप्राप्ती इथेच होईल असा आशीर्वादही मिळाला होता. थोडे दिवस गेल्यानंतरची गोष्ट आहे. एकदां एक गृहस्थ महाराजांना भेटण्यासाठी आले. काहिही परिचय नसतांना, त्यांनी महाराजांजवळ सहज विषय काढला कि, "आपल्या थोरपणाविषयी मी अनेकांच्या तोंडून ऐकले आहे. तसेच आध्यात्मिक मार्गात आपली फारच प्रगती झालेली आहे. हि प्रगती होण्यासाठी आपण कोणाचे मार्गदर्शन स्वीकारलेत? आपले आध्यात्मिक गुरु कोण?" तेव्हां महाराजांनी उत्तर दिलें कि, "परमेश्वर निरनिराळ्या स्वरूपांत, निरनिराळ्या माध्यमांद्वारे मला मार्गदर्शन करतो. प्रत्यक्ष मानवी शरीर धारण केलेला महात्मा अजुन गुरू म्हणून लाभलेला नाही. ज्याची प्राप्ती झाली असतां क्षणांत आपल्या शिष्याची "कुंडलिनी शक्ती" जागृत करतो असा सिध्द महापुरूष भेटला, तरच त्या महात्त्म्याला गुरू करण्याचा माझा निश्चय आहे.

## सद्गुरू प्राप्ती




अशा महात्त्म्याने माझा स्विकार करावा अशी माझी प्रबळ इच्छा आहे". नाम-दिक्षा देणारे, स्पर्श-दीक्षा देणारे, तसेच दृष्टी-क्षेपाने दिक्षा देणारे जे महात्त्मे आहेत. त्यापेक्षा सर्वश्रेष्ठ म्हणजें जो "संकल्पाने" दिक्षा देवून शिष्याची "कुंडलिनी शक्ती" जागृत करून मार्गस्थ करतो, तोच महात्त्मा सर्वश्रेष्ठ होय, मग तो संसारी असो, अवलिया असो, किंवा संन्यासी असो. तो भगवंताचा प्रत्यक्ष अवतार असतो. त्याच्या बाहय वर्तनाकडे लक्ष न देतां त्याला अनन्यभावे शरण जावें असे अनुभवी लोक सांगतात. "जर असा महात्मा मला भेटला तर त्यांना मी माझें शिष्यत्त्व पत्करण्याची विनंती करीन". एवढे बोलणे ऐकताच समोर बसलेल्या त्या गृहस्थानी सोगितले की, पुण्यांत "श्री वामनरावजी" गुळवणी महाराज एक साक्षात्कारी महान योगी असून ते संकल्प दिक्षा देतात. या दिक्षेमुळें शिष्याची "कुंडलिनी शक्ती" तात्त्काळ जागृत होऊन त्याचा मार्ग सुखकर होतो. जर आपण त्यांची भेट घेतलीत तर आपले मनोरथ पूर्ण होतील असे मला वाटते. मी फक्त एकाच भावनेंतून आपणाला सांगत आहे कि आपल्यासारखा श्रेष्ठ योगी आम्हांला गुरूबंधू म्हणून लाभावा." एवढे बोलून ते गृहस्थ निघून गेले.

ghagmaharaj.guru

काही दिवसांनी एका अधिकारी व्यक्तीचा लेख महाराजांच्या वाचनात आला. त्या लेखांत "कुंडलिनी शक्ती" जागृतीचे अनेक उपाय सांगितलें होते. परंतु हे उपाय अत्यंत अवघड होते. या उपायांनी, याच जन्मांत ती जागृत होईल याबद्दल त्यात आश्वासन नव्हते. लेखकांने आपल्या लेखांत जे महात्त्में दिक्षा देवून स्वतःच्या शक्ति सामर्थ्याने शिष्याची कुंडलिनी जागृत करतात. त्याची माहिती दिली होती. जो महात्त्मा आपल्या शिष्याची कुंडलिनी-शक्ती जागृत करतो तो खरा सद्गुरू असे एक योगी पुण्याला रहातात, व त्यांचे नांव प.पू. गुळवणी महाराज. असे त्या लेखात नमूद केले होते.



पुढें महाराजांच्या मनांत पुण्याला जावून पूज्य गुळवणी महाराजांनी भेटण्याची इच्छा झाली. दिवंसेदिवसे आतुरता वाढत गेली व एक दिवस महाराज प.पू. गुळवणी महाराजांच्या दर्शनासाठी पुण्याला गेले. योगीराज सदगुरु गुळवणी महाराज व महाराज या दोघांची दृष्टा दृष्ट झाली. एकमेकांची खुण एकमेकांना मिळाली. नुसत्या दृष्टीनेच मनांतील शंका कुशंका नष्ट होऊन मन स्तब्ध झाले. अन्तःकरणातील अशांती जावून शांतीचा लाभ झाला.




इतके दिवस ज्याच्या प्राप्तिसाठी आतुरतेने वाट पहात होते त्या महापुरुषाची भेट झाली. आज आपले इप्सित साध्य झाले असे महाराजांना वाटले. नदी समुद्राला भेटल्यावर तिचा खळखळाट आपोआप थांबतो तसे त्यांना झाले. चुकलेल्या मुलाची व आपल्या आईची भेट झाल्यावर मुलाची जशी अवस्था होते. तशीच महाराजांची अवस्था झाली. प्रखर उन्हांतून प्रवास करणाऱ्या वाटसरूला घनदाट वृक्षछायेखाली विश्रांती घेतांना थंडगार वाऱ्याच्या झुळकीच्या गारव्यामुळें थकवा जावून जसें त्याचे मन ताजेतवाने होऊन प्रफुल्लित होते, तद्वतच महाराजांना झाले. सद्गुरूसुद्धा अशा प्रगत शिष्याची आतुरतेने वाट पहात असतात. या महापुरूषाच्या परिक्षेते महाराज उत्तीर्ण झाले होते. दीक्षेची तारीख ठरली. महाराज परत मुंबईला येवून आपल्या गांवी म्हणजे "दहिवलीला" निघून गेले. सद्गुरूंनी सोंगितल्याप्रमाणे पत्रव्यवहार झाला. ठरलेल्या दिवशी दीक्षेसाठी बसावें अशी आज्ञा झाली. "१५ मे १९६६ रोजी सकाळी ६ वाजंता" महाराजांना "संकल्प दिक्षा" मिळाली. सद्गुरूंनी लिहिलेल्या पत्रात आपण कोणतीहि क्रिया जाणून बुजून करूं नये, जागृत झालेली शक्ति ज्याप्रमाणे क्रिया करवून घेईल, त्या प्रमाणे होऊं द्यावें, होणाऱ्या कोणत्याही क्रियेला प्रतिबंध करु नये. अशी आज्ञा होती. उद्या दिक्षा मिळणार या आनंदात संबंध रात्रभर महाराजांना झोप लागली नाही. पहाटे सर्व नित्य नैमित्तिक कर्मे आटोपून स्नानानंतर आई व वडिलांना

ghagmaharaj.guru


नमस्कार करून, त्यांचे आशिर्वाद घेतलें. "आपल्या ग्रामदेवतेचे व कुलस्वामिनीचें" मनातल्या मनात स्मरण करून नमस्कार केला. दिक्षेसाठी बरोबर ६ वाजतां आसनांवर बसलें. थोडयाच वेळांत सर्व शरीर थरथरू लागलें व घामाच्या धारा वाहूं लागल्या, जसा जसा वेळ जावृ लागला, तस तशा दिव्य अनुभूती येवू लागल्या. डोळ्यांना त्रास न होणारा परंतु. अतिशय तेजस्वी प्रकाशाचा झोत आपल्या शरीरांत प्रवेश करीत आहे, असें दिसले. त्या प्रकाशाने आपल्या सर्व शरीरांत अमुलाग्र बदल होत असल्याचे त्यांना जाणवले, एक अनुभव संपतो, न संपतो तोच दुसऱ्या क्रिया होऊ लागल्या, शरीराची जोरदार हालचाल होऊ लागली, शरीर चक्राकार फिरण्याचा वेग ऐवढा प्रचंड होता कि क्रिया थांबवाबी म्हटली असती तरी ते शक्य नव्हते. त्या दिवशी योग शास्त्रांतील अनेक क्रिया आपोआप होत होत्या. बरोबर ३ तासांनी ज्यावेळी डोळे आपोआप उघडलें गेले, तेव्हां महाराज साधनेवरून उठले. अनेक त-हेचे दिव्य अनुभव घेतल्याचे समाधान त्यांना लाभले. आपले जीवन कृतार्थ होईल किंवा नाही याबद्दल आता मनांत कोणत्याही त-हेचा संदेह राहिला नाही.

पूर्णपणे ज्योवेळी परमेश्वराच्या सत्यस्वरूपाचे ज्ञानदर्शन होईल म्हणजे साक्षात्कार होईल, त्याचवेळी आपले जीवन कृतार्थ होईल ही महाराजांची धारणा होती. सर्व दिवस याच अवस्थेत गेला, सकाळ-दुपार-संध्याकाळ व रात्री अशी सतत साधना होऊ लागली. गावांतील घर एकांतात, व साधनेसाठी स्वतंत्र खोली होती. एवढे असल्यावर दुसरे काय हवे होते. रजेचा एक महिना केव्हां गेला तेच त्यांना समजले नाही. या एका महिन्याच्या कालावधीत दिवसेंदिवस महाराज स्वतःला जास्तीत जास्त वेळ कोंडून घेवू लागले. त्यांना बाह्य जगतांत कशातच रस वाटेनासा झाला साधनेत रोज नवीन नवीन अनुभव येवूं लागलें.



## दिक्षेनंतरचा साधना काळ

पूर्वी करीत असलेली योग शास्त्रांतील आसने, प्राणायाम व दिक्षेनंतर आपोआप होणारी आसने व प्राणायाम यांत जमीनअस्मानाचे अंतर असल्याचे जाणवू लागले. होणारा कुंभक इतका सहजतेने दिर्घ होऊ लागला की महाराज स्वतःच आश्चर्यचकित होत! केव्हां केव्हां मुखांतून मोठ्या आवाजाने होणाऱ्या ओमकारांने सर्व वातावरण बदलून जात असे. पूर्वी कष्ट साध्य, असणाऱ्या योग शास्त्रांतील क्रिया करण्यासाठी महाराज ज्या साधनांचा उपयोग करीत, त्यांच्या या साधनेत काहिच उपयोग नव्हता, निरनिराळ्या क्रियांनी मुद्रा साध्य होत होत्या.



एक दिवस साधनेच्या खोलींत साधनेला बसल्यानंतर शरीर उताणे आडवे झाले व सरकत सरकत हात काही तरी शोधूं लागले. हातांत खोलीत असलेली दर्भाची चटई लागली त्या चटईतील एक दर्भाची पात काढली गेली, हे सर्व महाराजांना समजत होते परंतु हे कशासाठी होत आहे, तेच समजत नव्हते. इतक्यांत तोंड उघडून ती दर्भाची पात जिभेच्या खाली जी शिवण असतें त्या ठिकाणी ठेवली गेली व दुसऱ्या हाताने एवढया जोरांत खेचली गेली किं जिभेची खालील शिवण कापली जावून तोंडातून भळाभळा रक्त वाहूं लागलें तेव्हां महाराजांच्या लक्षांत आले किं, "खेचरी मुद्रा" होण्यासाठी ही क्रिया झाली असावी. ही क्रिया होतांच महाराजांना थोडी भितीहि वाटली. लगेच आपल्या सदगुरूंची भेट घेवून त्यांना या क्रियेविषयी त्यांनी सांगितले. सदगुरूंच्या मुखावर आनंदाची छटा उमटली व म्हणाले किं, "कोणत्याही क्रियेबद्दल भिती बाळगतां कामा नये". ज्याप्रमाणे क्रिया होत असतील, त्याप्रमाणे त्या क्रिया निःसंकोचपणे होऊ द्याव्यात. कितीही अवघड क्रिया होत असली तरी मनांत भिती बाळगूं नये, त्या क्रियेला प्रतिबंधही करु नये. जर मन भ्याले तर कुंडलिनी शक्ति तशा त-हेची क्रिया पुन्हां कधीच होऊ देणार नाही, व त्या क्रियेची पुढील प्रगती खुंटेल.



त्या दिवसापासून होणाऱ्या कोणत्याहि क्रियेला महाराजांनी प्रतिबंध केला नाहीं. कामाचे आठ तास व इतर नित्य नैमित्तिक कर्मासाठी, २ ते ३ तास सोडल्यास रात्रंदिवस महाराजांची साधना चालूं होती. कामावर जातांना येतांना सतत अनुसंधानात असायचे. त्यावेळची अवस्था निराळीच होती. आत्मानुसंधानापासून वंचित करणाऱ्या ज्या ज्या गोष्टी होत्या त्या त्या गोष्टींचा त्यांनी पूर्वीच त्याग केलेला होता. आता ते जवळच्या माणसांनाही भेटत नसत. ऑफिस सुटल्याबरोबर, एकांत वासासाठी पाय नेतील तिकडे जाणारे, महाराज आता साधनेसाठी बरोबर ६ वाजतां घरी येऊ लागले. घरी येवून माईंनी केलेला चहा घेतला की हातपाय धुवून खोलीचे दार बंद करून साधनेला बसत असत. प्रथम प्रथम संध्याकाळी ७ वाजता साधनेला बसत असत व रात्रौ १० वाजतां उठत असत. व नंतर जेवण घेत असत. दिवसेंदिवस योगांतील अत्यंत गूढ क्रिया होऊ लागल्यामुळे साधनेचा वेळ वाढत जाऊ लागला. साधनेसाठी महाराज स्वत:ला जास्तीत जास्त वेळ कोंडून घेऊ लागले. रजेचा संपूर्ण दिवस साधनेत जावू लागला.

ghagmaharaj.guru



रात्रीच्या साधनेची वेळही वाढत चालली होती. एक दिवस असेंच साधनेवरून महाराज उठले. माई बसल्या स्थितीतच भिंतीला डोके टेकून झोपी गेल्या होत्या घडयाळांत पाहिले तो रात्रीचे पावणेदोन वाजले होते, माई उपाशीच, बसून झोप काढीत आहेत, हे पाहून महाराजांना अतिशय दुःख झाले. महाराज जेवल्याशिवाय माई कधीही अगोदर जेवत नाहीत. आपण कितीही सांगितले तरी माई अगोदर जेवणार नाहीत, याची महाराजांना कल्पना होती. महारांजांनी माईंना समजावून सांगतले कि मला आता एकवेळचे जेवण सोडावे लागेल. रा रात्री जेवल्यावर साधनेच्या क्रियांवर परिणाम होतात व अडथळे निर्माण होतात, म्हणून यापुढे मी रात्रीचे जेवण घेणार नाही. तू वेळेवर जेवत जा. अशा त-हेने सहा वर्षे महाराज फक्त एकवेळचे जेवण घेत असत. त्यामुळे शरीर कृश होत गेले. पण चेहऱ्यावरील तेज मात्र दिवसेंदिवस वाढत गेले. या सहा वर्षाच्या अवधीत महाराज कधीही जमिनीवर अंथरूण घालून झोपले नाहीत. साधनेतच, कोणत्या तरी आसनांत त्यांना थोडा वेळ निद्रा लागत असे व ती १-२ तासांची निद्रा संपल्यावर लगेच क्रियांना सुरुवात होत असे. यालाच योगनिद्रा म्हणतात.



## देवत्व प्राप्ती

अशा प्रकारे सहा वर्षात अनेक क्रिया होऊन, पुढे क्रिया होणे बंद झाले. आतां बाह्य क्रिया संपूर्ण बंद झाल्या होत्या. महाराज तासनतास डोळे बंद केलेल्या अवस्थेत बसलेले असत. आतां त्यांच्या वृत्तीत आमुलाग्र बदल झाला होता. समाधी अवस्थेतून उठल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर एक अलौकिक तेज दिसत असे. जन्मापासून अनेक तपे व व्रतें करून दीक्षा मिळून गेल्यावर ७ वर्षे खडतर साधना केल्यावरच एक दिवस त्यांना देवत्व प्राप्त झाले.

महाराजांबरोबर संसार करतांना माईंना कोणते अनुभव आले, हे त्यांच्याच शब्दांत दिलेले आहेत. माई सांगतात की, "लग्न झाल्यानंतर प्रत्येक दिवशी मनाला एक प्रकारची भिती वाटत असे की, परमेश्वर प्राप्तिसाठी वेडे झालेले माझे पती मला सोडून दूर निघून तर जाणार नाहीत ना. कोठे तरी वाचलें की संसारात पदार्पण केलेल्या गृहस्थाने आपल्या पत्नीला जोपर्यंत मूल होत नाही तोपर्यंत पुत्रप्राप्तीचा लाभ दिला नसेल तर त्याला संन्यास घेता येणार नाही. ते एक पाप ठरेल, माझे पती जरी ज्ञानी होते तरी सुध्दा कदाचित वरील गोष्टीचे विस्मरण झाले तर? म्हणून मी केव्हां केव्हां त्यांना आठवण

देत असे, तेव्हा ते म्हणायचे कि, "या सर्व पळवाटा आहेत. प्रत्येक मनुष्य आपल्या पूर्व कर्मानुसार जीवन जगत असतो, तुम्ही सुध्दा पूर्व ऋणानुबंधनानेच माझ्या संबंधात आला आहांत. जोपर्यंत हे ऋणानुबंध आहेत तोपर्यंत आपण एके ठिकाणी रहाणार आहोत. तेव्हा उगाचच मनामध्ये भिती किंवा खेद न बाळगतां प्रारब्ध कर्मानुसार आपले जीवन जगण्याची तयारी ठेवा."

अशा त-हेने लग्न होवून चार वर्षे निघून गेली. पांचव्या वर्षी मला दिवस गेले. वास्तविक मला आनंद व्हावयास पाहिजे होता. तशा सुखद संवेदना होत होत्या, परंतु मध्येच कुठें तरी शंकेची पाल चुकचुकल्यासारखे व्हायचे. मला जर मुलगा झाला तर हे आपण यांच्या ऋणातून मुक्त झालो, असे समजून निघून तर जाणार नाहीत ना अशी शंका आली की, मी बैचेन होत असे. परंतु मीच मनाला धीर देत असे की असे काही घडणार नाही. माझ्या पाहिल्या मुलीचे नांव उज्ज्वला. ही उज्वला पोटांत असतानांत माइया पतींच्या दैवी सामर्थ्याचे दर्शन झाले, प्रसंग असा होता.

### माईंना आलेले देवी अनुभव

मला पांचवा महिना लागला होता व मला ताप येवू लागला. २ दिवस १०२ पर्यंत सबंध दिवस ताप असायचा. डॉ. मिस वगळ यांचे औषध चालू होते. माझी बहीण व मी डॉक्टरांकडून औषध आणायला जात होतो. परंतु तिसऱ्या दिवसानंतर तापामुळे माझ्यातले त्राणच नाहीसे झाले. आतां डॉक्टरच रोज घरी येऊन तपासून मला इंजेकशन व औषध देवू लागल्या. परंतु ताप उतरण्याचे कोणतेही चिन्ह दिसत नव्हते. मी माइया पतींचा "पती" या नात्याने उल्लेख न करतां, "महाराज" असा उल्लेख करणार आहे. महाराज रोज आपले नित्य नैमित्तिक आटोपून माझ्या आजाराविषयी माइया जवळ चौकशी करून व औषधे घेण्याचा व तापमान नोंद करून ठेवण्याच्या सूचना देऊन कामावर निघून जात. संध्याकाळी परत आल्यावर शांताने (म्हणजे माझ्या बहिणीने) लिहिलेले २ तासांच्या अंतराने मापलेल्या तापाची नोंद ते पहात असत. आतां रोज ताप २ ते ३ पर्यंत चढत असे व कमीत कमी दोन पर्यंत येत असे. औषधाचा गुण काही पडत नव्हता. माझे मन मात्र घाबरू लागले. आपण या आजारांतून काही जगत नाही, असे वाटू लागले. मला वाईट भितीदायक स्वप्ने पडू लागली. ताप येवू लागल्याला ७ वा दिवस असेल, आज रजा असल्यामुळे महाराज माझ्या बाजूला बसून "कोलन" वॉटरची घडी माझ्या कपाळावर ठेवत होते. मी त्यांना म्हणाले की या आजारातून मी उठेन असे मला वाटत नाही. स्वप्नांत कोणी तरी काळा माणूस येवून तो मला ओढीत नेत असल्याचे दिसते, त्यामुळे मला फार भिती वाटते. आपण एवढी परमेश्वराची भक्ति करतां, तो आपले नाही का ऐकणार? क्षणभर महाराज स्तब्ध झाले. त्यांचा चेहरा गंभीर होत गेला. ते माझ्याशी बोलू लागले की, "हे पहा "गीता" मी जो भक्ती करतो ती काही संसारातील सुखे मिळावीत म्हणून करीत नाही." तुझे आयुष्य तेवढेच असेल तर मी काही तुझे आयुष्य वाढावे असे भगवंताला

सांगणार नाही. जसे त्याला करावयाचे असेल त्याप्रमाणे करील. मी त्यांच्या पुढे काही बोलू शकत नव्हते. परंतु माझ्या तोंडातून सहज शब्द बाहेर पडले की माझे आयुष्यच तेवढे असेल तर मला बरे वाटावे अशी विनंती मी आपणाला करणार नाही. परंतु एका दृष्ट अदृष्य शक्तीकडून आपल्याला त्रास होवून अपघाती मृत्यू म्हणतात, तसा जर मला आला तर? हे शब्द ऐकतांच आपल्याच तंद्रीत असणारे महाराज एकदम भानावर आल्यासारखे झाले व एकदम एवढ्या आत्मविश्वासाने म्हणाले की, जगांतील अशी कोणती दुष्ट शक्ति तुला अपघाताने माझ्यापासून हिरावून नेऊ शकेल? तुझा माझ्यावर विश्वास आहे ना मग तू निश्चिन्त रहा."



असेच आणखी दोन दिवस गेले, ताप काही कमी होण्याचे चिन्ह दिसेना, उलट त्या दिवशी १०५ ताप चढला. गुरुवारचा दिवस होता. त्या दिवशी डॉक्टरनी माझ्या बहिणीला सांगितले कि संध्याकाळी यांचे यजमान आले की तुझ्या बहिणीला हॉस्पिटलमध्ये भरती करा. विशेष म्हणजे माझा मोठा भाऊही त्या दिवशी माझ्या जवळच होता. डॉक्टरच्या औषधांनी ताप उतरत नाही, म्हणून तो त्या दिवशी एका मोठ्या मांत्रिकाकडे गेला होता. संध्याकाळची वेळ होती. मी तापाने फणफणले होते. पोटांत असलेल्या गर्भाबद्दल मनांत भिती वाटत होती. गरोदर स्त्रियांना २-३ डिग्री ताप जर सतत राहील तर गर्भपात होण्याची शक्यता असते. मला आज १२ दिवस १०२ डिग्री खाली ताप उतरला नव्हता. महाराज कामावरून घरी आले होते. आल्याबरोबर माझी चौकशी केली. अंगाला हात लावून पाहिला व शांताने नोंदलेल्या संबंध दिवसाच्या तापाची नोंदणी पाहिली. डॉक्टरनी सांगितलेले त्यांना शांताने निवेदन केले. तरीही ते स्नानाला गेले. दर गुरूवारी, स्नान करून देवाची आरती पूर्वी पासून ते करीत असत. स्नान झाल्यानंतर, त्यांनी ताम्हणांत निरंजन पेटविले, इतक्यांत माझा भाऊ बाहेरून माझ्या जवळ आला व माझ्या कानाजवळ तोंड आणून हळू आवाजात सांगू लागला की, "मी एका मांत्रिकाकडे जाऊन आलो." त्याने सांगतले की डॉक्टरांच्या औषधाचा गुण येणार नाही. कारण त्यांच्या घराण्यांत पूर्वी पासून एक जबरदस्त सैतानी शक्ति वावरत आहे. तीच तुझ्या बहिणीला त्रास देत आहे. जर हा ताईत तिच्या गळ्यात बांधशील तर तिला औषधाचा गुण येऊन बरे वाटू लागेल." मी त्याला म्हणाले की, "ही गोष्ट त्यांना आवडणार नाही. तू त्यांना सांगून पहा. भावाने ही गोष्ट त्यांना सांगताच त्यांचा चेहरा रागाने लालबुंद होवू लागला - त्यांनी भावाला शांतपणे सांगतले की, "तुम्ही तांत्रिकाकडे जावून आलात त्याबवृदल मी तुमच्या भावना समजू शकतो. तुम्ही फार चांगली गोष्ट केलीत. मला कोणाचाही अपमान होईल असे वागावयाचे नाही. परंतु तुम्ही आणलेली वस्तू या घरांत आणू नका!" त्या प्रमाणे ती वस्तू घेवून तो ताबडतोब बाहेर गेला. तबकांत पेटविलेले निरंजन घेवून ते देवासमोर गेले व आरतीला सुरुवात न

करताच विस्फारित नेत्राने दत्तात्रेयांच्या फोटोकडे पहात राहिले. त्यांचे सर्वांग थरथरत होते. चेहरा रागाने लालबुंद झाला होता. रागाने त्यांच्या तोंडून बाहेर पडणारे शब्द मला ऐकू येत होते. "आज पर्यंत तुझ्या भेटी व्यतिरिक्त कोणतीच इच्छा ठेवून मी तुझी भक्ति केलेली नाही."अनन्यश्चिंतयतो मां ये जना पर्युपासते तेषां नित्याभियुक्ता योगक्षेम वह्यम्यहं "हे ब्रीद बाळगणाऱ्या तू झोपलास कां? असा प्रश्न त्यांनी विचारला. ज्या भक्ताच्या घरी तुझे वास्तव्य असायला पाहिजे, त्या ठिकाणी जर आसुरी शक्तिचा प्रवेश होऊन जर अपघात होऊ लागतील तर तुझी भक्ति कोण करेल? आतां मात्र त्यांचे भान नाहिसे होऊ लागले होते. जवळच असलेली, माइयासाठी आणलेली औषधे त्यांनी आपल्या हातात घेतली व औषधाच्या पुड्या 'खिडकीतून बाहेर फेकून दिल्या औषधाची बाटली फोडून टाकली, शिवाय आणलेली सर्व इंजेक्शनचा फोडून चक्काचूर केला. या त्यांच्या कृतीकडे पाहून आम्ही सर्व घाबरून गेलो. ते देवासमोर उभे राहिले व माणसांजवळ आपण बोलतो तसे बोलू लागले. प्रत्यक्ष परमेश्वराला ते बजावत होते की, "याद राख! जर माझ्या पत्नीला वाईट शक्तिंमुळे अपघाती मृत्यू आला तर या जगात परमेश्वर नांवाची काही चीज आहे असे मी मानणार नाही. तुझी भक्ति करणाऱ्यांचे वाईट शक्तींकडून तू संरक्षण करूच शकत नाहीस, अशी माझी समजूत होईल! तुझ्यापुढे अशी कोणती शक्ति आहे की ती आपला प्रभाव दाखवू शकेल. जर १५ मिनिटांत माइया पत्नीचा ताप उतरला नाही तर १६ व्या मिनिटाला तुझे फोटो, तुझी मूर्ती व माझ्या मनांत असणारी तुझी भक्ती यांना समुद्रात नेवून सोडीन. सर्वाना तुझ्या भक्तिपेक्षा आसूरी शक्तींना भजण्यासाठी सांगेन व ते रागाने थरथरत तसेंच देवासमोर उभे होते. आम्ही सर्वजण भितीने गांगरून गेलो होतो. आश्चर्य वाटेल, १० मिनिटे त्याच अवस्थेत गेली असतील, इतक्या माझ्या अंगातून घामाच्या धारा वाहूं लागल्या. मी हळूच त्यांना हाक मारू सांगितले की मला घाम येत आहे. तरीसुध्दा ३ मिनिटे ते तशाच अवस्थेत उभे होते. माझे अंथरूण बदलतां का? घामाने सर्व भिजून गेले आहे. हे शब्द कानी पडतांच, त्यांच्या चेहऱ्यावरील भाव बदलू लागले, रागाचे रूपांतर कृतज्ञतेत झाले. त्यांच्या ठिकाणी अष्टसात्विक भाव उफाळून येवून त्यांच्या नेत्रांतून अश्रूधारा वाहूं लागल्या. परमेश्वराला सुध्दा आपल्या भक्तांकडून अधिकार गाजवून घेण्याची हौस आहे का? अशी पृच्छा त्यांनी माझ्याकडे केली.

लगेच माझे सर्व घामाने भिजलेले कपडे बदलले, ताप कमी होवू लागला. २ तासांत माझा संपूर्ण ताप निघाला. तो परत भरला नाही. औघधे बंद झाली. आज या गोष्टीला २८ वर्षे झाली. त्या दिवसापासून जो ताप गेला तो आजमितीपर्यंत. त्यानंतर मला ताप कसा तो माहित नाही. परमेश्वराजवळ पितापुत्राचे नाते जोडलेल्या साधकांचा आपल्या पित्यावर म्हणजे परमेश्वरावर केवढा अधिकार चालतो व मोठय़ा प्रेमाने तोही अधिकार चालवून घेतो, प्रत्येंतर त्या दिवशी मला आले. एक अनुभव संपला आणि अनेक अनुभवांची मालिकाच सुरू झाली.



## आईंना आलेले अनुभव -त्यांच्याच शब्दांत

महाराजांच्या वैरागी वृत्तिमुळे म्हणजे वडिलांच्या मालमत्तेतील कोणत्याही प्रकारच्या अपेक्षा नव्हत्या. त्यांच्या मिळणाऱ्या तुटपुंज्या कमाईवरच घरसंसार चालवावा लागत असे. माझ्या संसारांत त्यावेळी आम्ही तिघे म्हणजे महाराज, मी व माझी मुलगी उज्वला, तसेच कोणाचाही आसरा नसलेली माझी बहीण शांता व वडील दिरांचा चि. अविनाश असे पाच जण होतो. परिस्थिती नाजूकच होती. बहुतेक तो दिवस रजेचा असावा, दुपारी जेवण झाल्यावर महाराज वामकुक्षी घेत होते. मीही काम आटोपून त्यांचे पाय चेपीत बसले होते. मनांत विचारांची चक्रे चालू होती की आपल्या संसाराचे, आपले कसे होणार? या सर्व सामान्य स्रीच्या मनांत येणाऱ्या प्रमाणे, मी सहजच त्यांना म्हणाले की, आपण परमेश्वराची एवढी भक्ति करता, मग आपली परिस्थिती अशी का? त्यांनी किंचित डोळे उघडले व मला म्हणाले की, "पैसा मिळून आपली परिस्थिती सुधारावी म्हणून का आपण परमेश्वराची भक्ति करतो?" या त्यांच्या प्रतिप्रश्नाने त्यांना काय उत्तर द्यावे हेच कळत नव्हते व माझे तरी कुठे चुकले होते? सर्व सर्वसामान्य स्त्रीच्या मनांत या अपेक्षा असणारच. मी सर्व सामान्य स्री आहे. हा विचार माझ्या मनांत येतांच दुसऱ्याच्या मनांतील विचार झटकन ओळखणाऱ्या माझ्या अंतर्ज्ञानी पतींनी बोलण्यास सुरुवात केली की, "गीता, मी तुला सामान्य स्री समजत नाही. परमेश्वर ज्या स्थितीत ठेवील त्या स्थितीत आनंदाने रहाण्याचे शिकले पाहिजे. त्याचें आपल्या भक्तांच्या संसारावर सतत लक्ष असते." एकदम विषय बदलून म्हणाले, "आपली उज्वला कोठे आहे, ती काय करते आहे, ते बघ" ती खोलीच्या बाहेर खेळते आहे. त्यावेळी उज्वला दीड वर्षाची होती. मी लगेच बाहेर जावून पाहिले, तो उज्वलाच्या हातात दाढी करावयाचे ब्लेड होते. ते ती तोंडात घालून ते चावण्याच्या तयारीत होती. मी घाबरून ओरडलेच पण त्यांनी आतूनच सांगितले की प्रथम ते ब्लेड तोंडातून बाहेर काढ. लगेच मी एका हाताने तीचे गाल दाबून तोंड उघडले, दुसऱ्या हाताने ते ब्लेड काढून फेकून दिले व सुटकेचा सुस्कारा सोडला. मी तिला घेवून घरात आले व म्हणाले, "परमेश्वराची कृपा" तेव्हा त्यांनी विचारले की तिच्या तोंडाला काही लागले आहे का?, मी म्हणाले किं, काही लागलें नाही. मला त्यानी बसण्यास सांगितले आणि विचारलें कि ब्लेडची धार किती तीक्ष्ण असते, जरा जरी शरिराला लागले तर त्या ठिकाणी जखम होऊन रक्त येते. इथे तर तुझ्या मुलीने सरळ तोंडात ते धरले होते मग त्या ठिकाणी रक्त वैगेरे कसें नाही? तीच्या तोंडात ब्लेडने जखम न होण्यासाठी वज्र कोणी निर्माण केले?

मो या त्यांच्या प्रश्नांनी निरुत्तर झाले होते. परमेश्वरांविषयी प्रत्येक प्रसंगाने माझ्या मनांत दृढ श्रध्दा निर्माण केली होती. त्या परमात्म्यावरच्या प्रेमाची बीजे रूजली जात होती. प्रत्येक प्रसंगाने

महाराजांच्या ठिकाणी असणाऱ्या दैवी गुणांचे दर्शन होत होते. प्रसंग तसा पाहिला तर लहानच होता, परंतु त्यांच्या महानतेची मला साक्ष पटली होती. जागेवर मिटून पडल्या पडल्या त्यांना आपली मुलगी तोंडात ब्लेड घालते आहे हे दिसले, तेव्हांच मी समजलें की, माझ्या पतीना अंतरज्ञान आहे, त्याचबरोबर कोणत्याही प्रसंगाने न डगमून जाणाऱ्या त्यांचे धैर्य, व परमेश्वराविषयी नितांत भक्ति श्रध्दा, अशा अनेक गोष्टींचे अनुभव महाराजाबद्दल येत गेले.

पुढे असेच निरनिराळे चमत्कार घडत जात होते, घरात अचानक सुगंध दरवळू लागें, केव्हां चंदन, केव्हां गुलाब, मोगरा किंवा ज्या सुगंधाविषयी निश्चित नांव सांगता येणार नाही. परंतु मनाला धूंद करणारा सुगंध सबंध दिवस व रात्र दरवळत असे. घरांतील वातावरण शांत आणि प्रसन्न असे.

उज्वलाचा आपल्या वडिलांकडे तसा जास्तच ओढा होता. अगदी लहान असल्यापासून त्यांच्या घरी येण्याच्या वाटेकडे डोळे लावून ती वाट पहात बसायची. त्यांची मुर्ती येताना दिसली किं आनंदाने नांचू लागायची. आल्याबरोबर ते ही तिला उचलून घेत असत. परंतु त्यांच्या नियमात केव्हांही बदल झालेला नव्हता. संध्याकाळी ध्यानावस्थते बसलेल्या महाराजांच्या मांडिवर माझा डोळा चुकवून ती बसत असे. तरीहि महाराज ध्यानस्थच असत. उठल्यावर विचारलें कि तुम्हांला त्रास होत नाही कां? तर ते हसत म्हणायचे, "अग प्रत्येक जीव हा ईश्वरी अंश आहे". त्या ईश्वराला जर माझ्या शरीराच्या स्पर्शाचा हव्यास असेल तर मी त्रास मानुन कसें चालेल. त्याला त्याचा आनंद मिळतो, व मी माझा आनंद मिळविण्याचा प्रयत्न करतो. त्यांत त्रास मानण्यासारखें काय आहे?

तेंव्हा माझ्या लक्षात आलें की मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरांत ज्या ठिकाणी सतत धकाधकीचे जीवन जगावे लागते. माणसांच्या, कारखान्याच्या, वाहनांच्या गोंगाटात सुध्दा सर्व विसरून आपल्या आत्मानंदात राहाणाऱ्या महाराजांच्या एकाग्रतेबद्दल कौतूक वाटत असे.

उज्वला आता चार वर्षांची झाली होती या मधल्या काळांत तीन मंत्र सिध्दीची अनुष्ठाने व २-३ वेळां चांद्रायणे व एक वेळा अर्धचांद्रायण त्यांनी केले. चांद्रायण म्हणजे प्रतिपदेला सबंध दिवसात एक घांस अन्न, आणि द्वितीयेला दोन घांस, असे प्रत्येक तिथीला एक 'एक घास अन्न वाढवून पौर्णिमेला १५ घांस अन्न ते घेत असत. परत पौर्णिमेनंतरच्या प्रत्येक तिथीला एक-एक घांस अन्न कमी करीत जावून अमावास्येला फक्त एक घांसच अन्न घेत. याला ते चांद्रायण म्हणत प्रत्येक वर्षाला असे एकदा ते चांद्रायण करीत असत, त्यामुळें त्यांची प्रकृती म्हणजे तोळा मासाच होत असे. परंतु या काळांत सुध्दां ते नोकरीवर जात.

आता मला दिवस गेले होते. याच काळांत आम्ही काही. तिर्थश्रेत्राच्या ठिकाणी जावून आलो. केव्हां केव्हां आमच्या घरी योगी, संन्यासी येत असत. त्याचप्रमाणें मंत्रशास्त्राची चर्चा करणारें व भक्तिमार्गातील काही जिज्ञासूही येत. त्यांच्यासोबत होणाऱ्या चर्चाही मोठ्या मनोरंजक असत. त्यामुळें

माझ्याही ज्ञानात भर पडत होती. एक दिवस मी झोपलें असतांना, आमची कुलस्वामिनी "भवानी" स्वप्नात आली, आणि मला सांगतले किं मुली, यावेळीसुद्धा मी तुला मुलगीच देणार आहे, एक सुंदर मुलगी भवानी आईने माझ्या हातांत दिली, व सांगितले कि पुढच्या वेळी तुला मुलगा देईन. देवी अन्तरधान पावली. मी जागी झाले, मनाला खुप आनंद झाला होता. कारण महाराज पूत्र प्राप्तिनंतर निघून जातील ही भीती पुढे ढकलली होती. पुत्र होणार याची ग्वाही सुध्दां जगन्मातेने दिली होती. त्यामुळें आनंदही झाला होता. माझी दुसरी मुलगी अनिलाच्यावेळी ६ वा महिना संपुन सातवा लागला होता, त्याच वेळी माझो प्रकृती त्रास देवू लागली. ही गोष्ट लगेचच महाराजांच्या कानावर घातली. त्यांनी मला एक मंत्र दिला व दहा दिवसांचे एक अनुष्ठान माझ्याकडून करवून घेतले. ते पूर्ण होताच माझी प्रकृती पूर्ववत् चांगली झाली.



आमच्या घराण्यात ज्याप्रमाणे एक चांगली शक्ति वावरत असे, त्याचप्रमाणे पूर्वापार पासुन एक जबरदस्त पिशाच्च शक्तीही वास करते हे मला माझ्या घरांतील वडील मंडळीनी सांगितले !!समजले!! माझे मोठे दिर व जाऊबाई त्या सैतानी शक्तिमुळे फ़ारच हैराण होत असत. माझ्या सासूबाईही त्या पिशाच्याच्या विध्वंसक कार्याबद्दल मला नेहमी सांगत असत. आम्हांला त्या शक्तीचा खूपच त्रास होत असे. त्यांतल्या त्यांत माझ्या गरोदरपणी, परंतु महाराजांच्या आध्यात्मिक शक्तीमुळे ते आमचा घात करूं शकलें नाही. योग्यवेळी सुखरूपणे अनिलाचा जन्म झाला. देवीने स्वप्नांत ज्याप्रमाणे मुलगी माझ्या हातात दिली अगदी तशीच होती.

## योगीनी अम्मा यांच्या कुटीतील अनुभव

पूजनीय योगीनी लक्ष्मी अम्मा ही एक रमणमहर्षिंची शिष्या होती. महर्षिंची समाधी कालानंतर त्या स्वामी नित्यानंदाच्या दर्शनाला आल्या. काही दिवस वज्रेश्वरी राहिल्यानंतर त्या ज्या कोठे गेल्या ते कोणाला कळलेच नाही. एक दिवस त्यांचे चांदीप जवळील तुंगारेश्वराच्या जंगलात वास्तव्य असल्याचे महाराजांना समजले. त्यानी मला सांगितले कि उद्या पहाटेच मी लक्ष्मी अम्माला भेटण्यासाठी जाणार आहे. रात्री येण्यास उशीर होईल. त्याप्रमाणें ते लक्ष्मी अम्माला भेटूनही आले ५-६ दिवसानंतर एक दिवस मला म्हणाले कि, "लक्ष्मी अम्माच्या दर्शनाला तूही चल." मला खुप आनंद झाला. दुसऱ्या दिवशी आमच्या दोन्ही मुलीना बरोबर घेवून निघालो. त्यावेळी उज्वला ६ वर्षांची असेल व अनिला दीड वर्षांची. मुंबईहून वज्रेश्वरीला निघालो. वज्रेश्वरीला जातांना मध्येच चांदीप हे गांव आहे. आम्ही ज्यावेळी मोटारीतून उतरलो तेव्हां रिमझिम पाऊस पडत होता. रस्ता असा नव्हताच. शेताच्या बांधावरून अरुंद व खाच-

खळग्यातून आपला तोल सांभाळून चालावे लागत होते. उज्वलाला महाराजांनी उचलून घेतले होते, अन् मी अनिलाला. पावसाची रिपरिप चालूच होती. एका हातात छत्री दुसऱ्या हातात अनिलाला उचलून घेतलेली, खाकेला पिशवी, त्यांत अम्मासाठी भेटीदाखल घेतलेल्या काही वस्तू, भुकेची वेळ निभावून नेण्यासाठी लागणारे खाणे. शेत संपल्यानंतर डोंगर पायथ्याचा भाग तसा चालण्यास जरा अवघडच. मध्येच डोंगर उतारावरून वहाणारा ओढा. हे सर्व पार करुन, एकदम दाट झाडीत लपलेल्या लक्ष्मी अम्मा कुटीजवळच असलेल्या भव्य वटवृक्षाखाली बसल्या होत्या.

आम्हाला पाहताच त्यांनी, महाराजांना "कृष्णा" म्हणून हांक मारली. त्या प्रत्येकाला "कृष्णा"च म्हणत असत. आम्ही उभयतांनी त्या वृध्द लक्ष्मी अम्माच्या चरणावर मस्तक ठेवून नमस्कार केला. मुलीनांही त्यांच्या चरणावर घातले. आमच्या आगमनाने अम्माला खूप आनंद झाल्याचे दिसले. त्या जंगलात क्वचितच, एखादा माणूस अम्माच्या दर्शनाला जात असे. एवढ्या दाट जंगलात, एक साधी कुडाची झोपडी बांधून राहातात कशा, हेच मला कळेना. आम्ही जेवण्यासाठी नेलेले डाळ, तांदूळ व इतर सामान अम्माच्या स्वाधीन केले. आम्ही झोपडीत बसून होतो. अम्मा स्वतःच जेवण करीत असत. त्यांनी थोडयाच वेळात आम्हाला जेवण्यासाठी खिचडी करून वाढली. अम्माच्या हाताला अमृताची चव असावी असे वाटले. दुपारी मुले झोपली होती. अम्मा, महाराज व मी त्या वटवृक्षाखाली जमिनीवर बसलो होतो.

अम्माच्या व महाराजांच्या, योगसिद्धीबद्दल काही गोष्टी चालल्या होत्या. त्यांच्या गोष्टीवरून अम्मा म्हणजे योगशास्त्रात फारच मोठी प्रगती केलेली एक योगीनी आहे, हे तेव्हां माझ्या लक्षांत आले. आणि एवढ्या किर्र जंगलात त्या तिथे एकटयाच रहातात याचे मला खूपच आश्चर्य वाटले. शिवाय तिथे अनेक हिंस्त्र पशू, तसेच सरपटणाऱ्या प्राण्यांचे वास्तव्य असतांना सुध्दा, त्या इतक्या सहजतेने तिथे रहातात यांतच त्यांचे दैवी सामर्थ्य दिसून येत होते. संध्याकाळी ' जेवणाला नुसते पिठले भात केले होते. आम्ही ते खाल्ले. जस जशी रात्र पडू लागली, तस तशी मला भिती वाटू लागली. झोपडीत पणती होती, तिचाच काय तो एक प्रकाश. घोंगडी टाकून त्यावर मुलांना मी झोपविले. अम्माने मला सांगितले कि झोप आता. उद्या सकाळी काशीवरून एक मोठे पाहुणे येणार आहेत. कृष्णाच्या म्हणजे महाराजांच्या हाताने मी त्यांना जेवू घालणार आहे. मी घोंगडीवर आडवी झाले, परंतु झोप काही येईना. झोपडीच्या बाहेर कोठे तरी मधूनच सरपटण्याचा आवाज येत होता, तर केव्हां लांबून वाघाच्या डरकाळयांचा आवाज यायचा, मी तर पुरती घाबरून गेले. माझ्या चेहऱ्यावरील भाव त्या मिणमिणत्या प्रकाशांत सुध्दां अम्मांनी बरोबर हेरले. मला धीर देवून त्या म्हणाल्या, घाबरू नको. इथले सर्व प्राणी प्रेमळ आहेत. ते तुला काहीही करणार नाहीत.

अम्माचे व कृष्णाचे (महाराजांचे) बराच वेळ कोणत्यातरी गूढ विषयावर बोलणे चालले होते. सकाळी ५ च्या सुमारास महाराजांनी मला हलवून जागे केले, तेव्हां बाहेर अंधारच होता. तोंड धुवून अम्माने केलेला चहा घेतला. "आज श्रावणातील शिवरात्री आहे", अम्मा म्हणाल्या, "आज काशीवरून पाहुणे येणार आहेत म्हणून तुम्हाला मी ठेवून घेतले." त्या आनंदात दिसल्या.

आज रात्रीपासून पाऊस असा नव्हताच मुळी. मीही अम्मानी पेटविलेल्या चुलीवर थोडे पाणी कोमट केले. चूल म्हणजे तीन दगड मांडून त्यावर टोप ठेवले. पाणी गरम झाल्यावर स्नान केले, तोपर्यन्त उजाडले होते. अम्मानी, हांक मारली, "गिताई आता दूध येईल ते गरम कर." प्रथम त्यातील येणाऱ्या पाहुण्यांना देवू व मग थोडे मुलीना दे. मुली अजून झोपल्या होत्या, उज्वलाला उठवून स्नान घातले, त्यावेळी महाराज वटवृक्षाखाली एक पुरातन मोठी शंकराची पिंडी होती, तिथे ध्यानाला बसलेले होते. अम्मा त्या पिंडीची पूजा करत होत्या. पूजा झाल्यावर अम्मांनी ध्यानांत असलेल्या महाराजांना कृष्णा म्हणून हाक मारली. पाहुणे येण्याची वेळ झाली, असे त्या म्हणाल्या. यावेळेपर्यन्त गावांतून कोणीतरी अम्मांनसाठी दूध आणुन दिले. आजूबाजूच्या गावांतून अम्मांनसाठी काही लोक जीवनावश्यक वस्तू आणून देत असत.



दूध पेल्यात ओतून मी घेवून बाहेर अम्माजवळ दिले. अम्माने तो पेला महाराजांच्या हातात दिला व दुर्वांची एक जुडी दिली व सांगतले, "कृष्णा, जवळ वारुळे असलेले वृक्ष आहे ना तिथे जावून येणाऱ्या शिवपार्वतीला हे दूध दे, महाराज तो पेला घेवून वारूळे असलेल्या वृक्षाजवळ गेले. खरोखरच त्या वारूळांतून दोन सर्प एक फणा उभारलेला आणि दुसरा फणा न उभारलेला. बहुधा ती नर-मादी असावी, असे मला वाटले. अम्माच्या सूचनेप्रमाणे महाराजांनी दुर्वा दुधांत बुडवून त्यांतील दूध त्या सर्पाच्या मुखावर सोडले, त्यांनी आपल्या जीभा बाहेर काढून ते दूध पिवू लागले, असे तीन वेळा केल्यावर - अम्माने पेला त्यांच्या पुढयात ठेवण्यास सांगतले. पेला पुढयात ठेवतांच त्या दोघांनीही आपल्या जिभांनी ते पेल्यातील दूध संपविले. आम्ही सर्वानी नमस्कार केला, थोडयाच वेळांत ते दोन्ही सर्प वारूळांतील बिळात निघून गेले. महाशिवरात्रीच्या दिवशी अम्मानी आम्हांला शिव-पार्वतीचे दर्शन घडविले त्यांतच त्यांच्या देवी सामर्थ्याचे दर्शन घडले- दुपारपर्यन्त आम्ही अम्माच्या सहवासांत घालविला. अम्माचा आशीर्वाद घेवून मुंबईला निघून आलो, येतांना अम्माने मला आपल्या हृदयाशी धरून माझ्या डोक्यावरून हात फिरवीत म्हणाली,. गीताई तुझ्या पूर्वजन्माची पुण्याई फार थोर आहे, म्हणूनच त्या माझ्या कृष्णाजवळ तुझे लग्न झाले, त्याला जप. तो एक महान योगी आहे. माझा तुला आशीर्वाद आहे.

परमेश्वर प्राप्तिसाठी एकांतात कठोर साधना करणाऱ्या लक्ष्मी अम्माचाच विचार माझ्या मनांत सारखा घोळत होता. भिती वाटू लागली किं, माझे पतीही एकांतवासासाठी असे घरांतून निघून जाणार नाहीत ना.

अनिलाच्या नंतर अजित झाला त्याचवेळी महाराजांना गुरुप्राप्ति झाली. आता त्यांची "साधना" चार भिंतीच्या आंत स्वत:ला कोंडून घेवून रात्रंदिवस होऊ लागली. मी निश्चिंत झाले होते ते एवढयासाठीच कि गुरुप्राप्तिसाठी महाराज आतां कोठेहि जाणार नव्हते. साधनेतच सामान्य माणसाला भिती वाटेल अशा त-हेच्या अनेक क्रिया त्यांना होत असत. या क्रियेच्या वेळी होणाऱ्या आघाताने त्यांच्या डोक्याला व इतर शरीराच्या भागाला जखमा होत असत. परंतु त्यासाठी त्यांनी केव्हांही औषधोपचार केला नाही. त्या आपोआप बऱ्या होत असत.

संविकल्प समाधी अवस्थेतून प्रगत होत असताना, त्याना आता निर्विकल्प समाधी अवस्थेचा लाभ घेऊ लागल्याचे, त्यांनी माझ्याजवळ केलेल्या चर्चेवरून मला समजले. ज्या समाधी अवस्थेमध्ये भेदभाव रहातो, म्हणजे हा ईश्वर व मी त्यांचे ध्यान करतो ही भावना असते. ईश्वर व मी यांच्यात भेदभावाची भावना रहाते. त्याला "संविकल्प समाधी" असे म्हणतात. ज्या समाधीच्यावेळी ईश्वराच्या रूपांत पूर्ण लीन झाल्याचा अनुभव येतो, त्याला '"निर्विकल्प" समाधी असे म्हणतात. यावेळी मी साधक व हा ईश्वर असा भेदभाव रहात नाही.

## नाशिकचा अनुभव



असेच, एके दिवशी ते मला म्हणाले, की उद्या नशिकला जायचे आहे, तूही बरोबर चल. दुसऱ्या दिवशी आम्ही दोघे तीन्ही मुलांना बरोबर घेवून नाशिकला गेलो. तिथे मुंबईच्या त्यांच्या एका ओळखीच्या गृहस्थांचा रिकामा बंगला होता. तो त्याने आम्हांला रहाण्यासाठी दिला. हा प्रशस्त बंगला तसा मध्य वस्तीतच होता. त्या दिवशी आम्ही गोदावरीवर स्नान करून प्रभू रामचंद्राचे दर्शन घेतले, व परत बंगल्यावर आलो. दुपारनंतर आम्ही बाहेर असे पडलोंच नाही. तिथे जेवणासाठी भांडी व स्टोव्ह होता. मी सकाळच्या जेवणांत फक्त डाळभात केला होता. दुपारी जेवणे झाली. मी आराम करण्यासाठी आडवी झाले. महाराज कसले तरी पुस्तक वाचीत बसले होते. संध्याकाळी इतर देवळात जावून दर्शन घेतले, व घरी आलो. रात्रौ ९ च्या सुमारास जेवणे झाली. महाराज मला म्हणाले आता तू झोप - सकाळी आपल्याला त्रम्बक्रेश्वरला जायचे आहे. मी मुलांना घेवून झोपी गेले. सबंध दिवसाच्या श्रमामुळे मला लवकरच झोप लागली. हे सुभगे जागी हो. हे शब्द कानांवर पडतांच मी खडबडून जागी झाले. आसमंतात निरव शांतता पसरली होती. मी

ghagmaharaj.guru

जेव्हां जागी झाले. तेव्हा त्या प्रशस्त खोलीत अंधार होता. सर्वत्र सुगंध दरवळत होता. इतक्यांत त्या अंधारमय खोलीत मला असंख्य विदयुत शलाका दिसू लागल्या, त्यांचा प्रवाह ज्या ठिकाणी महाराज समाधि अवस्थेंत बसले होते, त्यांच्याकडे होता. त्या तेजस्वी शलाका महाराजांच्या शरिरात प्रवेश करतांना दिसत होत्या. इतक्यांत महाराज ज्या ठिकाणी बसले होते, त्यांच्या पाठीमागे एका पुरूषाची आकृती दिसू लागली. ६ फुट उंचीची, शुभ्र वस्त्र परिधान केलेली, शरीराने भव्य, त्या दैवी पुरुषाच्या तेजाने खोलीत सर्वत्र मंद प्रकाश पसरला होता. त्या मंद प्रकाशात मला ही मुर्ती आता स्पष्ट दिसत होती. त्या दैवीपुरुषाने आपला हात उंचावून, तो महाराजांच्यावर धरला होता. त्या आशिर्वादात्मक हातातून निघणाऱ्या त्या दिव्य प्रकाशाचा झोत महाराजांच्या सर्वांगावर पसरला होता. मी आश्चर्याने जागेवर बसूनच हे दृश्य पहात होते. महाराजांचे सर्व शरीर त्या समाधी अवस्थेत रजीमनीपासून १ फूट उंच अधांतरी पदमासनांत स्थिर होते. थोडयाच वेळांत निरनिराळ्या वाद्यांचे मंजुळ स्वर मला ऐकूं येवू लागले. त्या ठिकाणी अनेक देवदेवतांच्या अस्पष्ट आकृती महाराजांच्या भोवती वावरतांना दिसत होत्या. अशा प्रकारे किती वेळ गेला त्यांचे भान रोहिले नाही. मी जेव्हां भानावर आले, तेव्हां लगेचच दिवे लावले. महाराजांच्या चरणावर लोटांगण घातले. महाराज समाधी अवस्थेतून जागृत झाले, मला विचारले, काय झाले. झोपली नाहीस का? घडयाळांत पाहिले तो रात्रीचे ३ वाजले होते. त्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्याचे मला भानच राहिले नाही. मी फक्त त्यांच्या चरणांकडे पहात होते.

वडिलार्जित इस्टेटीचा उपभोग घ्यायचा नाही या. त्यांच्या निश्चयामुळे महिन्याला मिळण्याऱ्या तुटपुंज्या उत्पन्नावर गिताई मोठ्या श्रद्धेने संसाराचा गाडा हाकीत होत्या. संसारात येणाऱ्या अनंत अडचणींना मोठया धेर्याने तोंड देउन, सदा हसत मुखाने रहाणारी गिताई म्हणजे साक्षात लक्ष्मीचा अवतार आहे. त्यांनी कधीही कोणापासूनही कसल्याच मदतीची अपेक्षा केली नाही. कोणतीही तक्रार तेव्हा नव्हती व आजही नाही. एका जगावेगळ्या असंसारी परंतु महान दैवी शक्ति असलेल्या पुरुषाबरोबर आपला विवाह झाला आहे, याची त्यांना जाण आहे. तसाच अभिमानही आहे. त्यांनी आपणहूनच संसाराचा संपूर्ण भार स्वतःवर घेतला. अर्थात घ्यावा लागला. कारण चारितार्थासाठी केल्या जाणाऱ्या नोकरीचा वेळ सोडून बाकीचा वेळ साधनेसाठी, परमेश्वर प्राप्तिसाठी वेडा झालेल्या आपल्या पतीच्या हातून संसार होणे शक्य नाही, याची त्यांना संपूर्ण जाणीव होती. बाबा रात्रीच्या रात्री व ऑफिसला रजा असेल तेव्हा संपूर्ण दिवस बाहेर एकांतवासांत रहात, तेव्हां ही साध्वी खोलीच्या दरवाजांत बसून त्यांची बाट पहात असे. गीताईच्या जीवनावर बाबांचा ठसा उमटलेला दिसले. गीताईच्या वाट पहाण्याच्या क्रियेतूनच त्यांचीही न कळत साधना होत होती. आपोआप मुखाने नामस्मरण होत होते, पतीदेवांचे म्हणजेच परमेश्वरांचेही चिंतन घडत होत. त्यासुध्दा सिध्दमाता झाल्या आहेत. बाबांप्रमाणेचे माईही शक्तिसंपन्न असल्याचा अनुभव साधकांना येतो. बाबांप्रमाणेच त्यांचाहि आशीर्वाद फलद्रुप होतो.

त्यांच्या रूपानेच प्रत्यक्ष जगदंबाच महाराजांच्या घरी वावरत आहे असे वाटते. सांघकबंधूना तर या आदिशक्तिचे दर्शन सदासर्वकाळ घडते. आद्य शक्ती जगदंबा कोणत्या ना कोणत्या रूपाने तिच्या भक्तांचे संगोपन करीत असते. याचा थांगपत्ताही आपल्या भक्तांना लागू देत नाही. परंतु तिच्या आश्रयाशिवाय, कृपेशिवाय आपण सर्व लोक भोगत असलेले ऐश्वर्य भोगूच शकत नाही. आम्हां सर्व साधकांची अशी दृढ श्रध्दा आहे कि आम्हा सर्व भक्तजनांवर प्रेमाचा वर्षाव करण्यासाठीच प्रत्यक्ष ही शक्तिच महाराजांच्या घरांत वावरंत आहे. प्रत्येक साधकांला त्यांच्या प्रेमाचा सतत स्पर्श जाणवत असतो.



महाराजांचे घर म्हणजे एखाद्या संन्यासाची कुटीच होती. या छोटया घरांत महाराज योग सांधना करीत मंत्राची अनुष्ठाने करीत - त्याच्या 'सिद्धीसाठी यज्ञयागही येथेच होत असत. त्यांची सर्व जबाबदारी माईंच्यावर असल्यामुळे, सामान्य स्त्रियांना झेपणार नाही, असा त्रासही झाला असेल, परंतु त्या सामान्य स्त्री थोडयाच होत्या. त्यांनी तो एक व्रताचाच भाग म्हणून प्रत्येक यज्ञकार्य न त्रासता मोठया आनंदाने पार पाडले. कधींहि चेहऱ्यावर खिन्नता दिसू दिली नाही. त्यांच्या अंगी चैतन्य शक्तिच वावरत आहे, असे वाटते. "माई" म्हणजे आई असाच सर्व साधकांचा अनुभव आहे. प्रथम येणाऱ्या साधकांच्या मनांत महाराजांचा घर संसार चालविणारी ती महानशक्ति कोणत्या रूपाने वावरत असेल असा प्रश्न पडतो. परंतु ज्यावेळी त्या देवतेचे दर्शन घडते, तेव्हा तो श्रध्देने नतमस्तक होतो.

ghagmaharaj.guru

## एक नवा अनुभव

सौ. आई

महाराजांच्या म्हणजेच माझ्या पतीच्या चमत्कारापैकी अलीकडेच घडलेल्या एका विलक्षण चमत्काराची गोष्ट आज मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.



माझे पती म्हणजे सिध्दयोगेश्वर महाराज. इतर कांही लोक त्यांना बाबा म्हणतात. ३ वर्षापूर्वी एके दिवशी ते ध्यानावस्थेत, शांत मुद्रेत बसले होते. त्याच अवस्थेत त्यांनी मला "गिताई" म्हणून हाक मारली-हाक ऐकून मी चकीत झाले. कारण ते मला नेहमी "गिता" किंवा "लिला" म्हणत. मी विचारले. काय? तेव्हां ते म्हणाले मी जर आजारी पडलो तर, कोणी भविष्यकार माझ्या मरणावद्दल तारखा देतील. तू त्यांच्यावर विश्वास ठेवू नको. माझ्या पत्रिकेप्रमाणे साडेसाती आहे. तेव्हां मला मृत्यू घेऊन जाऊ शकणार नाही. काही लोक सांगतील की "त्यांनी कमावलेली सर्व शक्ती दुसऱ्याचे दुःख दूर करण्यासाठी खर्च केली, म्हणून त्याचे भोग त्यांना भोगावेच लागतील. त्यांचा मृत्यू होईल तर, लक्षात ठेव पंचमहाभुतात्मक देहाला भोग हे आहेतच मोठे मोठे ऋषीमुनी, महाज्ञानी, रामकृष्ण परमहंस, तसेच ज्यांना आपला अवतार समजतो ते प्रभु राम व योगेश्वर श्रीकृष्ण यांनाही भोग भोगावे लागलेच"

आणि खरोखर महाराजांच्या भाविष्याप्रमाणे जुलै १९८७ च्या गुरूपौर्णिमिनंतर महाराज आजारी झाले त्यांनी वर्तवेलेल्या भविष्याप्रमाणेच मला अनेक ज्योतिषांनी त्यांच्या मृत्यूच्या तारखा दिल्या. मी मात्र विश्वास ठेवला नाही. त्यांच्याप्रमाणे काही महात्म्यांनी मला सांगितले होते की भविष्यकार कांही सांगोत पण तुझ्या पतीचा मृत्यू होणार नाही. कारण तेही एक महान योगी महात्मा आहेत. त्याप्रमाणेच झाले.



आज त्यांची प्रकृति उत्तम झाली आहे. ते आपल्या साधकशिष्यांची व येणाऱ्या भक्तांशी प्रेमाने त्यांच्या अडीअडचणी विचारत असतात.

महाराजांचे एक श्रध्दावान शिष्य श्रीमान उद्योगपती श्री. चंद्रकांत गांधी यांच्या मुलाचे लग्न होते. श्री गांधी यांनी महाराजांना निमंत्रण दिले व सांगितले की उद्या लग्नाला येण्यासाठी माझी माणसे गाडी घेऊन येतील. त्यांच्याबरोबर आपण येण्याची कृपा करावी. गाडी बरोबर वेळेवर आली, परंतु लग्नाला जाताना ट्रॅफीकमुळे थोडा उशीर झाला. लग्नाच्या भटजींनी, मुहूर्त टळू नये म्हणून, मंगलाष्टके म्हणण्यास सुरवात केली. परंतु श्री. गांधी यांनी मंगलाष्टके बंद करण्यास सांगितले. माझे गुरू, म्हणजे, मी त्यांना

वडलांप्रमाणे समजतो तेव्हां त्यांच्या हातून मंगल अक्षता पडतील तोच मुहूर्त कितीही वेळ येण्यास झाला तरी चालेल. इतक्यांत आमची गाडी पोहचली, दादांना फार आनंद झाला. नंतर मंगलाष्टकांना सुरवांत झाली व लग्न सोहळा उत्तम तऱ्हेने पार पडला.

त्याच रात्री महाराजांचे दिवंगत वडील त्यांच्या स्वप्नात येऊन दृष्टांत दिला की, तू एक महात्मा आहेस तुझे महात्म्य पाहून मी स्वर्गातून आलो. मी आजपर्यंत तुला काही दिले नाही. पण आज तू माझ्याजवळ काहीही मागून घे. ते मी तुला देईन. माझ्या पतींच्या डोळ्यांतून अश्रु आले. ते म्हणाले, "बाबा, मला आता कोणत्याही गोष्टीची गरज नाही. माझे आपणांसारख्या महात्म्यांकडे एकच मागणे आहे. माझ्या सर्व कुटुंबावर - माझे कुटुंब फार मोठे आहे. माझे शिष्य, भक्तीभावाने येणारे, कौटुंबिक अडचणी सांगणारे हे माझ्या कुटुंबातीलच मी समजतो. तर आपली दिव्यकृपा दृष्टी व प्रेमळ आशिर्वाद माझ्या सर्व कुटुंबावर असावेत." वडीलांनी महाराजांना दीर्घ आलिंगन दिले व "तथास्तु" म्हणून अदृश्य झाले. हे. सर्व ऐकून एवढया महान महात्म्याची, मी सहधर्मचारिणी झाले.

हे महान भाग्याचे दिवस परमेश्वराच्या कृपेने प्राप्त झाले.

ghagmaharaj.guru

## ये, धांवत ये, विठ्ठला

*ये, धावत ये, विठ्ठला, दर्शन दे रे मजला*
*नयन निरांजनि उजळुनि ज्योती*
*ओवाळितो पंचारति तुजला - || धृ. ||*

*चंद्रभागेच्या तीरि पंढरी*
*तुझी नांदते मूर्ति गोजिरी*
*कर कटेवरी, उभा विटेवरी*
*अठठाविस युगे झाली तुजला ! || १ ||*

*भक्ति रसाचे शिंपुनि पाणी*
*फुले फुलविलि मम उद्यानीं*
*त्या कुसुमांची माळ गुंफुनी*
*अर्पिण प्रिय भगवंता तुजला ! || २ ||*

*विठ्ठल विठ्ठल ध्यान लागले*
*तव भेटीस्तव जीव तळमळे*
*संसारांतुनि चित्त उडाले*
*तव चरणांचा ध्यास लागला ! || ३ ||*

- केशवनंदन -

ghagmaharaj.guru

## "महायोगाचे सामर्थ्य"

ना. बा. चव्हाण

सदगुरू प्रणीत महायोग हे शास्त्र नसून अनुभवाचे क्षेत्र आहे. मनुष्य शरीराचे जे पंचकोष आहेत, त्या कोशांची शुध्दता करण्याचे हे एक उत्तम साधन, असून कैवल्य प्राप्तीची खात्री देणारे आहे.

भगवतगीतेत ज्या योगांचे वर्णन केले, ते योग म्हणजे ज्ञान-योग, कर्म-योग व भक्ती-योग होत. मनुष्याच्या निसर्गदत्त सत्व, रज, व तम या गुणांना अनुसरून हयापैकी एखादया योगाचे आचरण करून मनुष्य जे प्राप्त करू शकतो. तेच कोणत्याही गुणाचा मनुष्य महायोग साधनेने प्राप्त करू शकतो. सत्व गुणी, रजोगुणी व तमोगुणी यापैकी कोणीही, महायोगाने त्या परम पदास प्राप्त करतो. त्यास ते प्राप्त होते. अर्थात महायोगाने या तिन्ही योगाचे - त्रियोगाचे फल प्राप्त होते.

ईश्वर प्राप्तीसाठी मनुष्यास कोणत्यातरी योगाची निवड करावी लागतेच. योग्य निवड न झाल्यास किंवा त्याप्रमाणे मार्गदर्शन न झाल्यास त्या मनुष्याचे जीवन असफल होते.

रजोगुणी मनुष्यास, ज्ञानयोगाचे मार्गदर्शन झाल्यास तो सफलतेने परमपद प्राप्त करू शकत नाही. असे फसलेले साधक ज्ञानयोगाची कास धरून संन्यास घेवून राजकारण करतात. मठ स्थापून ऐषआरामात राहतात. अंती परमपदा-शिवाय जीवनाची अखेर करतात.

महायोगात सद्‌गुरू शिष्याच्या प्राकृतीक गुणांना उच्च पातळीवर घेवून जातात. त्यांच्या स्वाभाविक गुणांना दैवी सामर्थ्य देतात व परमपदाला जाण्यास मदत करतात.

महायोग हा सिध्दांचा मार्ग आहे कारण सिध्द पुरूषच या मार्गाचे मार्गदर्शक होऊ शकतात. शिष्यांना सिध्दपदास नेण्यास समर्थ असतात.

शारिरीक, मानसिक व बौध्दिक अवस्था कशीही असो, सद्‌गुरुचा आशिर्वाद प्राप्त झाल्यावर दिक्षा मिळाल्यावर, साधकांची प्रगती तिन्ही स्थरावर स्वाभाविकपणे चालू होते. हेच या मार्गाचे प्रमुख वैशीष्ट्य आहे.

सद्‌गुरूंच्या कृपेने शिष्यांची कुंडलीनी जागृत झाल्यावर ही दैवी शक्ति मातेप्रमाणे साधकाच्या हिताच्या दृष्टीने सदैव कार्यरत राहाते.

शारिरीक पातळीवर शरीरातील व्याधींचे उच्चारण करते. त्यासाठी वेगवेगळया शारिरीक क्रिया साधकाकडून घडतात. साधनाकाळात साधक स्वाभाविकपणे वेगवेगळे अंगविक्षेप करतो. त्याने शरीराचे शुध्दीकरण होत जाते. हे अंगविक्षेप म्हणजेच, वेगवेगळी व जरूर असणारी आसने, मुद्रा, प्राणायाम व बंध होत. साधकाला याबाबत शिकवावे लागत नाही. सांगावे लागत नाही.

या क्रिया स्वाभाविकपणे घडत असल्यामुळे अस्वाभाविकपणे केल्या जाणाऱ्या योगक्रियेमुळे उद्‍भवणारे दोष निर्माण होत नाहीत. परंतू असलेल्या व्याधींचे निराकरण होते.

मानसीक पातळीवर सुध्दा ही शक्ती कार्य करीत असते. दिक्षा प्राप्तीनंतर साधकाला शांतीचा अनुभव येऊ लागतो. मनातील विचारावर व तीव्र भावनांनवर ही दैवी शक्ती कार्य करीत असल्यामुळे, साधक शांततेत व समाधानाने व्यवहार करतो. त्यातून त्याच्या व्यवहारीक-आर्थिक भाग्यरेषा उजळून निघतात.

बौध्दिक पातळीवर सुध्दा कुंडलीनी शक्ती कार्य करते. साधना करणारा साधक, दिक्षेनंतर आपल्या प्रश्नांची उत्तरे आपणच शोधू शकतो. बुध्दिमध्ये प्रगलभत्ता व प्रतिभेचा संचार होतो. महायोगातील साधक व्यवहारात आत्मविश्वासाने वावरतांना आढळतो.

अशाप्रमाणे शरीराला, मनाला व बुध्दीला बळजबरीने न वागविता, मनुष्याला स्वाभाविकपणे परमपद प्राप्त करून देणारा, हा योग आहे, म्हणून त्याला "महायोग" असे म्हणतात. ज्ञानेश्वरीत वर्णन केलेला सिध्दयोग तो हाच.

निवृतीनाथांनी व ज्ञानेश्वरमाऊलीने उघड केलेले हेच ते गुहय रहस्य आहे. सांप्रत काळांत या मार्गात मार्गदर्शन करणारे, सद्‍गुरू मिळणे कठीण आहे. कारण आत्मसाक्षात्कारी पुरूषच या मार्गात सद्‍गुरू होऊ शकतात. ज्यांना संकल्पादारे-पृथ्वीच्या पाठीवरील कुठल्याही शिष्याशी संपर्क साधता येऊ शकतो. असेच सिध्दपुरूष दिक्षादेण्यास आधिकारी असतात, तेच फक्त स्पर्श, दृष्टी वा संकल्पादारे कुंडलीनी शक्‍ती जागृत करू शकतात.

कुंडलीनी जागृत करणारे काही गुरू आहेत. परंतु संकल्पाने पृथ्वीवरील कोठल्याही साधकाची कुंडलीनी जागृत करून मार्गदर्शन करणारे सद्‍गुरु खूप शोधून ही आढळत नाहीत.

मला स्वतःला पुष्कळ शोधानंतर संक्ल्पाद्वारे दिक्षा देणारे, माझे सद्‍गुरू श्री सिध्दयोगेश्वर महाराज प्राप्त झाले, व मी कृतार्थ झालो.

पुष्कळ वर्षे शोध घेत फिरत असतांना मला पुष्कळ साधू संतांचा सहवास लांभला, परंतू त्यांच्याकडे मला दिव्यता दिसली नाही. त्यापैकी प्रत्येक जण कोणत्या ना कोणत्या प्रकारे मला अपूर्ण वाटले. त्यांच्यातील आत्मशक्ती मला आकर्षणात करू शकली नाही. थोडया काळांच्या सहवासानंतर त्याचे सत्यस्वरूप दृष्टीस पडे. साधू संताच्या लौकीकास पोहचलेले हे पुरूष कोणत्या ना-कोणत्या लौकीक प्रलोभनाचे दडपणाखाली वावरतांना आढळून आले.

त्यांच्याकडे लोकसंग्रहाची कला होती. पांडित्य होते, शास्त्रांचा अभ्यास होता, त्याग होता, परंतू आत्मासाक्षात्काराशिवाय त्यांचे हे सर्व कृत्रिम वाटावे असेच त्यांचे वर्तन होते.

बाबांची माझी भेट योगायोगानेच झाली. सद्‌गुरूंच्या योग्य मार्गदर्शकाच्या शोधात असल्यामुळे कोणाही सत्पुरुषास भेटणे हा माझा छंद होता. आपल्याला पाहिजे, ते मिळेल का? याचा शोध चालू होता.

असेच एकदा "भक्तजन" चे एकवाचक अंकाबाबत चौकशी करण्यासाठी ऑफिसात आले असता, स्वाभाविकपणे आध्यात्मिक चर्चा निघाली. त्यांनी बाबांबाबत मला सांगितल्यावर ताबडतोब त्यांच्याबरोबर बाबांना भेटलो. प्रथम भेटीतच अनेक जन्मांची ओळख पटली. आत्मतत्वाची आत्मतत्वाला जाणीव झाली. बाबांकडून निघणाऱ्या दैवी लहरी मनावर आघात करीत होत्या. चर्चेतून मनाने निर्णय घेतला की, येथेच पाहिजे ते मिळेल. दोन भेटी नंतर साधक म्हणून स्विकारण्याची माझी विनंती, त्यांनी ताबडतोब मान्य केली.

दिक्षाप्राप्तीनंतर माझ्या शरीरात, मनांत ब बुध्दीत शुद्धीकरणाची प्रक्रिया चालू झाली. त्याची प्रचिती थोडयाच दिवसांत आली.

मनाला मोठा आधार व मार्गदर्शक मिळाल्यामुळे मन निश्चिंत झाले. उदासिनता संपून आत्मविश्वासाचे राज्य सुरु झाले. काय करावे? किंवा काय करू नये? याबाबत बुध्दि अचूक निर्णय घेवू लागली.

या काळात आलेले-अलौकीक व लौकीक अनुभव बुध्दिच्या ताकदीवर पडताळून पहाणे, व शब्द-बध्द करणे शक्य नाहीत व केले तरी त्यांतून योग्य तोच अर्थ वाचकांना घेता येइलच असे सांगता येणार नाही. कारण हे "अनुभव" शास्त्रावर आधारीत नसून अनुभवण्याचे "शास्त्र" आहे.

महाराजांचे प्रत्येक साधकांवर असलेले पुत्रवत प्रेम पाहून प्रत्यक्ष परमेश्वरच त्यांच्या शरीरातून कार्य करीत आहे असा भास होतो. प्रत्येकाचे प्रश्न मग ते लौकीक स्वरूपाचे असोत की अलौकीक स्वरूपाचे असोत, प्रेमळ पित्याप्रमाणे त्यांची सोडवणूक करण्यासाठी स्वतः प्राप्त केलेल्या दैवी शक्तीचा ते उपयोग करतात. त्यांत ते कधीही हिशोबी पध्दतीने वागलेले आढळत नाहीत. यातच त्यांचे मोठेपण सामावलेले आहे, असा मला अनुभव आला.

ghagmaharaj.guru

# "एक असाही अनुभव"

सौ. शिला सुरेश सावंत



स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी असे उद्‌गार मराठी वाड्मयांत एका कविने काढलेले आहेत. परंतु मी मात्र या जगात भिकारी आहे असे मनाला लावून घेणार नाही. कारण सद्‌गुरू म्हणजे प्रत्यक्ष साक्षात ईश्वर होय. त्या ईश्वररूपी सद्‌गुरूंच्या सानिध्यात मला माझ्या पतिसमवेत वावरण्याची संधि मिळत आलेली आहे व पुढील काळातही गुरूकृपेने मिळो ही गुरूचरणी प्रार्थना.

८ ऑगष्ट १९८५ रोजी बाबांचा वार गुरूवार होता. ऑफिसमध्ये मी माझ्या कामात मग्न होते. संध्याकाळी चार वाजता अचानक माझ्या शरीरात एक वेगळीच संवेदना निर्माण झाली व हृदयांत भितीने थरकाप सुरू झाला. मला वाटू लागले कि मला हृदयविकाराचा झटकाच येत आहे कि काय? हया विचारात साडेपाच वाजले व आंम्ही उभयता ऑफिसमधून बाहेर पडलो नियमाप्रमाणे सद्‌गुरूंच्या दर्शनाला गुरूवार म्हणून गिरगांवची वाट धरली. गुरूंच्या गुरूप्रसादांत भक्तांची रीघ सद्‌गुरूंच्या दर्शनाला लागलेलीच होती. दरवेळी गुरूदारी गेल्यावर आम्ही नऊ वाजेपर्यंत थांबत असतो. सर्व आवराआवर करून शेवटचा माणूस तिथून जाईपर्यंत आम्ही कुठच्याही प्रकारे गुरूसेवेचा लाभ घेत असतो. परंतु त्यांदिवशी मी माझ्या मनाला आवरण्याचा खूप प्रयत्न केला पण मला रहावेना मी बाबाना सामोरे गेले व म्हणाले "बाबा मला काय होत आहे तेच कळत नाही. मला डॉक्टरकडे जाण्याची शक्ति द्या. बाबांचा कृपा प्रसाद बरोबर घेऊन आम्ही घरची वाट धरली. नेहमी बसने प्रवास करणारे माझे पाय त्या दिवशी मी मनाला मुरड घालून हाताने टॅक्सी थांबविण्याचा प्रयत्न केला. तेव्हा माझे यजमान माइयाकडे भयभित नजरेने पाहू लागले. मी त्याना अनावर होऊन म्हटले कि आज आपण टॅक्सीनेच घरी जायचे. आमची टॅक्सी घराच्या आवारासमोर उभी राहीली मला तर कसलेच भान नव्हते. आम्हाला पाहून माझा मोठा मुलगा पुढे आला त्याने वडीलाना सांगितले कि अमित अजून शाळेतून आलेला नाही. ही बातमी कळताच यजमानांच्या मनांत अनेक वाईट विचारानेच गर्दी केली असणार, कारण सध्या या मुंबापुरीत चांगल्या गोष्टी पेक्षा वाईट गोष्टींची घडामोड अधिक प्रमाणांत होत आहे. एकीकडे त्यांचे मन म्हणाले असेल, मुलगा कसा हाती लागणार तर दुसरीकडे आपल्या पत्नीसाठी ह्या गोष्टीचा तीच्या मनावर जबरदस्त आघात होईल याची चिंता? परंतु गुरूशक्तिच्या आधारे त्यानी मला मोठया मुलाच्या हाती देऊन आमची रवानगी डॉक्टरकडे केली. डॉक्टरना माझ्या तब्बेतीची चांगलीच कल्पना आहे. त्याना मी एवढेच सांगितले कि डॉक्टर मला काय

होत आहे तेच कळत नाही. त्यानी डॉक्टरी कक्षेतून तपासणी करावयाला हवी त्या पद्धती करुन मला शेवटी विचारले, "कसला विचार करतेस" आज सुरेशचे आणि तुझे खटकले आहे कि काय? नाही. इतक्यांत मुलाने अमित घरी आला नाही, हे माझ्या नकळत सांगितले व वडीलांनी तुम्हाला गुंगीचे इन्जेक्शन द्यायला सांगितले आहे. डॉक्टरनी वाजविपेक्षा जास्त प्रमाणांत डोस देऊन माझी पाठवणी घराकडे केली.

मी माझ्या रस्त्याने घरी येत असताना एका परिचीत बाईने येऊन मला मिठी मारली. मला ज्या दुःखाची कल्पना नव्हती त्यांची जाणीव शिग्रतेने करून दिली. अग तुझा राजा अजून शाळेतून आलेला नाही. काय तो चमत्कारीक क्षण सद्‌गुरूकृपेने दिक्षा देऊन कुंडलीनी शक्ती जागृत केल्याची साक्ष, एका क्षणात माझ्या मनाने पकड घेतली. गेला असेल कुणा एका काकाचा हात धरून फिरावयाला व येइल परत माझ्या बाबांचा हात घरून आपल्या घराला. औषधाची गुंगी तिथेच उतरली हो. चाळीतील रहिवाशांची गर्दी मला बघण्यासाठी गॅलरीत होती. चर्चा आपसात चालू होती मुलगा कसा मिळणार? व ही बाई कसा तग धरणार?

मी घरी आले. धाकटी नणंद मला पाहून रडु लागली. काय करणार बिचारी, तिला भिती दादा-वहिनीची. मी मनाला मुरड घालून हातपाय धुतले, दिवाबत्ती केलेली होतीच. गुरूंच्याहस्ते कुलस्वामीनीला श्रीफळ ठेवतो त्यांवर हळदीकुंकू वाहून आव्हान केले, "तुझ्या कृपेने हे बाळ तूं माझ्या पदरी घातलेले आहेस आणि भवानीमाते जगदंबे तुला जे योग्य वाटेल तोच निर्णय तू त्याच्या बाबतीत देशील. तो मी मान्य करीन."

थोडया वेळाने माझे यजमान घरी आले. मोठया मुलाला सांगितले कि, गिरगांवला जाऊन घडलेला प्रकार सांग.

मी व माझा मुलगा, सोबत शेजाऱ्यांचा मुलगा असे तिघेजण बसने परत बाबांच्या दारी गिरगांवात आलों. त्यांनी आम्हाला पाहिले, व म्हणाले शिलाला बरे वाटले म्हणून सांगायला आलीस. कां हो खरच कुणालाही नवल वाटेल किंवा हेवा वाटेल अशी शक्ति माझ्या शरिरात गुरूकृपेने निर्माण झाली व ती वास करत आहे. मी माझ्या गुरूंच्या पायी नतमस्तक होऊन सांगितले, "बाबा अमित घरी आला नाही, हे सांगायला मी आले. उद्या तुम्ही साताऱ्याला जाणार आहात व आपल्या हस्ते नवचंडीचा होम हवन विधी होणार आहे. आपण आपल्या एका शिष्याची वाट पहात राहून आपला अमौलिक वेळ वाया जाऊ नये हे सांगण्यासाठी आपल्याकडे धाव घेतली आहे."

गुरुमाऊलींनी ताबडतोब उठून आपल्या वास्तव्याच्या खोलीत प्रवेश केला. हजारो सिध्द केलेल्या मंत्रापैकी एक योग्य मंत्र लिहून दिला. "मुलगा येईपर्यंत ह्या मंत्राचा जप कर" असे सांगितले. सद्‌गुरूनी दिलेला अमौलिक ठेवा रूमालात बांधून मी माझ्या घरी आले.

माझ्या मुलाला शाळेतून दादर स्टेशनला एका गाडीतून नेण्यात आले. तेथून बोरिवली जलद गाडीत घातले. एका कोपऱ्यात त्याचा चोळामोळा करून बसविले होते. त्याच्या हातापायाला जखमा केलेल्या होत्या. कांदिवली स्टेशन येताच, त्याच्यावर जो गुंगीचा परिणाम केला होता, तो उतरला. कारण त्यालाही दिक्षा दिलेली आहे. त्याचीही शक्ति जागृत आहे. तो डोळे चोळू लागला. तेव्हा एका गृहस्थाच्या लक्षात आले. त्यांनी त्याच्यावर नजर ठेवली. बोरिवलीला गाडी थांबल्यावर कोणी हयाला उचलते कां हे पाहिले. नंतर ते गृहस्थ स्वतःच त्याला स्टेशनांत घेऊन बसले. त्याच्यावर पाण्याचा हबका मारून मारून चांगली जाग आणली. तेव्हां माझा मुलगा म्हणाला, काका मी कुठे आहे. तेव्हां ते म्हणाले हे बोरिवली स्टेशन आहे. तेव्हां मुलगा रडू लागला. तेव्हां त्यांनी त्याची समजूत घातली. रेल्वे पोलिसाकडे एक रूपया देऊन सुपूर्द केले. नंतर मुलाने बोरिवली मधील परांजपे सोसायटीतल्या आत्याचा पत्ता सांगितला, आत्या देखील याच सद्‌गुरुंच्या छायेखाली हया जगाच्या पाठीवर वावरत आहे आणि म्हणूनच या शक्तिने त्या वाट चुकलेल्या बालकाला तिच्या योग्य दारी मार्ग दाखविला. तिला देखील त्याला दारांत पाहून आश्चर्य वाटले. तिचे यजमान घरी नव्हते. थोडयाच अवधीत ते घरी आले. हा प्रकार पाहून त्यांचेही मन विचलीतं झाले.

त्यांच्या शेजारी पोलीस खात्यातील एक अधिकारी आले होते. त्यांनी लगेच वायरलेसवरूने ही बातमी काळाचौकी पोलीस ठाण्यामार्फत आम्हाला घरी कळविली. तर दुसऱ्या शेजारील गृहस्थाने आपले एक स्नेही साईभक्त काळाचौकी येथे रहातात त्यांच्या घरी फोनवर आमचा पत्ता देऊन घरी मुलगा सुखरूप असल्याची बातमी दिली.

एवढया अवधीत, बाबा आमच्या घरी न सांगता आलेले पाहून तर आम्हाला आश्चर्य वाटले. आजुबाजुचे लोक कुजूबुजू लागले. माझ्या मनाची धाव थांबली. मुलगा ११ वाजता काकांबरोबर घरी परत आला.

मुलाने दोनचार दिवसांनी मला सांगितले. आई माझे सद्‌गुरू (बाबा) मला मांडीवर घेऊन बसले. नंतर शिपायाकडे त्यांनी मला दिले. पण पत्ता मात्र सांगितला नाही. आठवण म्हणून एक रूपया दिला. तेव्हा या पुढे कोणालाही प्रथम न मागता पाणी देईन व बाबांची भक्ती प्रेमाने व श्रध्देने सेवा करीन. नऊ वर्षाच्या मुलाला देखील गुरूची महती अशाप्रकारे कळली.

मी देखील गुरूचरणी हीच प्रार्थना करते की, माझ्या हृदयरूपी मंदिरात गुरु सेवेचा नंदादीप सतत श्रध्देने प्रकाशित राहो. तसेच सद्‌गुरूंच्या आशिर्वादाचा वास बकुळीच्या फुलांच्या सुगंधाप्रमाणे माझ्याभोवती सतत सुगंधीत राहू द्यावा ही माझी आराधना होय.

## श्री गुरुकृपा
प्रकाश दिनकरराव देशपांडे, सातारा

मोह महासागराच्या जगत्प्रपंची राहून देखील पूर्ण वैराग्य धारण करून, षडरिपूंचे दमन करून, अखंड साधनानुष्ठान साध्य करून, अत्यंत कडक तप: साधनेने प्राप्त झालेल्या पूर्ण-दिव्य महाशक्तीच्या स्त्रोतांनी हजारो मैलावरील दिक्षायोग्य जीवास त्याच्या प्रार्थनेनुसार संकल्पदीक्षा ही सर्वश्रेष्ठ दिक्षा देऊन जीवाला पूर्णत्व प्राप्त होण्याच्या सामर्थ्यासाठी शक्ती संचार करून जिवस्थित कूंडलिनी शक्तीचे जागरण करून आपल्या दिव्य दृष्टीने व अदृश्य आशिर्वादाने शिष्याची योगप्रगती जपणारे श्रीगुरूदेव हे साक्षात परमात्माच असतात. अशा श्रीगुरुंची कृपा म्हणजेच साक्षात परमात्म्याची कृपा होय. विश्वाच्या उत्पत्तीसाठी व उभारणीसाठी कारणीभूत असलेल्या मायेच्या आवरणाने अज्ञानी जीव हा या यच्चयावत विश्वाचे देहदृष्टीने दिसणारे, स्थूल व अशाश्वत स्वरूपच सत्य मानीत असतो. वास्तविक चराचरी, जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, पंचमहाभूती, सर्वजीवी थोडक्यात सर्वत्र एक शाश्वत, चैतन्यरूप महाशक्ती व्याप्त आहे. या महाशक्तीचे चैतन्यमय मूळ रूप म्हणजे परमात्मशक्ती असे स्थूलमानाने म्हणता येईल. अशा परमात्मरूप असलेले श्रीगुरुदेव तत्त्वरूपाच्या सर्वार्थाने जाणणे हे परमात्म्याला जाणण्याइतके अवघड आहे. श्रीगुरुकृपेने हे अशक्य मात्र नाही.

जर जीव स्वप्रयत्नाने अशाश्वत रूप असलेल्या तथाकथित प्रपंचातील अडीअडणीचा परिहार पूर्णत्वाने करून काहीही न्यूनता नसेल असा पूर्ण प्रपंच उभारू शकत नाही. हे तर प्रत्येकाला अनुभवसिध्द आहे. तर ज्या मार्गात प्रवाहाच्या उलट मार्गाने जाण्याचे दिव्य आहे, बाहयात्कारी इंद्रियांना अंतर्मुख करण्याची किमया आहे, अधोमुखी प्रवाहांना उर्ध्वमुखाने नेण्याचे कौशल्य आहे, जन्मानंतर सहजपणे चिकटून तस्वरूप करून टाकणाऱ्या षडरिपूंना कायमचे तोडून टाकण्याची हातोटी आहे, खऱ्या "मी"चे चैतन्यरूप जाणून सर्वत्र त्याचीच अनुभूती घेण्याची दिव्यशक्ती आहे. अशा परमार्थातयोगात अल्पशक्ती जीव स्वप्रयत्नाने काय करू शकेल? तर काही नाही. परमार्थमार्गात- योगमार्गात उपरोक्त ध्येये अनुभवण्यासाठी सर्वोच्च निकड ही श्रीगुरूकृपेची आहे.

"गु" म्हणजे अंधःकार. "रू" म्हणजे नाहिसा करणारे. अज्ञानाच्या अंधःकाराचा नाश करून ज्ञान प्रकाशाची प्राप्ती करून देणारे श्रीगुरु हे एक महान तत्त्व आहे. अशा श्रीगुरूदेवांच्या आशिर्वादाच्या स्त्रोतानी, दिव्यचक्षूंनी योग उभारणीसाठी, परमार्थसंवर्धनासाठी सर्वशक्तीनिशी सतत पाखरण ठेवणे, लक्ष ठेवणे म्हणजे गुरूकृपा होय. स्वतः साक्षात परमात्मा असून, सर्व काही साध्य झालेले असताना अज्ञानीजीवांच्या उध्दारासाठी, ज्ञानप्राप्तीसाठी, योगपूर्तीसाठी निरपेक्षपणे कार्य करणाऱ्या महाशक्ती श्रीगुरुंचे वर्णन करणे कदापीही शक्य होणार नाही तर अशा दिव्य विभूतींच्या कृपेचे वर्णन करणे सर्वथा

अशक्य होय. अशा कृपेचे स्वरूप फक्त अनुभवताच येईल. अशी अतीदिव्य व फक्त अनुभवताच येण्यासारखी श्रीगुरुकृपा कशी प्राप्त करता येईल? असा सत्वगुणी प्रश्न सहज शक्य आहे. प्रथम श्रीगुरु या तत्त्वाला सर्वार्थ देण्याचा झाल्यास त्यासाठी शिष्य ही संज्ञा समजून घेणे आवश्यक आहे. पूर्णशक्तीच्या चरणी जे माझे आहे ते मनाने सर्व समर्पण करण्याची योग्यता म्हणजेच सर्वनिष्ठ, श्रद्धा, स्वत्व, भावविश्व, संकल्प-विकल्प, सुख-दु:ख समर्पण करून उर्वरित आयुष्य हा समर्पण नैवेद्यातील त्या महाशक्तीच्या मालकीचा प्रसाद समजून, सत्वगुणयुक्त निष्काम कर्मानुष्ठान व साधनानुष्ठान मानून परमात्म्याची प्राप्ती हे एकमेव जीवनलक्ष्य ठेवून आत्मा आनंदात काळ कंठण्याची तयारी झालेला जीव म्हणजे शिष्य. अशा प्रकारचे शिष्यत्व अंगी बाणणे हे श्रीगुरुकृपा साध्य होण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे.

श्रीगुरुकृपेसाठी श्रीगुरूदेवांच्या चरणी लागून शक्तीपात-वेध-संकल्पशांभवी दिक्षा घेतल्यावर जीवात सुप्तस्थित असलेली कुंडलिनी शक्तीची जागृती शक्ती संचाराने होत असते. श्रीगुरुदत्तमंत्राचे जपसातत्य, साधनानुष्ठान व गुर्वाज्ञा पाळण्याच्या योगे जीवात अमूलाग्र बदल होत जातो. प्रगतीच्या दिशेने त्यांच्या आचारात, विचारात, आहारात, विहारात, उच्चारात सर्वत्र सुयोग्य असा बदल होत जातो कारण अंतीम उद्दीष्टाच्या दिशेने श्रीगुरुची महाशक्ती त्याच्या उद्धाराप्रित्यर्थ असे बदल घडवून आणीत असते. दीक्षेनंतर साधनेत अनेकविध शारिरीक क्रियांनी सुरवात होऊन शरीरातील ७२ हजार नाडयांचे शुध्दीकरण सुरू होते. यापैकी कुंडलिनी शक्तीचा उर्ध्व-महामार्ग असलेली सुषुम्ना नाडी जिचे अधोमुख श्रीगुरुंच्या शक्तिसंचाराने उघडलेले असते त्या नाडीच्या शुध्दीकरणाला अनन्यसाधारण महत्व आहे. शरीरशुध्दीनंतर श्रीगुरूदत्त मंत्र जप सातत्याने, पूर्ण शरणागतीने, साधनानुष्ठानाने व गुरूकृपेने योग प्रगतीचा वेग वाढू लागतो. यावेळी परमेश्वरी सान्निध्याची गोडी वाढू लागते. प्रपंचात कर्तव्यापुरते व कारणापुरते राहून अन्यकाळी विचारमुक्त अथवा श्रीगुरुंच्या चरणी मनाने रत रहाण्यातच आनंद वाटतो. कर्तव्यापुरत्या होणाऱ्या विचारात कमालीची शुध्दता येते. आसक्तीच्या आहारी न जाण्याने म्हणजे अकारण होणारी पळापळ थांबल्याने अन्नोदकाची गरजही अत्यल्प अशी होत जाते पर्यायाने मलमूत्र विसर्जनक्रीया आवश्यक मर्यादेत राहिल्याने शरिरातील सर्व शक्ती साध्याच्या दिशेने प्रवाहत होणे सहजसुलभ होत जाते. शक्तिपातपूर्व जीवनाशी तुलना करता अन्य विषयातील व्यक्तिंशी संपर्कमाध्यम हळूहळू क्षीण झाल्याचे शक्तीपातोत्तर काळात अनुभवास येते. वाचेचे कार्य देखील अगदी गरज पडेल तरच या भूमिकेवर स्थिर होते. थोडक्यात पाच कर्मेंद्रिये व पाच ज्ञानेंद्रिये यांची बहिर्मुखी कार्ये ही अत्यावश्यक वेळेसाठी राखीव अशीच रहातात. त्यामुळे वृत्तीमध्ये कमालीची शांतता व स्थिरता येते. साधन काळात मनाला विचारमुक्त राहून शून्यभावात स्थिर होण्यानेचे आनंद वाटत रहातो. बहिर्मुख वृत्तीच्या स्थिरतेने व विचारांच्या शून्यभावामुळे बुध्दीला कमालीची धार येत असून ज्या विषयाच्या

विचारात बुध्दी शिरेल त्याच्या मुळापासून सर्व साधकबाधक विचारविधी अत्यल्प काळात करून त्वरित झटपट व योग्य निर्णय घेण्याची कुवत जीवाला प्राप्त होते. आपल्या संपर्काच्या जगात सर्वांना आनंद मिळावा, सर्व सुखी असावेत, जमेल तेवढा यथाशक्ती परोपकार करून कर्तेपण श्रीगुरुंना द्यावे, घेता येतील तितक्यांचे धन्यवाद घ्यावेत, दु:खीजीवांना दिलासा द्यावा, दान देत रहावे, इतरांच्या क्षोभदायक चूकांकडे क्षमाशील दृष्टीने पहावे मात्र हे सर्व होत असताना अहंकारापासून सावध राहून सर्व शुभ कर्माचे कर्तेपण श्री गुरूदेवांना द्यावे असे वाटत रहाते. करणे ही भावना नष्ट होऊन होणे ही भावना दृढ होत जाते. सर्व चराचरी, सर्वजीवी सर्वत्र स्थूल-देह दृष्टीला दिसणारे स्थूल रूप हे सांत, मूर्त, विकारी, सिमित असत्य असून हे आतापर्यंतच्या अज्ञानी संस्कारामुळे व मायेच्या आवरणामुळे हेच सत्य मानण्याची भावना असत्य असून सर्वत्र सद्‌गुरूंचे परमात्मत्व भरून राहिले आहे हेच सत्य आहे याची अनुभूती जाणवू लागते. व्यावहारिक क्षेत्रात प्रामाणिकपणा, उद्योगप्रियता सचोटी इ. राखली जाऊन बोलण्यात स्वल्प पण स्पष्टवक्तेपणा आल्याचे अनुभवास येते. अशाश्वत सुखाच्या प्राप्तीची इच्छा, आसक्ती कमी कमी होत जाऊन पूर्वसंचितानुसार वाटयास-भोगण्यास आलेली सुखदु:खे समान दृष्टीने, त्रयस्थ वृत्तीने पाहून निरासक्त राहून अक्षय व शाश्वत सुखाच्या प्राप्तीसाठी आपणाकडून प्रयत्न होत रहावेत ही इच्छा दृढ होत जाते. या विवेचनातील व याहून उच्च अनुभव हे अवश्यमेव येतातच मात्र त्यासाठी आपण सतशिष्य बनून श्रीगुरुंची महान कृपा संपादण्यासाठी सतत जागृत व सावध राहिले पाहिजे. बेसावध राहिल्याने अहंकार वृद्धी होऊन योगभ्रष्ट होण्याचा धोका संभवतो अतएव सावधान.

श्री गुरूदेव हे परमात्माच असतात. परमात्म्याचे वर्णन शब्दाने सर्वथा अशक्यच आहे हे वेदांनीच सांगितले आहे. तथापि थोडा फार प्रयत्न करू जाता श्री गुरूदेव हे कृपासिंधू आहेत. पूर्णातून पूर्ण निघाले तरी मूळ पूर्णच रहाते या योगन्यायाने अनेकविध स्त्रोतांनी कोटयावधी जीवावर पूर्ण कृपा करूनही श्री गुरूदेव हे मूळ पूरण रूपच असतात. श्री गुरुदेव दानी आहेत. जीवाचा उध्दार व्हावा या पवित्र संकल्पातून जन्मोजन्मी पुरून उरणारे आशिर्वादाचे दान ते आपल्या शिष्यांवर अक्षरशः उधळीत असतात. श्री गुरूदेव परोपकारी आहेत अतिशय कष्टमय साधनेद्वारा प्राप्त झालेले पुण्य खर्च करून दीनांच्या त्रिविध तापांच्या परिहाराचा संकल्प करून सर्वांना सत्मार्गी लावण्याचे उपकार श्रींगुरूंच्या शिवाय कोण करणार? श्री गुरूदेव दयासागर आहेत. अज्ञानातून जीवांच्या हातून घडलेल्या व घडत असणाऱ्या अक्षम्य चुका-अपराध पोटात घालून दयाद्रि भावनेतून क्षमा करतात ते श्री गुरूदेवच. श्रीं गुरुदेव शांतीरूप आहेत. असंख्य पामरांच्या आसक्तीत लडबडलेल्या सर्व प्रापंचिक व व्यावहारिक अडीअडचणींच्या लांबलचक कहाण्या ऐकून, त्यांच्या त्रासापासून संकल्प कृपेने सोडवून पुनश्च साक्षात शांतीरूप पहावे ते श्री गुरूचेच. अशा श्री गुरुदेवांच्या कृपेने प्राप्त झालेल्या साधनेतून परमात्म्याची प्राप्ती होण्याचे सामर्थ्य असताना सर्व अडीअडचणी आपोआप दूर होत असतात किंबहुना या अडचणींचा

परिहार करणे हे शक्तीच्या सामर्थ्याच्या दृष्टीने अगदी कःपदार्थ कार्य असते. अशा शक्ती जागृतीची प्राप्ती झाल्यावर तिच्या चैतन्य सामर्थ्याशी तद्रूप होण्याऐवजी अन्य कोठेही आसक्त होण्यात हंशील ते काय? श्री गुरूंचे चरणदर्शन हे मोक्षाचे दार आहे.

अत्युच्च अशी योगावस्था प्राप्त झाल्यानंतर देखील सामान्य जीवांच्या अडीअडचणी समजून घेण्यासाठी श्री गुरूदेव शिष्यांच्या भावनेशी समरस होत असतात त्यामागे उद्देश एकच असतो. अडीअडचणींच्या परिहारांती जीव पारमार्थिक वाटचाल करू शकेल, निरासक्त, होण्याचा प्रयत्न करेल. वास्तविक त्रिकाल ज्ञानी श्री गुरुदेवांना आम्ही सांगावे व त्यांना समजावे हा, अनेक जन्मांच्या अज्ञानी संस्कारांचा आमचा भ्रम असतो. महाशक्तीरूप श्री गुरुदेवांना सर्व काही ज्ञात असून वरवर मात्र मला काही समजत नाही असे दृश्य परिक्षेसाठी शिष्यापुढे उभे करीत असतात. श्री गुरुदेवांच्या आपल्या उध्दाराचा संकल्पाला सत्व प्रतिसाद द्यावा व त्यांना आपल्या प्रापंचिक पातळीपर्यंत कधीही आणू नये. आपल्या अवांतर गप्पांनी त्यांच्या परमात्म्याच्या अनुसंधान सातत्यात खंड पडत असतो. या पापाचे धनी अजाणतेपणीसुद्धा होऊ नये. श्रीगुरु कसे आहेत, कोणत्या स्थितीत आहेत हे कधीही पाहू नये. त्यांच्याशी अथवा त्यांच्यासमोर प्रापंचिक गप्पा कशीही करीत बसू नये. फक्त अध्यात्मिक शंकांचे समाधान मात्र त्यांचेकडून जरूर करून घ्यावे. त्रिकालज्ञ श्री गुरुंच्यासमोर कधीही असत्य संभाषण करू नये अशाने श्री गुरुकृपा प्रापत होईल काय? श्री गुरुंच्याकडे कधीही काहीही मागू नये फक्त कृपेसाठी प्रार्थना करावी. आपणांस संपत्ती, घरदार, ऐश्वर्य हवे असेल तर अपेक्षापूर्ती इतक्या कष्टाची तयारी करावी. आजारी लोकांना औषधोपचार करावा, सेवाशुश्रुषा करावी व इतर न टाळता येणाऱ्या संकटांकडे आपल्याच पूर्वसंचितानुसार वाट्यास आलेले भोग आहेत अशा त्रयस्थ भूमिकेतून पाहून त्यांचाही उदात्त व शांत वृत्तीने स्वीकार करावा. व्यावहारिक अडचणींवर व्यावहारिक उपायच करावेत त्यातून सुटकेचे साकडे श्री गुरूदेवांना कधीही घालू नये. श्री गुरुंचे व आपले नाते अध्यात्मिक बैठकीवर अधिष्ठित असल्याने अध्यात्मिक उन्नतीसाठी, साधनेतील प्रगतीसाठी, उध्दारासाठी, परमात्म्याचे स्वरूप ओळखून तद्रूप होऊन रहाण्यासाठी श्री गुरुंकडे फक्त आशिर्वादाची अदृश्य प्रार्थना करीत रहावे. मात्र या आशिर्वादाच्या मोबदल्यात मी प्रपंचात, जनताजनार्दनी, गृहस्थाश्रमी राहूनही श्री गुरूंच्या चरणी माझ्या सर्व भावविश्वासह श्रध्दारूपाने किती अधिक काळरत रहातो याबाबत आत्मपरिक्षण अवश्य करीत रहावे. श्री गुरुदेवांनी माझ्यासाठी काही तरी करावे, श्रीगुरूकृपा आशीर्वादानी दिव्य दृष्टीने माझेवर सतत पाखरण ठेवावी पण या मोबदल्यात माइया किती निष्ठा-श्रध्दा श्री गुरुचरणी आहेत? सश्रध्द अंतःकरणाने त्यांचे चरणी मी किती काळरत होत आहे? या जगात माझे असे काही राहिले-उरले आहे काय? या प्रश्नांची उत्तरे आत्मपरिक्षावीत व समाधानकारक उत्तरांच्या अनुभूतीअंती श्री गुरूकृपा अनुभवावी. उपरोक्त सर्व "श्री गुरुकृपेतील" प्रत्येक श्रीगुरू हे माझे गुरूदेव श्रीमद सिध्दयोगेश्वर महाराज आहेत,

ज्यांच्या दिव्य कृपेने उमगलेला श्रीगुरूकृपेचा महिमा वर्णिला. अखिल विश्वासमोर एक वाळूचा कण वाटावा असा वाळूचा कण हे वर्णन आहे तर ते अखिल विश्व कसे असेल? तो प्रांत फक्त अनुभूतीचाच आहे.

ghagmaharaj.guru

# माझी पाठराखीण
श्री नलगे



दिनांक १६ जानेवारी १९८५ चा दिवस होता. घरच्या कामानिमित्त मी कोल्हापूरला गेलो होतो. परतीच्या रात्रीच्या कोल्हापूर बोरीवली गाडीने निघालो होतो. मी त्या सीटवर स्थानापन्न झालो. बरोबर सामान काहीच असें नव्हते. जसा आलो त्या प्रमाणे माघारी फिरलो. थंडीचे दिवस असूनसुध्दा उबदार असे माझ्याजवळ काहीच नव्हते. बसमध्ये सर्व लोक थंडीपासून संरक्षण मिळण्यासाठी मफलर, स्वेटर इ. तयारीनिशी बसले होते. गाडीने कोल्हापूर सोडून साधारण एक तास झाला असेल. थंडीची जाणीव होऊ लागली. मी मात्र असाच, एकंदरीत थंडीत कसा प्रवास करायचा हा विचार मनात चमकून गेला. थंडी पण कडाक्याची होतो. गार वारा अंगाला झोंबत होता. प्रत्येकाने गाडीच्या खिडक्या लावून घेतल्या होत्या. गाडीत झोपण्यापेक्षा आपण साधना करू असा मनात विचार केला. सीटवर माझ्या व्यतिरिक्त बाजूला कोणी नव्हते. इतरांना त्रास होण्याचा प्रश्न उद्दभवत नव्हता. साधनेच्या तयारीनिशी मी सीटवर बसलो. सद्गुरूंचे स्मरण केले. थोडयाच अवधीत जाणीव झाली की माझे भोवती उबदार असे आवरण तयार झालें असून थंडी जाणवत नव्हती. मला भास झाला असेल असे वाटून मी डोळे उघडून क्षणभर इकडे-तिकडे पाहिले. पुन्हा साधना सुरु झाली. साधनेतला आनंद तर काही औरच होता. शिवाय एक वेगळाच अनुभव येत होता. एवढी बाहेर थंडी असून मला त्याची यत्किंचितही जाणीव नव्हती. उलट उबदारपणा जाणवत होता. याचे वर्णन करणे शब्दापलिकडचे होते. लोकांना थंडीची जाणीव होत असल्यामुळे, माइयाकडे सर्वजण आश्चर्याने पहात होते, याला कशी थंडी लागत नाही. एवढंच सांगावसं वाटतं की ज्याप्रमाणे आई आपल्या तान्हयाला उबदार पांघरूण जसे मायेने घालते, तद्वतच गुरूमाऊलीने आपल्या मायेचे उबदार पांघरूण घालून माझे थंडीपासून संरक्षण केले होते हे निश्चितच.

असाच एक अनुभव गेल्यावर्षी जुलैमध्ये गुरूपौर्णिमेच्या दिवशो आला. कार्यालयामध्ये जुलै १० ते १८ पर्यन्त कंपनीमध्ये थांबावे लागणार होते. शेवटी कंपनीमध्येच आठ दिवस रहाण्याची पाळी आली. साधनाहि कंपनीतच चालू होती. परंतु एकच विचार मनांत येवून मन बैचेन व्हायचं. तो म्हणजे यंदा आपला गुरूपौर्णिमा उत्सव चुकणार की काय? असा वारंवार विचार मनांत येवून, मन विषण्ण व्हायचं. मनाने मी १८ जुलैला गुरूपौर्णिमेच्या दिवशी उत्सवासाठी हॉलमध्ये हजर झालो आहे. नेहमी प्रमाणे कामाची घाई उडाली होती. मीहि त्यांत सहभागी झालो (होतो) आहे आणि १८ जुलैला गुरूपौर्णिमेच्या

उत्सवाला हजर व्हायला मिळेल अशी मनाची एकदम खात्री झाली. त्याबरोबर आनंदही वाटला. त्याचे वर्णन करणे श्ब्दातित आहे. एकदाचा गुरूपौर्णिमेचा दिवस उजाडला, मी तिथे हजर झालो. मोठया उत्साहाने कार्यकम पार पडला. प. पू. बाबांचे दर्शन घेतले. त्यावेळी ते मला म्हणाले, काय नलगे, गुरूपौर्णिमेच्या उत्सवाला हजर रहाता येणार नाही ही शंका तुमच्या मनांत कां आली? या वाक्याने मी भारावलो. अष्टसात्विक भाव निर्माण होऊन आनंदाश्रू डोळ्यांत उभे राहिले. मी उत्तर देवू शकलो नाही. फक्त एकच जाणीव उराशी होती ती म्हणजे गुरुकृपा, तिचे माझ्यावर पूर्ण लक्ष असून ती माझी पाठराखीण आहे बस्.

असेच एकदा रात्री ९ च्या सुमारास साधनेला बसलो असतां एकाएकी प्रचंड प्रकाशाचा झोत डोळ्यासमोर दिसूं लागला. लाईट नसताना सुध्दा हा प्रकाश कसला म्हणून मी डोळे उघडून पाहिले तर खरोखरच घरभर संपूर्ण प्रकाश पसरला होता. पाहून आश्चर्य वाटले.

ghagmaharaj.guru

## गुरु माऊलीच्या मंत्राचा माहिमा

वि. ल. काकड



सन १९८२ ची गोष्ट. मी माझ्या कुटुंबासह मे महिन्यात माझ्या पुतणीच्या लग्नानिमित्त गावी गेलो होते. लग्न आमच्या गावातच होणार असल्यामुळे लग्नाच्या एक दिवस अगोदर वराला लग्नस्थळी घेऊन येण्याची प्रथा होती. त्यासाठी माझ्या थोरल्या भावाने मला असे सांगतले की घरात बरीच कामे करायची आहेत. तेव्हा तू व चिरंजीव शिवाजी माझा छोटा पुतण्या वराच्या गावी जाऊन त्यांना घेऊन या. मी त्यांना माझी अडचण अशी सांगितली की सदर गाव कोणत्या भागात आहे त्याबद्दल मला काहीच माहिती नाही. तेव्हा अशा अनोळखी ठिकाणी मी कसा जाऊ शकणार. परंतु घरातील प्रत्येक माणसाला लग्नानिमित्त अनेक कामे असल्यामुळे कोणीही जाण्यास तयार नव्हते. भावाने मला जाण्याच्या ठिकाणचा पत्ता व कसे जायचे याबद्दल सविस्तर माहिती दिली. वराचे गाव आडवळणी ठिकाणी असणारे एक छोटे गाव होते. तेथे जाण्यास प्रथम नासिक ते सायखेडा बाजाराचे गाव असे जावे लागले. सायखेडयावरून संध्याकाळी ६ ते ७ वाजताच्या दरम्यान महाजनपूर वराचे गाव येथे एस. टी. जात असे. परंतू नेमकी त्याच दिवशी महाजनपूर गावी जाणारी बस नादुरूस्त झाल्यामुळे रद्द केली गेली. आता आमची मोठी पंचायत झाली. पुढेही जाता येईना व मागेही येता येईना मध्येच अडकलो. कारण दुसऱ्या दिवशी लग्न कोणत्याही परिस्थितीत वराला आणणे भागच होते. काय करावे काही सुचेनासे झाले. यावेळेपर्यन्त रात्रीचे दहा वाजून गेले. आम्ही पुष्कळ चौकशी केली परंतु या गावी जाण्यासाठी कोणतेही साधन नव्हते. इतक्यात एका शेतकऱ्याचा टॅक्टर रस्त्याने येताना दिसला. मी त्याला विनंती केली की मला लग्नानिमित्त वराला आणण्यास महाजनपूर येथे जावयाचे आहे व या भागातील मला काहीच माहिती नाही. मी एकदम नवखा आहे. तरी कृपा करून मला मदत करा तेव्हा त्याने मला असे सांगितले की मी तिकडे जात नसून अलिकडेच्या गावी जात आहे परंतू. तेथून पुढे फक्त तुम्हाला अर्धा तास चालत जावे लागेल. येत असल्यास चला. मनात गुरूमाऊलीचे नाव घेऊन मी व माझा पुतण्या टॅक्टरमध्ये बसलो. रात्र अंधारी, प्रदेश नवखा. साधारणपणे अर्धाएक तास अंतर गेल्यावर टॅक्टरवाल्याने मला सांगितले की तुम्ही हया फाटयावर उतरा सरळ चालत गेल्यास अर्ध्या तासांत महाजनपूर येथे जाल. त्यावेळेस रात्रीचे अकरा वाजले होते. रस्त्यावर सर्वत्र अंधार व वर्दळ नव्हती. किर्र रातकिडयांचा आवाज नवखा प्रदेश अशाप्रसंगी आमची काय स्थिती झाली असेल ते परमेश्वरच जाणो. त्या भयाण रात्री आम्ही दोघेजण साधारणपणे १५/२० मिनीटे चालत गेलो परंतु अंधारामुळे मार्ग सापडत

नव्हता. काय करावे काही सुचेना. परंतु मागे फिरणेही अशक्य. अशा बिकट प्रसंगी गुरूमाऊलीच्या नामस्मरणाशिवाय मार्गच नव्हता. बाबांच्या नावाचा सारखा मंत्रजप चालू केला. आता तुम्हीच आम्हाला मार्ग दाखवा. जसाजसा बाबांचा मंत्रजप चालू केला तसतशी मनातील भिती जाऊन चैतन्य निर्माण झाले. एवढयात काय झाले कळालेच नाही. मध्ये लाईटचे दिवे दिसले. तर रस्त्याने एक मोटर कार येत होती. मी व पुतण्याने जोरजोराने ओरडून मोटर थांबवण्यास विनंती केली. मोटर कार वाल्याने आमची परिस्थिती पाहून मोटर थांबविली. तो आश्चर्याने आमच्याकडे बघत राहिला, त्याने विचारले, "तुम्ही कोण?" एवढया रात्री या आडरानात कसे आलात? केवळ तुमच्या कपडयावरून व चेहऱ्यावरून खात्री केली की हे चुकलेले प्रवासी असून काहीतरी संकटात सापडले आहेत. म्हणून मी गाडी थांबविली कारण त्या ठिकाणी रात्रीच्या वेळी नेहमी वाटमारी चालते. हे ऐकून मी त्यांना घडलेली सर्व परिस्थिती सांगितली की मी मुंबईचा रहाणारा केवळ लग्नासाठी नवरदेव आणण्यास इकडे आलो. परंतू त्या भागाची मला काहीही माहिती नाही. एवढेच काय नवरदेवाचे गाव व तिकडील मंडळींना सुध्दा ओळखत नाही ट्रॅक्टरवाल्याने मला मध्येच सोडल्यामुळे आम्ही येथे अडकून पडलो. तेव्हा कृपा करून आम्हाला महाजनपूरला सोडा. तेव्हा ते म्हणाले, "अहो, मी दुसऱ्याच गावी जाणार होतो. परंतु चुकून मी इकडे कसा आलो ते मलाच कळाले नाही. बहुतेक करून देवाने मला तुमच्या मदतीसाठी पाठविले असून आता तुम्ही काहीच काळजी करु नका. मी तुम्हाला तुमच्या मुक्कामी सोडतो." एवढे बोलून त्या सद्‌गृहस्थाने रात्रीचा त्रास सहन करून त्या आडवळणी गावी बरोबर रात्री एक वाजता सोडले. एवढेच नव्हे तर नवरदेवाचे घर शोधून त्या मंडळींना सांगितले की हे तुमचे पाहुणे चुकले होते. त्यांना मी घेऊन आलो आहे. ते फार भुकेलेले आहेत. तर प्रथम त्यांना जेवू घाला. नंतर बोलत बसा. एवढे बोलून ते सद्‌गृहस्थ ताबडतोब निघून गेले. असा आहे गुरू माऊलीच्या मंत्राचा महिमा. यापुढेही गुरू माऊलीने माझ्यावर आलेली संकटे अडीअडचणी, कोर्टाची केस, मुलीचं लग्न, मुलाला लागलेली नोकरी इत्यादि सर्व काही कार्ये बाबांच्या आशीर्वादाने सफल झाली.

बाबांच्या चरणी कोटी कोटी प्रणाम |

ghagmaharaj.guru

## बाबांच्या मंत्रशक्तीची किमया

वि. ल. काकड



मी आणि माझे कुटुंब बाबांचे गेली दहा वर्षे साधक आहोत. त्यावेळेपासून आजपर्यंत केव्हांही न चुकता बाबांची आठवण काढल्याशिवाय किंवा बाबांच्या प्रतिमेला हात जोडल्याशिवाय माझा दिनक्रम सुरू होत नाही. घराच्या बाहेर पडताना सुध्दा मी बाबांच्या प्रतिमेला हात. लावल्या खेरीज बाहेर पडत नाही. असो.

१९८० सालातील गोष्ट. माझ्या आईचे वय त्यावेळी अंदाजे ७५ वर्षे असेल. तिला मधून मधून रक्तदाबाचा विकार उद्भवत असे. ते दिवस थंडीचे होते. रात्री आठ-साडेआठ वाजता जेवण करून बसलो होतो. तोच माइयाशेजारी रहाणारे सद्‌गृहस्थ ज्यांच्याकडे टेलीफोन आहे त्यांनी मला सांगितले की, "तुझा नाशिकहून फोन आला आहे." मी लगेच फोन घेतला तर माझी आई फारच आजारी आहे तरी तू ताबडतोब गावी ये, असे मला सांगण्यात आले. मी फारच घाबरून गेलो. नाशिकला जाण्यासाठी मला रात्री ९ वाजताची बस भेटली. गाडीने मुंबई सोडल्यावर मला थंडी जाणवू लागली परंतु घाईगर्दीत निघाल्यामुळे मी फक्त अंगावरील कपड्यानिशी निघालो होतो. बाबांचे नामस्मरण करीत करीत माझी एस. टी. रात्री एक दीड वाजता नाशिकला आली त्यादिवशी नाशिकला फारच कडाक्याची थंडी पडलेली होती. थंडीने कुडकुडुन माझ्या अंगाचे बर्फ झाले होते, संपूर्ण अंग चेतनाहीन झाले होते. तोंडातून शब्दसुध्दा उमटत नव्हते. इतकी कडाक्याची थंडी होती. त्यातच माझे गाव नाशिक पासून तीन मैल अंतरावर आहे. रात्रीच्या वेळी गावी जाण्यास काहीच साधन नसते. आता काय करावे काहीच सुचेना. बाबांवर श्रद्धा ठेवून सतत त्यांच्या नामाचा मंत्रजप चालू केला. तेव्हा अचानक एक रिक्शा माइयासमोर येऊन उभी राहिली. मी त्याला विनंती केली की मी मुंबईहून आलो आहे. माझी आई फारच आजारी आहे. तेव्हा कृपा करून मला माझ्या गावी मखमलाबाद येथे सोड. त्याने ताबडतोब मला रिक्शात घेवून रिक्शा चालू केली. तशी तशी मला फारच थंडी बाजू लागती. माझे गाव बहुतेक बागायती व गोदावरी नदीच्या जवळ असल्या कारणाने थंडीच्या दिवसात फारच गारवा असतो. मला मरणाच्या वेदना चालू झाल्या. मी सारखा बाबांचा धावा चालू केला व बाबांना कळवळून विनंती केली की "हे गुरूमाऊली, या थंडीपासून मला वाचवा" असे बोलून बाबांचा मंत्रजप चालू केला. जसा जसा बाबांचा मंत्रजप चालू केला तशी तशी माझ्या अंगात उष्णता निर्माण होऊ लागली. बाबांच्या मंत्रजपाद्वारे अंगात उष्णता येऊन कडाक्याच्या थंडीतही घामाच्या धारा वाहून एक प्रकारे अंगात चैतन्याचे वारे संचारू लागले. माझे संपूर्ण

शरीर मंत्रजपाने साधनामय झाले. गाव कधी आले मला समजले सुध्दा नाही. रिक्शावाल्याने मला सांगतले की तुमचे गाव आले आता घर दाखवा. मी ताबडतोब सावध झालो. तर मी माझ्या घराच्याच जवळ आलो असून अंगातून घामाच्या धारा वहात होत्या व जराही थंडीचा मागमूस नव्हता. मी आभार मानून त्याचे भाडे दिले. घराचा दरवाजा ठोठावताच माझ्या थोरल्या बहिणीने दार उघडले. मला पहाताच सर्वजण भर झोपेतून उठले. त्या सर्वांना फार आश्चर्य वाटले की एवढया रात्री कडाक्याच्या थंडीत गरम कपड्याशिवाय कसा आला. मी मनातल्या मनात बाबांचे आभार मानले. बाबांच्याच मंत्रांच्या शक्तीद्वारे माझे मुंबई ते नाशिक थंडीपासून कसे रक्षण झाले. बाबांना अंत:करणापासून हाक मारली असता बाबा भक्तांच्या मदतीला धावून जातात हा माझा अनुभव आहे. खरोखरच बाबांच्या मंत्रशक्तीची किमया अगाध आहे.

या आजारातून आई सुखरूप उठून पुढे दोन तीन वर्षे जगली.

ghagmaharaj.guru

## "आशा"

एकदा देवाने जगातील सर्व चांगल्या वस्तू गोळा करून त्या एका चंबूत भरल्या त्याने त्यावर घट्ट झाकण बसवून तो चंबू एका माणसाकडे सांभाळण्यास दिला पण आत काय आहे याची उत्सुकता लागूल राहिल्याने त्या माणसाने चंबूचे झाकण उघडले. त्याबरोबर चंबूतल्या सर्व गोष्टी एकदम हवेत उडून पृथ्वीवरून स्वर्गात गेल्या त्याबरोबर झटदिशी त्या माणसाने झाकण लावले. पण तोपर्यंत फक्त एकच वस्तू चंबूत शिल्लक राहिली होती.

ती म्हणजे "आशा"

संग्राहक : कु. माधूरी चव्हाण

ghagmaharaj.guru

## साधनेचा महिमा

संजय काशिनाथ सानप



मी अभ्यासासाठी स. का. पाटील उद्यानात जात असे. बी कॉमच्या तिसऱ्या वर्गाला असल्यामुळे, अभ्यास सुध्दां बराच करावा लागत असे. असेच एके दिवशी अभ्यास करून उद्यानातून, मित्राबरोबर घरी परत असतांना, वेळ रात्रीची असल्यामुळे अचानक व अकारण जोरात भिती वाटू लागली, अगदी भीतीने गांगरून गेलो. त्यावेळी मला स्वत:वरील ताबा नष्ट होऊ लागल्यासारखे झाले. परत थोडया वेळाने मला जरा बरे वाटले व मी घरी परत फिरलो. परंतु दुसऱ्या दिवशी माझ्या खोलीत घरीच अभ्यासाला बसलो, पुस्तक हातात घेवून उघडले व वाचू लागलो. परंतु एकदोन ओळी वाचतांच, डोके गरगरल्यासारखे होऊन पुढे पुस्तक वाचवेनासे झाले, छाती पण धडधडू लागली, गॅलरीत पुस्तक घेवून उभा राहिलो पण तिथे सुध्दा तीच अवस्था डोके गरगरल्यासारखे होऊन छाती धडधडू लागली. या अवस्थेत उभा सुध्दा राहू शकत नव्हतो.

मला असे वाटू लागले किं काही तरी आजार झाला आहे. म्हणून मी एका स्पेशलिस्ट डॉक्टरकडे गेलो. त्यांच्याकडून शारीरिक तपासणी करून घेतली, पण डॉक्टरांच्यामतें काही आजार नाही असे निष्पन्न झाले. परंतु मला तर भयंकर त्रास जाणवत होता. अशा अवस्थेत मी माझे स्नेही श्री काकड यांचेकडे गेलो व मला होणाऱ्या त्रासाबद्दल त्यांना सांगितले. माझी ती व्यथा ऐकून श्री काकड यांनी श्री सिध्दयोगेश्वर महाराजांकडे जाण्याचा सल्ला दिला. त्यांचा पत्ता विचारून एके दिवशी त्यांच्याकडे गेलो. मला त्यांनी योग्य दिवस पाहून दिक्षा दिली. साधनेला बसल्यावर होणाऱ्या साधकांच्या क्रिया पाहून मला फारच भिती वाटत होती. म्हणून मी साधनेला जाण्याचे टाळत होतो. परंतु मी महाराजांना भेटलो व माझी अवस्था सांगितली. त्यांनी मला सांगितले की घाबरण्याचे कारण नाही. एक प्रकारची मानसिक विकृती आहे, त्याचप्रमाणे साधनेतील क्रियांनाही घाबरण्याचे कारण नाही, एखाद्या रविवारी साधनेला येवून बस, म्हणजे तुला कळेल.

त्यांच्या सांगण्याप्रमाणे मी रविवारी साधनेच्या वेळी हजर झालो. पण साधना सुरू झाल्यावर माझे लक्ष लागेना, म्हणून सहज डोळे उघडून मी साधकांच्या क्रिया पाहूं लागले. इतक्यांत माझे लक्ष महाराजांकडे गेले. ते निर्विकार अवस्थेत डोळे मिटून बसले होते, त्यावेळी असे दिसले कि महाराजांच्या शरिरातून अति सूक्ष्म पांढऱ्या रंगाचे तेजस्वी किरण बाहेर पडताहेत, मला वाटले हा कदाचित भास असेल, म्हणून महाराजांकडे मी पुन्हा बारकाईने पाहूं लागलो, पण मला असे दिसले कि ते किरण

ghagmaharaj.guru

माझ्याच दिशेने येत आहेत व त्याचे प्रमाण वाढले आहे, माझ्या दिशेने ते येत आहेत असे पाहून मी डोळे मिटून घेतले व साधना संपल्यानंतर सर्व घटना महाराजांना कथन केली ते म्हणाले, ते चैतन्य होते, तू उद्यापासून दररोज साधनेला बसत जा.

दुसऱ्या दिवशी साधनेला बसण्याचा निश्चय करून मी साधनेला बसलो, थोडया वेळात जोरात क्रिया होऊ लागल्या, क्रियांच्या अवस्थेत मला काहीच भिती वाटली नाही. त्या दिवसापासून भिती कमी होऊन, साधनेची आवड निर्माण होऊन मी दररोज साधनेला बसू लागलो. नियमित साधनेमुळे माझी भिती व मानसिक विकृती संपूर्णपणे नाहीशी होऊन अभ्यास करू लागलो. अभ्यास करून परिक्षेला सुध्दा बसलो. ही सर्व गुरूकृपाच आहे. अशी गुरुचरणी श्रध्दा दृढ होऊन गुरुकृपा अशी राहो ही गुरूचरणी प्रार्थना.

ghagmaharaj.guru

## प्रत्येक जीव परमेश्वर आहे!


आपणही एके काळी हलक्या प्रतीचे क्षुद्र जीव होतो. हलके प्राणी आपणाहून निराळे आहेत असे आपणास भ्रमाने वाटत होते. "जग हे आमच्यासाठी निर्माण झालेले आहे" असे पाश्चात्यांनी बोलताना मी ऐकले. वाघांना ग्रंथ लिहिता आले असते तर मनुष्ये वाघाताठी निर्माण झाली आहेत असे त्यांनी म्हटले असते. वाघाच्या भक्ष्यस्थानी सुलभतेने माणसे येऊन पडत नाहोत, म्हणून ती पापी आहेत असे ही त्यांनी लिहिले असते. तुमच्या पायाखाली सरपटणारा किडा म्हणजे भविष्य कालचा परमेश्वर होय.

विवेकानंद
संग्राहक: कु. सुनिता तळेकर

ghagmaharaj.guru

## गुरुविण देव नाही दुजा.....

पुरूषोत्तम विश्राम कोयंडे



गुरूचरित्राचे पारायण संपवून आरतीसाठी उभा राहिलो तोच एक गृहस्थ दरवाजांत आले. खुणेनेच त्यांना बसण्यासाठी सांगून मी आरती करून घेतली. त्या अनोळखी गृहस्थाची ओळख करून घेतली. "आपण कोण? कुठून आलांत?" पण त्या गृहस्थाचे लक्ष पोथीकडे लागून राहिले होते. त्यांनी माझ्या प्रश्नाचे बऱ्याच वेळाने उत्तर दिले, "मी आवळे, घाटकोपरला रहातो. तुमच्या प्रोजेक्टसाठी माझ्याकडे ग्रुप बुकींग आहे." मी लगेच त्या संदर्भात बोलणी करून ते गृहस्थ जायला निघाले. जातां जातां त्यांनी मला विचारले, "एक विचारू कां?" त्यावर मी म्हणालो, "विचारा, जरुर विचारा." "तुम्ही हे गुरूचरित्र पारायण केव्हांपासून करता?" त्यावर मी म्हणालो, "तरी सात आठ वर्षे झाली असतील." त्यावर ते म्हणाले, "तुम्ही गुरुदिक्षा घेतली आहे काय?" "नाही. मला गुरुदिक्षा घ्यायची फार इच्छा आहे पण माझ्या पहाण्यांत योग्य अशी असामी आलेली नाही. मी खूप हिंडलो, पण माझे समाधान झालेले नाही. आणि जो पर्यंत मला योग्य गुरुची भेट होत नाही तोपर्यंत मी गुरू करणार नाही. अर्थात गुरू ओळखण्याची पात्रता माझ्यात नसेलही. पण माझें समाधान झाल्याशिवाय मी गुरु करणार नाही." त्यावर श्री. आवळे म्हणाले, "गुरुशिवाय या भक्तीमार्गात मार्गदर्शन नाही. आणि प्रगती होऊ शकणार नाही. गुरूशिवाय पररमेश्वरप्राप्तीचा मार्ग, ज्ञानाचा मार्ग कोणीही दाखवूं शकणार नाही. हे सर्व भजन, किर्तन, वाचन याचा काहीही उपयोग नाही. एक विशिष्ट मार्गाचा अवलंब केल्याशिवाय त्यांत प्रगती नाही. तेव्हां तुम्हाला जर वेळ असेल आणि इच्छा असेल तर आमच्या सद्गुरूनकडे चला आणि जर तुमचे समाधान झालें तरच पुढचा विचार करा."

मी वेळ ठरवून एका गुरूवारी श्री. आवळे यांच्याबरोबर गिरगांवला खोताच्यावाडीत गेलो. जातां जातां मी मनांत विचार करत होतो, "कि हे गुरू कसे असतील?" "जटाधारी, भगवे वस्त्र परिधान केलेले, उग्र मुद्रा, असे चित्र रंगवित मी "गुरुप्रसाद" बिल्डींगच्या पायऱ्या चढलो. आत गेल्यावर

अंगात पांढराशुभ्र अंगरखा, लुंगीवजा पांढरे धोतर नेसलेली एक व्यक्ती आसनावर बसलेली होती. आम्ही आत गेल्यावर स्मितहास्य करून त्यांनी आम्हाला बसावयास सांगितलें, आम्ही दर्शन घेऊन समोर बसलो. आणखी बरीच मंडळी त्या खोलीमध्ये बसलेली होती. सद्गुरूं त्या प्रत्येकाची अत्यंत जिव्हाळयाने चौकशी करीत होते, मार्गदर्शन करीत होते. त्यांची ती शांत, तेजःपुंज मुर्ति पाहून मी सुखावलो. मनांत आदर निर्माण झाला. सर्वांचे बोलणे आटपून त्यांनी श्री. आवळे यांचेकडे माझ्याबद्दल

चौकशी केली "हे कोण?" तर आवळे म्हणाले, "हे कोयंडे, हयांनी तुम्हाला भेटण्याची इच्छा प्रगट केली म्हणून मी आपणांकडें घेऊन आलों." "ठीक आहे, तुम्ही कुठें रहाता?" "विक्रोळीला" मी उत्तरलो. मला भक्तीमार्गाची आवड आहे. मला याबाबतीत मार्गदर्शन पाहिजे, पण मी अत्यंत अडचणीत सापडलो आहे. मला यातून मोकळे करा" असे म्हणून मी चरणांवर मस्तक ठेवले. अभय देऊन सद्‌गुरू म्हणाले, "तुम्ही आतां आमच्याकडे आलांत. तुमची अडचण रहाणार नाही, विश्वास ठेवा, नेहमी येत जा, परमेश्वर तुमची अडचण दूर करील."

मी नित्य नियमाने दर गुरूवारी सद्‌गुरूनकडे जाऊ लागलो. हळूहळू त्यांच्या सान्निध्यात निर्भय होऊ लागलो. वेळोवेळी त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागू लागलो. एक दिवस मी गुरूमाऊलींनी दिक्षा देण्याविषयी विनंती केली, गुरूमाऊलींनी आमच्या सर्व कुटुंबियांना दिक्षा दिली त्यांच्या आज्ञेनुसार जपजाप्य, वाचन, ध्यान करू लागलो.

आमच्या वडीलांचा बिल्डरचा धंदा होता. तो मी सांभाळावा अशी वडील दिवंगत होण्याचे वेळी इच्छा होती. त्यांच्या मृत्यूनंतर मी ऑफिसमध्ये गेलो तर वडीलांना आर्थिक व्यवहारात लोकांनी फसविले होते व त्यामुळे त्यांच्यावर असलेल्या कर्जाची कल्पना आली. त्यामुळे मी भांबावून गेलो. वडीलांनी पैसे उधळले होते असे नव्हे तर ब्लॉक घेणाऱ्यांनी वडीलांकडे पैसे पोच केले नव्हते. वडील दुसऱ्या कडून कर्ज घेत होतेच त्यामुळे वडीलांच्या मृत्यूनंतर ते सर्व कर्ज देणारे माझ्याकडे येऊन पैशाची मागणी करू लागले. मी एवढे पैसे तरी कुठून देणार. शेवटी जिवंत राहू नये असे वाटू लागले. दुसऱ्या दिवशी आवळे यांना भेटून आत्महत्या करण्याचा विचार सांगितला परंतु आवळे यांनी धीर देऊन आपली सर्व हकीकत सद्‌गुरू महाराजांना सविस्तर सांग म्हणजे तुला योग्य ते मार्गदर्शन करतील. दुसऱ्या दिवशी उभयता महाराजंच्या घरी गेलो. आम्ही आर्थिक व्यवहारात कसे फसलो ते सविस्तर सांगितले. माझा आत्महत्येचा विचार ऐकून गुरूमाऊलींनी सांगितले की पहिला आत्महत्या करण्याचा विचार सोडून द्या व धंद्याचा विचार करा. ऑफिसमध्ये जाऊन बसा सर्व कामे सुरळीत होतील. दुसऱ्या दिवशी ऑफिसमध्ये गेलो तर ब्लॉकचे पैसे ज्याच्याजवळ होते ते बाकी पैसे घेऊन लोक येऊ लागले. त्यामुळे मला आश्चर्य वाटले व माझ्या मनांत आत्मविश्वास निर्माण झाला.

डोंबिवलीत मी एक प्लॉट घेतला होता त्यावर बांधकाम करावयाचे होते. पण बुकींग मिळत नव्हती. मी गुरूमाऊलींना साईटवर घेऊन आलो. भराभर बुकींग झाले आणि गुरुमाऊलींच्या हस्ते माझ्या त्या प्लॉटचे भूमिपूजन झाले. तेव्हापासून माझ्या खऱ्या धंद्याला सुरुवात झाली आणि आज सर्व सुरळीत चालले

एक दिवस मी सद्‌गुरूंना घरी येण्याचा आग्रह केला. माझ्या विनंतीला मान देवून घरी आले. मी धन्य झालो. पाद्यपूजा करून गुरुमाऊलींच्या चरणावर - नतमस्तक झालो. आनंदाश्रू वाहू लागले.

*साधुसंत येती घरा | तोचि दिवाळी दसरा ||*

गुरूमाऊलींच्या पदस्पर्शाने माझे घर पावन झाले. घरी आल्यानंतर माझ्या देवघरांकडे पाहून लावलेल्या सर्व देवांच्या तसबिरींकडे पहात म्हणाले, "तेहतीस कोटी देव आहेत तर कोणाकोणाची भक्ती तू करणार? याला व्यभिचारी भक्ती म्हणतात. यांत एकाग्रता साधत नाही. कुठेही तुमचे चित्त स्थिर होणार नाही. भक्ती एकाच देवताची करावी. त्यासाठी गुरुदिक्षा घेतल्यानंतर गुरू हाच परमेश्वर समजून त्यांची भक्ती करावी." गुरुभक्ती श्रेष्ठ आहे. जीवन मरणाच्या फेऱ्यांतून मुक्त होऊन परब्रहमाची ओळख किंवा प्राप्तीसाठी गुरूभक्तीच महत्वाची आहे." सद्‌गुरूंच्या आज्ञेप्रमाणे मी गुरुभक्तीत रममाण झालो. कुठेही गेलो तरी गुरुस्मरणाशिवाय दुसरे काही नाही.

एकदा कंपनीने माझी चौकशी केली, नोकरी जाण्याची भिती निर्माण झाली. मी धावत धावत सद्‌गुरुंकडे गेलो. सारा वृत्तांत सांगितला. सद्‌गुरू म्हणाले, "काही काळजी करुं नकोस, उद्या चौकशीला जा. मी तिथे आहे. तुझी नोकरी जाणार नाही. दुसऱ्या दिवशी मी कंपनीत गेलो. चौकशी झाली कंपनीने चौकशी बंद केली. मला कामावर रूजु केले. अशाप्रकारे गुरूमाऊलींनी माझी नोकरी वाचविली.

दुसरा मोठा अनुभव म्हणजे एकदा दुपारी १२ च्या सुमारास एक काळाकभिन्न माणूस माझ्या दरवाजांत आला. खिशातून कार्ड काढून सी.आय.डी. क्राईम ब्रान्चचा माणूस आहे. तुम्हाला साहेबांनी ताबडतोब बोलावले आहे. सी.आय.डी. काइम ब्रान्च ऐकल्याबरोबर माझी बोबडीच वळली. मी घाबरून गेलो. माझी पत्नी तर अक्षरशः रडू लागली. काय करावे काहीच सुचेना. आयुष्यात पोलीस स्टेशनसुध्दा न पाहिल्याने मला अक्षरशः मेल्याहून मेल्यासारखे झाले. मी लगेच गुरूस्मरण केले. "गुरूमाऊली, यातूंन तारणारा तुम्हीच आहात. या भयंकर संकटांतून तुमच्याशिवाय मला त्राता नाही" असे सद्‌गुरूंना सांगून त्या गृहस्थाला "उद्या मी साहेबांना येऊन भेटतो" असे म्हणालो.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी व आमच्या सौ सद्‌गुरुंकडे गेलो. आम्ही उभयतांनी धावतच जाऊन गुरूमाऊलीचे पाय धरले व म्हणालो, "सद्‌गुरू, मला वाचवा." माझी केविलवाणी अवस्था पाहून सद्‌गुरू म्हणाले, काय झाले ते सविस्तर सांग, घाबरू नकोस." मी झालेली हकीगत सद्‌गुरूंना सांगितली. त्यावर थोडावेळ स्तब्ध बसून सद्‌गुरूंनी धीरगंभीर मुद्रेने म्हणाले, "तू जाऊन ये, मी तिथे आहे, तुला काहीही त्रास होणार नाही." गुरुमाऊलीच्या शब्दाने आम्हाला धीर आला. आम्ही गुरूमाऊलींना नमस्कार करून निघालो. क्रॉफर्ड मार्केटच्या समोरच्या आवारांत हे ऑफीस आहे. पत्नीला खाली थांबवून मी तिसऱ्या मजल्याबर गेलो. गुरूमाऊलींच्या वचनावर विश्वास ठेवून मी धीराने

चाललो होतो. आंत शिरतांच समोरच केबिनमध्ये ते साहेब बसले होते. माझ्याकडे आलेला तो हवालदार त्याच्या साहेबाकडे मला घेऊन गेला. "हेच ते कोयंडे." त्यावर माइ्याकडे तिरकस नजरेने बघत साहेब म्हणाले, "काय पैसे खायला हवे, बंद करूं का? किती पैसे खाल्ले, याचे निवेदन घ्या."

आतमध्ये मी निवेदन द्यायला त्या हबालदाराबरोबर गेलो. तर बरेचसे धष्टपुष्ट इसम आतल्या बाजूस बसलेले होते. त्यांच्यामध्ये बसून एका कारकूनाने निवेदन घ्यायला सुरूवात केली, "बोला, नांव काय तुझे" मी माझे संपूर्ण नांव सांगितले. माझे नांव ऐकल्यावर समोर बसलेला एक गृहस्थ ताबडतोब उठून तिथे आला व म्हणाला, "कोण, कुठला तू? तुझ्या वडीलांचे नाव काय? तुझा गाव कोणता?" मी सविस्तर त्यांना सांगितले.

निवेदन घेणारी मंडळी एकमेकांकडे पाहूं लागली. निवेदन घेण्याचे थांबले. मला एका बाजूला घेऊन सविस्तर माहिती त्या गृहस्थाने विचारली. मी खरी हकीगत त्यांना सांगून टाकली. ते गृहस्थ म्हणाले, "काही काळजी करु नकोस, चल माझ्याबरोबर." ते गृहस्थ मला घेऊन साहेबांकडे गेले. व त्यांना समजावून सांगितले, "हा माझा माणूस आहे. विनाकारण हा माणूस लफडयात गुंतला गेला आहे. साहेबाने त्यांच्या विनंतीला मान देऊन मला लगेच जाण्याची अनुमती दिली. मी सहीसलामत सुटलो. त्या गृहस्थाचे आभार मानून खाली उतरताना डोक्यावरचे ओझे उतरल्यासारखे झाले. मला आठवले ते गुरूमाऊलींचे शब्द. "मी तिथे आहे काळजी करू नकोस." गुरूमाऊली आपल्या भक्तांना संकटमुक्त कशी करते त्याचीच ही प्रचिती. ते आपल्यामागे सावलीसारखे असतात हे मला कळून चुकले.

श्री. सद्‌गुरुंच्या सहवासात अशा अनेक प्रसंगाचे निराकारण झाले. मला हवे तशा प्रकारे गुरू मला मिळाले. गुरूमाऊलींच्या कृपेने उत्तरोत्तर प्रगती होत गेली त्यांच्या सहवासांत मला परिस्थितीशी मुकाबला करण्याचे धैर्य प्राप्त झाले. साधनेद्वारा आपण एकाग्रता साधू शकतो. परमेश्वराचे ध्यान करू शकतो हे कळून चुकले. भक्तीमार्ग काय आहे हे गुरूमाऊलींकडून मी समजावून घेतले. कुठल्याही अर्थार्जनांची अपेक्षा न करता निरपेक्ष वृत्तीने भक्तांचे अनेक प्रश्न सोडविल्याचे मी स्वतः पाहिले आहे. चमत्कार नाहीत.

कुठल्याही प्रकारची प्रसिध्दीची आपेक्षा न करता मानव जातीचे कल्याण करणारे शक्तिपातयोगी श्री. सिद्धयोगेश्वर महाराज हे कलियुगातील सत्पुरुष होत.

*जे का रंजले गांजले त्यासि म्हणे जो आपुले |*
*तोचि साधु ओळखावा देव तेथेचि जाणावा ||*

या संतवचनाची प्रचिती येथे जरूर मिळते. प्रपंचात राहून प्रापंचिक जनांचे प्रश्न सोडविण्यांत आपले जीवन व्यतीत करणाऱ्या श्री. सिध्दयोगेश्वर महाराजांच्या वयाला ६१ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यांना उदंड आयुष्य लाभो आणि त्यांचा सहवास आम्हां पामरांना निरंतर लाभो हीच परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

ghagmaharaj.guru

# महान अनुभूती ही दिव्य कृपेची

आप्पासाहेब शंकरराव सरनोबत



"तुमच्या आतडय़ांला भोके पडली असून परफोरेशन सुरू झाले आहे. पण काळजी करू नका. कुर्डुवाडी येथील अत्याधुनिक वैधकीय उपकरणे असलेल्या दवाखान्यात तुमच्यावर उपचार केले जातील घरी निरोप दिला आहे व जीप पाठविली आहे."

करमाळा येथील एका प्रेमळ वैद्यकीय अधिकारी मित्रांनी दुपारी चार वाजता वरीलप्रमाणे रोगनिदान करून मला शाब्दिक दिलासा देण्याचा प्रयत्न केला व मला काही काळ एकांतात सोडून बाहेर निघून गेले. या एकांतातच मला श्रीमद् सिद्धयोगेश्वर महाराज, माझ्यावर कमालीचे प्रेम करणारे माझे गुरूदेव यांच्या दिव्य कृपेची महान अनुभूती आली जिला वर्णिता अश्रु पराकाष्ठेने आवरावे लागत आहेत.

मी करमाळा येथे लघु पाटबंधारे कार्यालयांत उपविभागीय अभियंता म्हणून दीड वर्षापूर्वी बदलून गेलो. घरी पत्नी, बंधु व दोन लहान मुली एवढाच माझा करमाळ्यांतील परिवार व इतर प्रेमळ स्नेही सोबती. सोलापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात वारंवार बैठकीसाठी जावे लागते. असाच एके दिवशी बैठक गाठण्यासाठी अगदी वेळीच पोहोचलो. पोटात काही नव्हते व बैठक ६ व्या मजल्यावर होती. बैठक दुपारी दोन वाजता संपली. नंतर थंड पेये इ. थोडेफार झाले. आदल्या दिवसाच्या जागरणाने अतिशय थकवा आल्याने चालणेही अवघड जात होते. घरी लवकर पोहोचावे म्हणून जीपने लगेच करमाळ्याला निघालो. परतीच्या प्रवासात कमालीचा थकवा व अस्वस्थता जाणवल्याने जीप दवाखान्यात नेली. तेथील तपासणीतील निदान वरीलप्रमाणे ऐकवून डॉक्टर बाहेर गेले.

वास्तविक कुटुंबाचा कर्ता या नात्याने माझ्या तोंडचे पाणी पळावयास हवे होते पण अखिल विश्व ज्यांचे कुटुंब आहे असे अधिकारसंपन्न कर्ते परमपूजनीय सिध्दयोगेश्वर महाराज यांच्या विश्वकुटुंबातील मी बालक असल्याने मी डोळे मिटून तपासणी टेबलावर पडून राहून माझ्या गुरूमाऊलींचे स्मरण केले. मात्र तत्क्षणी माझे स्वत्व हरवले गेले व मस्तकापासून पायापर्यंत एका गरम पण महान शक्तीशाली सामर्थ्याचा संचार होत असल्याची अनुभूती मी १५ ते २० मिनिटे घेत राहिलो. घामाघूम झालो. मनाने मात्र श्रीगुरुचरणापाशीच होतो. या शक्तीचा संचार पोटापाशी आल्यावर माझे नामस्मरण आतल्या आत पण जोरात होत होते. हे सर्व आपोआप घडत होते. मनःचक्षुसमोर श्रीगुरूचरण सतत होते.

एवढयात माझा धाकटा भाऊ चि. प्रदीप आला व चौकशी करू लागल्याने माझी तंद्री संपली व खूपच हुषारी वाटत होती. माझ्या विनंतीवरून डॉ. नी तात्पुरत्या इलाजाचे औषध दिले व चमत्कार असा की, आजतागायत माझ्या साधे पोटातसुध्दा दुखलेले नाही.

१९८१ साली श्रीमद् सिध्दयोगेश्वर महाराजांच्याकडून दिव्य दीक्षा प्राप्त झाल्यावर नियमित साधनातून अनेक अलौकिक यौगिक अनुभव आलेले आहेत. पुण्यवंत माझ्या गुरुदेवांचे चरणी लागून आपल्या जीवनाचे सार्थक घडवून घेतील यापेक्षा अधिक काय लिहावे.

ghagmaharaj.guru

## "माझं सासर"

*माझं सासर नांदत | डोंगरा पल्याड राईत*
*वाट वाकडी धावते | गर्द झाडांच्या कुशीत || १ ||*

*माझी सासु देवगुणी | कुणी बोलु नका तीला*
*जर समजलं मला | फजीती करीन वक्ताला || २ ||*

*माझा सासरा भी मोठा | त्याचा लई गं दरारा*
*झाडं, फुलं, पशु पक्षी | तीथं वेळ जातो सारा || ३ ||*

*माझा धनी गं रांगडा | जसा भोळा गं शंकर*
*नाव झालं मुलखात | जीव झाला वारा हुरा || ४ ||*


*देव पांडुरंग आला | मला आशिर्वाद दिला*
*शंभु शिखरीचा राजा | सांब सदाशिव बोला || ५ ||*

कवी - सु. धों. मोहिते

ghagmaharaj.guru

# पुनर्जन्म

सौ. प्रातमा बळीराम माधव



*गुरूब्रहमा गुरूविष्णु गुरूर्देवो महेश्वरा:*
*गुरू साक्षात परब्रहम तस्मै श्रीगुरूर्वे नम:*

हा लेख लिहायला घेतला खरा पण काय लिहू? मी किती लिहू? तरी पण अडीच वर्षाच्या कालावधीत आलेली दिव्यत्त्वाची प्रचिती वाचकांसमोर मांडण्याचा मूक आणि छोटासा प्रयत्न करते.

*जिथें वेदही म्हणती नेती नेती |*
*तो गुरू महिमा वर्णावा किती |*

तर तेथे माझी सामान्याची शक्ती पुरेल कैसी?

गुरू हे ब्रहमा, विष्णू, महेश यांचे स्वरूप आहे. ब्रहम हे विश्वाला प्रकाशित करते पण सदगुरू साक्षात्वादारे ब्रहमाला प्रकाशित करतात. अनेकविध दानाहून, तीर्थाहून, मंत्र जपाहून श्रीसद्‌गुरू चरण श्रेष्ठ आहेत. शिव आणि शक्ती हेच गुरूंचे स्वरूप आहे. परीस लोखंडाचे सोने बनवितो, पण स्वतःसारखा परीस बनवित नाही. पण श्रीसद्‌गुरू शिष्याला स्वतःसारखे ब्रहमरूप करून सोडू शकतात. इतका अगाध, अतुलनीय, असीम सद्‌गुरूंचा महिमा आहे. श्रीसद्‌गुरुंचा कळीकाळालाही धाक आहे. अशा ह्या महान् श्रीगुरुंनी माझ्या जीवनांत कशी क्रान्ती घडविली?

लहानपणापासून माता-पित्यांनी साधुसंतांच्या दर्शनाचे बाळकडू पाजलेले. त्याला जोड मिळाली स्वामी समर्थ (अक्कलकोट महाराज) सेवेची. मी पाच वर्षे कांदेवाडीत स्वामीच्या मठात जायची. त्याचप्रमाणे अभिषेक, मंत्र, जप, अनुष्ठाने, पारायणे, उपवास वगैरे करायची. हे सर्व चालू असतानाच मी आजारी पडली. दमा, नेहमी सर्दी, ताप, अल्सर, स्पाँडेलेसीस, शरीराला कंप सुटून बेशुध्द पडणे असे वारंवार व्हायचे. शरीर गुण येण्याच्या पलीकडे गेलेले. सर्व उपचार संपलेले होते. जीवनाचा वीट आलेला होता. पण मात्र परमेश्वरावर नितांत श्रध्दा होती.

४ जानेवारी १९८६ शनिवार दुपारी स्वामींच्या मठात गेली. स्वामींच्या पादुकांना मिठी मारून खूप खूप रडले. स्वामींना प्रार्थना केली. "स्वामी मी या व्याधींनी त्रस्त झाले आहे. अजूनही माझी तुम्हाला का दया येवूं नये? डोळ्यांत प्राण आणून १० वर्षे सद्‌गुरूंची वाट पाहीली, आता तर प्राण जायची वेळ

आली तरी कुणी मार्गदर्शक गुरू भेटत नाही? तुम्ही जर सद्गुरूंची भेट करून दिली नाही? तर या पादुकांवर डोके आपटून प्राण सोडीन. विमनस्क मनस्थितीत धडपडत घरी आले.

सोमवार दि. ९ जानेवारी १९८६ ला आमच्या दुकानांत एक गृहस्थ आले. माझ्या पतींना म्हणाले, "मिसेसची प्रकृति बरी नसते तेव्हां स्वामी समर्थांच्या मठापासून दोन मिनीटाच्या अंतरावर श्रीसद्गुरू सिद्धयोगेश्वर महाराज आहेत. त्यांच्याकडे तुमच्या पत्नीला घेवून जावू या. त्याच दिवशी संध्याकाळी प. पू. अनंत कोटी ब्रहमांडनायक राजाधिराज श्रीसद्गुरू सिद्धयोगेशवर महाराजांचे दर्शन घेतले. माझे सदगुरू मला भेटले व भाग्य उदयाला आले.

१० एप्रिल १९८६ (गुढी पाडवा) ला श्रीसद्गुरूनी शक्तीपात दिक्षा देवून कल्पनातीत आनंदाच्या साम्राज्यांत नेवून बसविले. माझा पुर्नजन्म झाला असेच मी समजते. दिक्षा घेतल्यानंतर माझे सगळे रोग कुठच्या कुठे पळाले त्यानंतर महामाया कुंडलीनी शक्तीने आनंद द्यायला सुरवात केली.

मी साधनेला बसले होते. साधना करीत असता महाराज मला उंच डोंगराच्या पायथ्याशी घेवून गेले. डोंगर चढायला खूपच खूप पायऱ्या होत्या. पहिल्या पायरीवर मी असताना मी म्हणाले अहाहा! काय निसर्ग सौन्दर्य आहे. तेव्हां महाराज म्हणाले या निसर्गात गुढ अर्थ भरलेला आहे. निसर्गापासून आपल्याला अनेक गोष्टी शिकायच्या असतात. पायऱ्या चढत चढत आम्ही बरेच वर गेलो. पायऱ्या चढून मी थकले आहे याची जाणीव महाराजांना झाली असावी. महाराज म्हणाले, थोडा वेळ विश्रांति घेवू या. तिथेच एका पायरीवर आम्ही बसलो. समोर तळे होते. त्यांत खूप कमळें होती. एका विकसित झालेल्या कमळाकडे पहात मी बसले. बघता बघता कमळ मोठे झाले. त्यांत विष्णूची धवलमूर्ती दिसायला लागली. आश्चर्याने महाराजांना मी म्हणाले, "महाराज बघा बघा, ही तर आपल्या घरची धवल मूर्ती." असे म्हणून बाजूला पहाते तर महाराज अदृष्य. हे विष्णू कोण? माझे परमप्रिय सिध्दयोगेश्वर महाराज.

दुसरा अनुभव - साधनेला बसले. मनाची स्थिरता होईना म्हणून समोर शंकराची पिंडी आहे अशी कल्पना करून पिंडीवर बेल वहायला लागली. पहाते तो महाराजांचे दोन्ही पाय शंकराच्या पिंडीवर. मला वाटले आपले काही तरी चुकले असावे म्हणून महाराजांची मूर्ती समोर आणून ओम् नमः शिवाय म्हणून गुरुचरणांवर बेल वहायला लागली. तो काय आश्चर्य. महाराजांच्या दोन्ही पायांच्या मधून पिंडी वर वर येत आहे असें दिसले. म्हणजे आपले गुरू हे प्रत्यक्ष शिव शंकर आहेत.

*ब्रम्हा, विष्णू, महेश्वर जानत अविवेक*
*प्रभू जानत अविवेका |*
*प्रणवाक्षर ओम् मध्ये, प्रणवाक्षर ओम्*
*मध्ये ए तीनो एका |*

श्रीसद्गुरुंची दृष्टी बाहेर असली तरी त्यांचे सर्व लक्ष अंतरंगात असते. श्रीसद्गुरु सर्वज्ञ असून त्रिकालदर्शी आहेत.

साधकांच्या प्रत्येक हालचालीवर श्री सद्गुरुंची लक्ष असते. वेळोवेळी साधकांना ते सावध करतात. मी अनेक तीर्थक्षेत्रे एकदा पाहून आले आहे. त्यामुळे देव देव करीत पैशांचा आणि वेळेचा अपव्यय करीत मला कुठे भटकावेसे वाटत नाही. कारण सर्व तिर्थे श्रीसदगुरूंच्या चरणी आहेत. भक्तांच्या संसारातील अनेक संकटे महाराज स्वतःच्या शिरावर घेत असतात. स्वतःला काळजी नाही एवढी काळजी आपल्या गुरूंना असते. ते प्रसंगी भक्ताच्या केसालाही दक्का लागू देत नाहीत.

*जे प्रचितीस आले खरे |*
*तेची घ्यावे अत्यादरें |*
*अनुभवाविण उत्तरे फलकटे जाणावी |*

पतीच्या वडिलोपार्जित मालमत्तेवरून वाद चालू होते. संपत्ती आहे तिथे संघर्ष हा आहेच. शेवटी आपसांत समझोता करून ४ लाखाला मालमत्तेची किंमत झाली. आम्ही ही संपत्ती ४ लाखाला विकत घेतली. ही घटना २३ मे ला १९८८ ची. २४ तारखेला दुसऱ्या दिवशी ११ वाजता ८० हजार डिपॉझिट भरायचे होते. ११ वाजेपर्यंत आमच्या जवळ एकही पैसा नव्हता. घरांतील सर्व सोने विकले व पतीच्या एका सदुगृहस्थ मित्राने मदत केल्यामुळे ऐंशी हजार रु. डिपॉझिट भरले. पुढे १५ जूनला २ लाख त्रेपन्न हजार तीनशे रू. समोरच्या भागिदाराला देणे भाग होते. फक्त २३ दिवसांत ही रक्कम द्यायची होती.

कालचक्र कुणासाठी थोडेच थांबणार? पहिले १० दिवस असेच गेले. जस जसे दिवस जवळ येत होते तस तशी हृदयाची धडधड वाढत होती. डोक फिरायची पाळी आली. अर्थात हा विषय गुरूमहाराजांना सांगितला. महाराज म्हणाले, माझा तुला आशिर्वाद आहे. घाबरू नकोस आणि त्यानंतर अनेक नातेवाईकांनी, मित्रपरिवारांनी, ज्यांना कधी मी पाहीले नव्हते त्यांनी सुध्दा काहीही लेखी न करता २ लाख त्रेपन्न हजार तीनशे रू. दिले. सर्व व्यवहार निर्विघ्नपणे पार पडला श्री सद्गुरुंचा आशीर्वाद असल्यानंतर भक्तांना काय कमी पडेल? ज्यांनी मला मदत केली ते श्रीगुरूदेवांनी देवदूत पाठविले एवढे निश्चित. एवढी मोठी रक्कम काहीही लेखी व्यवहार न करता जमा करणे ही अशक्यकोटीतील गोष्ट नव्हे काय. हा सर्व अद्भूत प्रकार त्या महामाया कुंडलीनी शक्तीचा व तिला जागृत करणाऱ्या श्रीगुरूदेवांचा. असे महान योगीयांचे योगी सिध्दयोगेश्वर महाराज मला जन्मो जन्मी लाभो. माझ्या हातून त्यांची अविरत सेवा घडो. महाराजांचे आशिर्वाद आम्हां भक्तांच्या पाठीशी राहो.

श्रीसद्गुरू सिद्धयोगेश्वर महाराजांवरील भक्तीने सुगंधीत झालेले हे देहपुष्पच मी त्यांचा चरणी ठेवते, यापेक्षा माझ्याजवळ माझ्या गुरूंना द्यायला काय आहे?

ghagmaharaj.guru

## मोक्षाची गुरुकिल्ली "शक्तिपात योग"

प्र. पुं. गोडगे, पंढरपूर

शक्तिपात दिक्षेद्वारा साधक शिष्यांना कैवल्य प्राप्त करून देणारे प.पू. योगीराज श्रीसिद्धयोगेश्वर महाराज तथा बाबा यांचे षष्ठयाब्दिपूर्ती निमित्त त्यांना हार्दिक शुभेच्छा व चरणी अभिवादन करून शक्तिपाताविषयी सद्‌गुरू कृपेने सुचलेले विचार खाली देत आहे.

विश्वाची उत्पत्तीच मुळात आश्चर्याने भरलेली आहे. पिंडी ते ब्रम्हांडी आणि ब्रम्हांडी ते पिंडी अशी आश्चर्यभरीत रचना आहे. याचा उलगडा मोठ मोठया तत्ववेत्त्यांना सुध्दा होत नाही. बीजामध्येच वृक्ष आणि वृक्षापोटी बीज असे आश्चर्य या परमेश्वराने निर्माण केले आहे. हे सर्व जग पंचमहाभूते पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश यापासून निर्माण झाले. या मध्ये जीव व जीवासोबत आत्माही वास करू लागला. आत्मा म्हणजेच परमात्मा आणि म्हणून ज्ञानेश्वरी सुरूवात करताना

*ओम नमोजी आद्या | वेद प्रतिपाद्या |*
*जय जय स्वयंवेद्या |आत्मरूपा ||*

असा जयजयकार ज्ञानेश्वर माऊलींनी केला. स्वयंवेद्या आत्मरूपाचाच शोध घ्यावयाचा आहे. त्याचीच प्राप्ति करावयाची आहे. लक्ष चौऱ्यांशी योनी फिरून झालेवर हा मानवाचा जन्म मिळतो. यासच फक्त ज्ञान आहे. विचारशक्ति आहे. इतर प्राण्यामध्ये विचारशक्ति नाही. त्यांना भय, मैथून व आहार एवढेच ज्ञान आहे. या भौतिक जगात माणसास वाटते आपण सर्व करतो पण करता करविता तो वेगळाच आहे. ज्याप्रमाणे कळसूत्रीच्या खेळात बाहुल्या नाचतांना दिसतात. पण त्यांना नाचविणारा सूत्रधार दिसत नाही. तदवत या भौतिक जगाचे आहे याच्या सर्व कळा अनंता आधीन आहेत. तुका म्हणे "हाती कळा सकळ अनंती||" व तो अनंत सर्वांभूती, सर्वा ठायी आहे. सर्वअंतर्यामी आहे.

*तुका म्हणे नाही मिळो येत शिळा |*
*रंगासी सकळा स्फटीकाची ||*

स्फटीकाचा तुकडा ज्या रंगात ठेवला तसा तो दिसतो. पण तसा तो नसतो. तशी आत्म्याची स्थिती आहे. आत्मा म्हणजेच परमात्मा. त्याचे ज्ञान होणे म्हणजेच मोक्ष: आणि तो मिळविणे फक्त या जन्मीच शक्य आहे. परंतु माणूस या संसारी मोहास बळी पडतो. मी, मी, माझे तुझे हा व्यर्थ अभिमान

करतो. वास्तविक याचं काहीच नाही. या नसत्या अहंकाराने दुःख मात्र ओढवून घेतो. श्री संत तुकाराम महाराज म्हणतात:

*देहाची भावन वासनेचा संग |*
*नावडे उबग आला याचा ||*

*तुका म्हणले देव अंतर यामुळे |*
*आशा मोह जाळे दुःख वाहे ||*

या जगांत जेवढे म्हणून दृष्य आहे ते सर्व नाशवंत आहे. पंचमहाभुताची उसनी घेतलेली मालमत्ता ज्याची त्यास परत करणे आहे. तव्हे करावीच लागते व शेवटी जेथल्या तेथे आहे. त्या स्थितीत सोडून "तो" जातो. तो. म्हणजे कोण? येतानाही दिसत नाही व जातानाही विसत नाही. ज्याचेपासून आला तिकडे त्यास जावे लागते.

*तुका म्हणे या सकळांचा जनिता |*
*येथे ऐक्यता सकळासी ||*

या संसार बंधनातून मुक्त होवून मोक्ष साधावयाचा असेल तर तो फक्त समर्थ सद्‌गुरूच देवू शकतात आणि म्हणून सद्‌गुरुंस शरण गेले पाहिजे. नुसता नमस्कार केला म्हणजे शरण जाणे असे नाही. "मी" पणा सोडला पाहिजे. हव्यास सुटला पाहिजे.

*शरणागत झालो | तेणे मी पण चुकलो ||*

असे झाले पाहिजे

<u>गुरू व गुरुभक्ति</u>

या जगात गुरू पुष्कळ भेटतात पण सद्‌गुरू एखादेच. जे मोक्षाची प्राप्ती करून देवू शकतात तेच सद्‌गुरू.

*सत्यचि असती गुरू बहुत |*
*किती वदावे ते अगाणित ||*

*दावितील जे सुपंथ |*
*तेचि गुरूनाथ म्हणावे ||*

सद्‌गुरू प्राप्तिसाठी सुध्दा पूर्व पुण्याई लागते. अनेक जन्म घ्यावे लागतात. तेव्हां कोठे सद्‌गुरू प्राप्ति होते. जेव्हां आपण सद्‌गुरूस शरण जातो तेव्हां हा देह सदगुरू आधीन करतो. त्यावर सद्‌गुरूंची. सत्ता असते. सद्‌गुरू परिक्षा घेतात त्या परिक्षेस शिष्यास उतरले पाहिजे. आपल्या शरीरांविषयीचे ममत्व नाहिसे झाले पाहिजे. सद्‌गुरूंना आनंद कसा मिळेल यावर लक्‌ष पाहिजे. भक्ति कशी असावी याबद्दलची महान योगी गोरक्षनाथांची कथा सर्वश्रुत आहे. सद्दगुरू मच्छिंद्रनाथाना आवडणारे वडे मिळविण्यासाठी, वडे देणाऱ्या बाईस, मागितल्याबरोबर उजवा डोळा गोरक्षनाथांनी काढून दिला व वडे आणले. नंतर डोळयावर हात ठेवूनच (बिबत्स दिसू नये म्हणून) वडे खाण्यासाठी सद्‌गुरूस विनंती केली. झाला प्रकार सद्‌गुरूंचे ध्यानी आला तरी पण ते म्हणाले आता दुसरा डोळा काढून दे तेव्हांच मी वडे खाईन. हे ऐकताच गोरक्षनाथांना ताबडतोब दुसरा डोळा काढून दिला. केवढी ही गुरूभक्ती. नंतर सद्‌गुरूकृपेने दोन्ही डोळे गोरक्षास प्राप्त झाले हे वेगळे सांगणे नको.

नाहीतर कामापुरते शिष्यत्व मिळविणारे फार. आपले इच्छित काम झाले, प्रमोशन मिळाले, आजारातून बायको बरी झाली, आयुष्यात उर्जीतावस्था आली, ऑपरेशन पार पडले, आणखी बरीच यादी वाढविता येईल. पण थोडक्यात ठराविक काम झाले, गुरुकडे जायचे बंद. अशी गुरुभक्ती काय कामाची? सद्‌गुरूकडे कशासाठी जायचे. मोक्ष प्राप्ती करून घेण्यासाठी कि भौतिक सुखाच्या प्राप्तीसाठी? गुरुभक्ती कशी असावी एकनाथांसारखी, ज्ञानेश्वर माऊलीसारखी. सद्‌गुरू मनांत ठसावा लागतो. जेव्हां एकनाथ हृदयी सद्‌गुरू ठसला तेव्हांच सद्दगुरू जनार्दनांचे उष्टे पान सुध्दा नाथांनी प्रसाद म्हणून भक्षण केला. एवढेच नाही. तर पीकदाणीतील थुंकीसुध्दा पिऊन टाकली व पीकदाणी चाटून पुसून स्वच्छ करून दिली. केवढी ही भक्ती, विश्वास व सदगुरू निष्ठा. शिष्याचे हृदयी दृढता कशी पाहिजे याविषयी समर्थ म्हणतात:-

*या कारणे दृढ विश्वास | तोचि जाणा साच्छिष्य |*
*मोक्षाधिकारी विशेष | अग्रगण्य ||*
*जो सद्‌गुरु वचने निवाला | तो सायुज्यतेचा आंखला |*

*संसार पांगे पांगिला । न वचे कदा ॥*
*सदगुरूहूनी देव मोठा । जयासी वाटे तो शिष्य करंटा ।*
*सुटला वैभवाचा फाटा । सामर्थ्य पिसे ॥*

प. पू. श्री सिध्दयोगेश्वर महाराज (बाबा) हे प. पू. योगीराज सद्गुरू श्री गुळवणी महाराजांचे शिष्य. यांची आपल्या सद्गुरूंवर निष्ठा फार. सद्गुरुंचे स्थानआपले हृदयात परमोच्चपदी असावयास पाहिजे. प. पू. बाबांना आपले सद्गुरुंचे समर्थते विषयी फार अभिमान. सद्गुरूंविषयी अभिमान असावयास पाहिजेच. आपले सद्गुरूविषयी अपशब्द पू. बाबांना अजिबात खपत नाही. सद्गुरूविषयी अपशब्द उच्चारणारी व्यक्ति कितीही उच्चपदस्थ असो त्यास खडसावल्याशिवाय सोडणार नाहीत. हृदयी गुरू निष्ठा फार. सद्गुरूविषयी पू. बाबांचे मनांत अत्यंत आदरभाव व निष्ठा रुजलेली आहे. त्याचे गुरू निष्ठेविषयीचा एक प्रसंग मुद्दाम नमूद करावासा वाटतो.

एकदा प. पू. सद्गुरू गुळवणी महाराज मुंबईस मुक्कामास असताना त्यांचे दर्शनासाठी मोठी लांबच्या लांब रांग लागली. रांगेतून दर्शनास जावे तर वेळ फार लागणार. विचार केला, सद्गुरूंचे चरण दर्शन कशासाठी घ्यायचे तर त्यांचे चरणानी पावन झालेली धूळ (चरणधूळ) आपले माथी लागावी म्हणून. या वेळी पू. बाबांनी काय करावे. ते सरळ पूज्य महाराजांचे खोलीकडे गेले. तेथे पू. महाराजांच्या वहाणा सोडलेल्या होत्या, त्या वहाणावरची धूळ आपल्या हातांनी आपल्या कपाळी लावली व नमस्कार करून परत निघाले. शिष्याचे हृदयी सद्गुरू निष्ठा अशी पाहिजे. सद्गुरू कृपा झाली तर शिष्यास मोक्षांधिकारी बनण्यास कसला विलंब. सद्गुरू महिमा वर्णन करताना निपट रंजन म्हणतात:-

*जोग जगत कर देखो । ध्यानकूं कर देखे ।*
*करम कूं कर देखे । कुछ भी भयो नही ॥*
*स्नान संध्या कर देखे । देवपूजा कर देखे ।*
*पवनशीस चढा देखे । बाल भी उखाडो नही ॥*
*काशी रामेसर फिर देखे । द्वारका जगंन्नाथ देखे।*
*आयोध्यामथुरा देखे । देव तो मिला नही ॥*
*तन मो खाक चढाई । जहा दाढी भी बढाई ।*
*निंबकी पात खाई । झ्यांट भी भयो नही ॥*
*कहे निपट निरंजन लाल । मिले जब सद्गुरू दयाल ।*
*तब एक पलख में उजाल । सब खलक भर अलख दिखायो ॥*

सद्गुरूकृपेचा महिमा असा अगाध आहे. देवादिकांनासुध्दा याचा पार कळला नाही.

*ब्रहमा विष्णू महेश्वर |*
*तया न कळला गुरूचा पार ||*
*काय वर्णू शकेल पामर |*
*शिणला फणिवर सहस्त्रबुध्दे ||*

<u>शक्तिपात योग -</u>

मोक्ष प्राप्ती निरनिराळ्या मार्गाने होते. पण त्यास कष्ट फार. परंतु सिध्द मार्गामुळे कैवल्य प्राप्ति सहज होते. विनासायास सिद्ध मार्ग हा जवळचा मार्ग आणि हा मार्ग फक्त सिद्ध सदगुरु जाणतात. हा सहज सिध्द मार्ग म्हणून यास सिध्द योग किंवा शक्तिपात योग असे म्हणतात. यासच श्री ज्ञानेश्वर माऊलींनी पथराज असे म्हटले आहे.

<u>कुंडलिनीचे स्थान -</u>

आपल्या शरीरात नव नाड्या आहेत. त्यातच कुंडलिनीचे स्थान आहे. या नाड्या कोणत्या, याचे सुंदर वर्णन श्री दत्त प्रबोध या ग्रंथात केला आहे.

*नव नाडी असती देही |*
*त्या पथक सांगतो पाही |*
*नामे ऐकोनिया घेई |*
*स्थाने ते ही निवेदिन || ४५ ||*

*सकळ नाडींचे अधिष्ठान |*
*ते कुंडलिनी नामे जाण |*
*अष्ट पृथकत्वे भिन्न भिन्न |*
*किजे श्रवण सांगतो ||*

*हंस रुपिणी प्राण वाहिनी |*

ghagmaharaj.guru

*इडा पिंगला चौघी जणी |*
*गांधारी आणि हस्तिनी |*
*पुखा शंखिनी आठवी ||*

*एवं नाडिया नवं |*
*याचा कोठोनी कैसा ऐक प्रभाव |*
*कर्णापासनी करी धाव |*
*गांधारी वैभव हस्तिनीचे ||*

*पुखा शंखिनी भल्या |*
*नेत्रापासोनी निघाल्या |*
*चरणांगुष्ठाते पावल्या |*
*तेथेचि स्थिरावल्या जाणिजे ||*

*इडा पिंगळा घ्राणाहूनी |*
*कष्टी राहिल्या व्यापुनी |*
*हंस आणि प्राणवाहिनी |*
*पावल्या जावोनी टाचेसी || ५० ||*

*या आठी ते आवरून |*
*असे कुण्डलिनीचे स्थान |*
*तिचे बळ बळावोन |*
*केले आकर्षण देहासी || ५१ ||*

*आणि एक असे गुज |*
*ते मी निवेदितो तुज |*
*सुषुम्रा वज्रनाडी सतेज |*
*येथील गुज गुरू जाणे || ५२ ||*

ghagmaharaj.guru

*वज्रदंड मणिपूर मार्ग |*
*तेथेचि तिचा असे प्रसंग |*
*तया जाणावयाचे अंग |*
*करिता लाग न करवे || ५३ ||*

*हे नवाहोनी आगळी दावी |*
*हे श्री गुरू मुखे ओळखावी |*
*त्या कृपेने चिगती साधावी |*
*येरा ठावीन पडे ती || ५४ ||*

सुषुम्ना हे महातीर्थ आहे. आणि या दरवाज्यावरच कुण्डलिनी निद्रीस्थ असते आणि ती जागृत झाले शिवाय जिवाचे शिवासी ऐक्य होत नाही. ती जागृत करण्याची पद्धत किंवा मार्ग फक्त सदगुरुच जाणतात.

कुण्डलिनी चे बहारदार वर्णन माऊलींनी ज्ञानेश्वरीच्या ६ व्या अध्यायात केले आहे.

*नागिणीचे पिले | कुंकुमे नाहले |*
*वळण घेऊनि आले | सेजे जैसे || ६.२२*
*तैशी ते कुण्डलिनी | मोटकी औट वळणी |*
*अधोमुख सर्पिणी | निदेली असे || ६.२३*
*विध्धुल्लतेची विडी | वन्हिज्वाळाची घडी |*
*पंधरेयाची चोखडी | घोटीव जैशी || ६.२४*
*तैशी सुबुद्ध आटली | पुटी होती दाटली |*
*ते वज्रासने चिमुटली | सावधु होय ||*

अशी ही साडेतीन वेटोळे घेवून पहुडलेली कुण्डलिनी शक्ति जागृत झाले शिवाय ब्रम्हपद प्राप्त होत नाही. श्रीकृष्ण परमात्म्यानी अर्जुनास उपदेश करताना म्हटले आहे -

*इये अभ्यासि द्दढ होती |*
*ते भरवसेनि ब्रम्हत्वा येती ||*

<u>शक्तिपात दिक्ष : -</u>

या मार्गाने मार्गक्रमण करणेसाठी समर्थ सद्गुरू शिष्यास दिव्यदृष्टी प्रदान करतात म्हणजेच शक्ति संक्रमण करतात. म्हणून या प्रक्रियेस शक्तिपात म्हणतात.

आपण सर्व सामान्य कोटीतील माणूस. परमेश्वराचे स्वरूप कसे पाहू शकणार. एका सुर्याचे तेज आपण पाहू शकत नाही. कोटी सूर्याचे तेज असणाऱ्या परमेश्वराचे विराट रूप कसे पाहू शकू? साहजिक हीच शंका अर्जुनास आली तेव्हां श्रीकृष्णानी अर्जुनास आलिंगन दिले व दिव्यशक्ती प्रदान केली. याचे भावस्पर्शी वर्णन माऊलींनी ज्ञानेश्वरीत केले आहे:-

*मग सावळा सकंकणु । बाहु पसरोनि दक्षिणु ।*
*आलिंगनला स्वशरणु । भक्त राजुतो ॥*
*न पवता जयाते । कांखे सनि बुद्धितें ।*
*बोलणे मागौते । ओसरले ॥*
*ऐसे जे काही एक । बोला बुध्दीसीही अटक ।*
*से द्यावया मिष । खेवाचे केले ॥*
*हृदया हृदय एक आले । ये हृदयीचे ते हृदयी घातले ।*
*दैत न मोडता केले । आपणा ऐसे अर्जुना ॥*
*दीपे दीपु लाविला । तैसा परिष्वंगु तो जाला ।*
*दैत न मोडता केला । आपण पे पार्थु ॥*
*तेव्हां सुखाचा मग तया । पुरु आला तो धनंजया ।*
*तेथ वाडु तऱ्ही बुडोनिया । ठेला देवो ॥*
*सिंधू सिंधूते पावो जाये । ते पावणे ठाके दुणा होये ।*
*जरी रिगे पुखणिये । आकाशही ॥*
*तेसे तया दोघांचे मिळणे । दोघा नावरे जाणावे कवणे ।*
*किंबहुना श्रीनारायणे । विश्व कोंदले ॥*

अशा प्रकारे शक्तिसंक्रमण समर्थ सद्गुरु आपले शिष्यामध्ये चार प्रकारे करतात. योगवासिष्ठात म्हटले आहे:-

*दर्शनात, स्पर्शनात, शब्दात कृपया शिष्य देहके |*
*जनयेद्यः समावेशं शांभवंस हि देशिकः ||*

जे दर्शनाने, शब्दाने, स्पर्शाने व कृपा म्हणजे संकल्पाने शिष्याचे देहात ज्ञानाचा समावेश करतात ते साक्षात शिवस्वरूप असतात. गुरूकृपेने कुण्डलिनी शक्ती जागृत होणे यासच शक्तिपात दिक्षा म्हणतात.

सद्‌गुरू हस्तस्पर्शाने, मन्त्रोपदेशाने, दृष्टीने किंवा संकल्पाने श्रध्दाळू शिष्यात शक्तिचा संचार करीत असतात. यामध्ये संकल्प हा सर्वामध्ये अनुस्यूत असल्याने तोच मुख्य आहे. स्पर्शादिक बाहय साधन आहे. स्पर्शद्वारा होणारी दिक्षा, स्थूल दीक्षा, मन्त्रोपदेशाद्वारा होणारी सूक्ष्म व दृष्टीद्वारा व संकल्पाने होणारी दीक्षा सुक्षतम होय. या दीक्षेचा अनुभव म्हणजे

*सद्‌गुरु साचा सुरमा नखशिख मारापूर |*
*बाहर घाव न दिखाई भितर चकनाचूर ||*

या दीक्षेमुळे मुक्तानंद अनुभवता येतो पण तो सांगता येत नाही. उदा. - एखादे लहान मुल खेळताना त्याचे बोबड्या बोलाचे कौतुक बाळाचे मातापिताच अनुभवू शकतात. परंतु त्या आनंदाच्या उर्मीचे वर्णन करून सांगता येत नाही. साखरेची गोडी अनुभवता येते पण ती सांगता येत नाही. या मार्गाने मार्गक्रमण करीत समाधीसुख भोगताना साधकाची भाव अवस्था कशी होते याचे सुरेख वर्णन नाथ महाराजांनी केले आहे:-

*अंगी रोमांच खरवित |*
*स्वेद बिंदु डळमळित |*
*चित्त चैतन्य द्रवत |*
*तेणे सद्गतीत पै वाचा ||*
*हर्ष ओसंडता पोटी |*
*अर्धोन्मीलीत होय दृष्टी |*
*जीवशीवा पडली मीठी |*
*ध्यान त्रिपुरी मावळली ||*
*नयनी अश्रुंचा पूर लोटी |*

*उभंडून संटेची पोटी।*
*होत जीव भावाची तुटी।*
*पडे सृष्टी मूर्च्छित॥*
*आक्रंदे थोर आक्रोशे।*
*वारंवार रडता दिसे।*
*रडण्यामाजी गदगदा हांसे।*
*जेवी लागले पिसे बहयग्रहो॥*
*रडणे हांसणे न सांडी।*
*त्याही माजी नवल आवडी।*
*अर्थाव बोधे गाणे मांडी।*
*निजात्म गोडिचे नियोगे॥*
*विसरोनि माझे तुझे।*
*सांडोनिया लोकलाजे।*
*हारिखे प्रमोचे भोजे।*
*तेणे नाचिजे निःशंक॥*
*गाणे नाचणे हासणे।*
*तो रडे कासया कारणे।*
*ऐक तीही लक्षणे।*
*तुज कारणे सांगेन॥*
*माऊली वेगळे बालक पडे।*
*जननी पहाता कोठे नातुडे।*
*भेटता ओरडू नि रडे।*
*मिठी पडे सप्रेम॥*
*देवो लाघवी नाना परी।*
*मायावी नातुडे निर्धारी।*
*तो सापडला घरीच्या घरी।*
*तेणे विस्मय करी टवकारे॥*
*देव सदा जवळीच असे।*
*त्या लागी जन कैसे पीसे।*

*पाहो जाती देशोदेशे ।*

*ते देखोनी हासे गदगदा ॥*

*देव सर्वासी अजितू ।*

*तो म्या जिंकीला भगवंत् ।*

*जगी झाला यशवंत ।*

*या लागी गात नाचत उल्हासे ॥*

*पहाता दुसरे न दिसे मज ।*

*या लागी धरू विसरला लाज ।*

*जगी झाला तो निर्लज्ज ।*

*नर्लज्जतेची बोज हे त्याची ॥*

*या परी भक्तियुक्त ।*

*होऊनिया माझे भक्त ।*

*निजानंदे गात नाचत ।*

*तेने केले पुनीत लोकत्रय ॥*

*जयाचे देखिता चरण ।*

*जडजीवा उध्दरण ।*

*ज्याचे लागता चरणरेण ।*

*पशु पाषाण उध्दरती ॥*

*कीर्तना चेनि महाघोके ।*

*नाशिली जगाची सर्व दुःखे ।*

*अवघे विश्वची हरिखे ।*

*भरिले महासुखे उचंबळत ॥*

*दर्शन स्पर्शने वचने ।*

*एक तारिले कीर्तने ।*

*एक तारिले नाम स्मरणे ।*

*या परि जग उध्दरणे उध्दवा ॥*

*विद्यायुक्त जीव मलिन ।*

*त्यासि शुध्द व्हावया जाण ।*

*माझी भक्तीची प्रमाण ।*

*होचि श्रीकृष्ण स्वये सांगे ||*

<u>आहार:-</u>

या मार्गाने साधक मार्ग क्रमणा करीत असतां भोजनात नियमितपणा आवश्यक आहे. उपाशीपोटी किंवा भरल्यापोटी साधना करू नये. भोजन साधनेच्या, कमीत कमी तीन तास आधी केले पाहीजे. भोजनात तांदूळ, गहू मूग, दूध, तूप, साखर, सातू, तूर, घोसाळे, सुरणे, पालक, वरई, काकडी आदी पदार्थ असावेत. भोजन करताना उजव्या नाकपुडीने श्वास चालू असता भोजन करावे. कारण डाव्या नाकपुडीने श्वास चालू असतां भोजन केल्यास त्याचे पचन ठीक होत नाही. साधारणतः कडू तिखट व खारट, आंबट, लोणचे, मोहरीचे तेल, मांस, मासे, हिंग लसूण, कांदा, शिळे पदार्थ पचण्यास कठीण दुर्गंधीयुक्त पदार्थ भोजनात वर्ज्य करावेत.

सद्गुरू कृपेने जे शक्तीचे साधन मिळालेले असते ते रात्रंदिवस करणे म्हणजे तप होय. जोपर्यंत ब्रम्हप्राप्ती होत नाही. तोपर्यंत हे साधन साधकाने केले पाहिजे. सातत्य असले शिवाय फलप्राप्ती होणार नाही. श्री संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात:-

*जव वरी अर्जुना | तो बोधु भेटेना मना |*
*तवंचि यया साधना | भजावे लागे || ३.१४९*

श्रध्देने हे साधन करीत राहिल्यास निश्चित मोक्षप्राप्ती होईल यात शंका नाही. जरी सद्गुरूनी हे साधन दिले तरी हे प्रत्येक शिष्याचे धारणेवर सर्व अवलंबून आहे. म्हणून कुण्डलिनी शक्तिचे जागरण सर्वाचे एक सारखे होत नाही. सर्वजण कल्याणासारखे शिष्य असतात असे नाही. तसा भाव असलेस श्रद्धा असलेस कल्याण होण्यास काय वेळ! हे साधन म्हणजे सद्गुरूनी आपले हाती दिलेले अमूल्य असे साधन आहे. हिरा आहे. त्यास हिरा समजणे किंवा काच हे शिष्याचे श्रध्देवर अवलंबून आहे. संत कबीर म्हणतात:-

*हीरा पडा बाजार में रहा धूल लपटाय |*
*बहुतक मुरख चल गये पारखी लिया उठाय ||*

<u>कर्मजाती विरहित साधन:-</u>

कर्मजाती व अवस्थांचे यास बंधन नाही. परमेश्वराची सर्व लेकरे त्यास समान आहेत. मनुष्यप्राणी हा ईश्वरी ज्ञानाचा अधिकारी आहे.

*म्हणोनि कुळ जात वर्ण | हे. अवघेचि गा अकारण |*
*एथ अर्जून माझेपण | सार्थक एक ||*
*तोचि भल तेणे भावे | मन मज आंतु येते हो आवे |*
*आलेतरी आघवे | मागील वावे ||*
*तैसे लंवचि वहाळ ओहळ | जव न पवती गंगाजळ |*
*मग होऊनि ठाकती केवळ | गंगारूप ||*
*कां खैर चंदन काष्ठे | हे विवंचना तंवचि घटे |*
*जव न घापती एकवटे | अग्निमाजी ||*

ओहळ नदी नाले जेव्हां गंगेस मिळतात, गंगेत समरस होतात तेव्हां त्यात भिन्नता भेदाभेद उरत नाही तेव्हां ते गंगारूप होतात.

सदगुरू कृपेने असे हे अमूल्य साधन प्राप्त झालेवर साधकाचे कर्तव्य आहे त्याने साधनरत झाले पाहिजे. सातत्य टिकविले पाहिजे. जेव्हां सातत्य टिकते तेव्हा शिष्याची अवस्था अंतिम ध्येयाप्रत पोहचते म्हणजे:-

*अहं निर्विकल्पो निराकार रूपी |*
*विभुर्व्याप्य सर्वत्र सर्वोंद्रियाणी |*
*सदा में समत्वं न मुक्तिर्न बंध |*
*चिदानन्द रूपं शिवोहं शिवोहं ||*

सद्गुरू कृपेने जे सुचले ते लिहिले. सद्गुरूचरणी वंदन करून हा लेख येथेच थांबवितो.

:- ओम् तत्सत :-


ghagmaharaj.guru

## आम्ही पायाचे पाषाण!

*आम्ही पायाचे पाषाण*
*आम्हा पायथ्याशी स्थान,*
*आम्ही घडवितो पाया……*
*वाटे आम्हा अभिमान!*

*आम्ही पायाचे पाषाण*
*किती आम्ही भाग्यवान,*
*मंदिराच्या पायथ्याचा*
*आम्हा लाभलासे मान!*

*आम्ही पायाचे पाषाण*
*इथें सुखेनैव राहूं,*
*अर्पूनी हे तन-मन*
*दिव्य मंदिर अुभवुं!*

*आम्ही पायांचे पाषाण*
*कुणा शिखराचा मान,*
*मंदिराच्या पुर्णतेत*
*लाभायाचें समाधान!*

*आम्ही पायाचे पाषाण*
*आस आमुच्या अंतरीं,*
*झळकावा सोनियाचा*
*उंच कळस शिखरीं!*

*आम्ही पायाचे पाषाण*
*वर डुलेल केतन...*

ghagmaharaj.guru


*आणि होईल आमुचें*
*धन्य कृतार्थ जीवन!!*

- विश्वनाथ जोशी

ghagmaharaj.guru

## शब्दांच्या पलिकडे

सुहास द. सावंत



अनंत कोटी ब्रम्हांडनायकाने असंख्य जीव निर्माण केले. या सर्व जीवांमध्ये मनुष्यप्राणी सर्वश्रेष्ठ गणला जातो कारण इतर प्राण्यांपेक्षा ज्ञानशक्ती, विचारशक्ती निसर्गतःच मनुष्याला प्राप्त झालेली आहे. या प्राप्त झालेल्या सर्वश्रेष्ठ योनीत आपले सार्थक साधून घेतले नाही तर परत त्याला लक्षावधी योनीत फिरावे लागून असंख्य यातना भोगाव्या लागतात. अशा या जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सोडवणारा कोणता मार्ग आहे, तर परमेश्वर प्राप्ती शिवाय याला दुसरा मार्ग नाही, पण परमेश्वर प्राप्त कसा होणार, या विचाराने मन भांबावून गेले.

मला समजले सद्‌गुरूवाचून माणसाला परमेश्वर प्राप्ती नाही. म्हणून मी सद्‌गुरूंच्या शोधात बऱ्याच ठिकाणी गेलो. लौकिदृष्टया गुरू म्हणून मी पुष्कळ माणसे पाहिली. परंतु माझ्या मनाचे ते समाधान करू शकले नाहीत.

नंतर कालांतराने माझ्या आत्यांच्या यजमानाने मला सद्‌गुरूंचे नांव सांगितले व ते मला म्हणाले जर का सद्‌गुरू महाराजांनी तुला दिक्षा दिली तर तुझे भाग्य उजळेल म्हणून समज. लगेच मी सद्‌गुरू माऊलीकडे गेलो. सद्‌गुरू महाराजांना पाहिले मात्र, मनाचा पक्का निर्धार झाला येथेच आपला सर्वांगीण उद्धार आहे. सद्‌गुरूकडे मी दर गुरूवारी जात असे. नंतर काही दिवसांनी मी सदगुरूपाशी दिक्षेची याचना केली. तारीख ११.१.७९ रोजीचा तो सोमवार मला अजूनही आठवतो की त्या दिवशी सद्‌गुरूंनी दिक्षा देवून मला कृतार्थ केले. माझ्या आयुष्यातील अत्यानंदाचा तो दिवस होता. सकाळी सद्‌गुरूंनी मला दिक्षेसाठी बोलाविले व डोळे मिटून बसावयास सांगितले काही मिनीटातच माझे शरीर व मन अत्यानंदाने डोलू लागले. हया स्थितीत मी कितीवेळ बसून होतो ते आठवत जाही. पण जेव्हा सद्‌गुरूंनी मला हलविले तेव्हा मी भानावर आलो. डोळ्यातून आनंदाश्रु वहात होते. त्या आनंदाश्रुनेच त्यांच्या पायावर डोके ठेवले.

अशा प्रकारे माझी साधना सुरू झाली. साधनेला बसलो, की दोन-तीन तास डोळे उघडत नसत. साधनेत असंख्य क्रिया, आसने, मुद्रा होत. ज्या माझ्या आजारापुढे डॉक्टरांचे प्रयत्न थकले होते. तो आजार माझ्या सद्‌गुरू कृपेमुळे बरा झाला. मनही आपोआप शांत होवू लागले. सदगुरू चरणी दृढ श्रध्दा असणाऱ्या साधकांस या जगात काहीही अशक्य नाही.

या सुंदर जगातील माझ्या आई-वडिलांचे की, ज्यांनी मला सर्वश्रेष्ठ जन्म दिला. माझ्या प. पू. सद्गुरूमाऊलीचे की, ज्यांनी या जन्माचा उद्धार केला. त्यांचे वर्णन मी कुठल्या शंब्दात करू, त्यांचे वर्णन करावयास माझ्याकडे शब्द नाहीत, तर ते शब्दांच्याही पलिकडचं आहे.....



ghagmaharaj.guru

## कर्मातील प्रेम महत्वाचे!

कर्म हे ज्ञानाचे पेटवण आहे. एखादा लाकडाचा ओंडका पडलेला असतो. परंतु त्या लाकडाला पेटवा, तो धगधगीत निखारा होतो. ते लाकूड व तो अग्नी यांत केवढा फरक! परंतु त्या लाकडाचाच तो अग्नी असतो. कर्मात विकर्म ओतले की ते कर्म दिव्य दिसू लागते. आई मुलाच्या पाठीवरून हात फिरविते. एक पाठ व त्या पाठीवरुन वेडावाकडा एक हात फिरला. परंतु पाठीवरून त्या साध्या कर्माने त्या मायलेकरांच्या मनात ज्या भावना उचंबळल्या, त्याचे कोण वर्णन करू शकेल? इतक्या लांबी-रुंदीच्या पाठीवरून अशा इतक्या वजनाचा एक गुळगुळीत हात फिरवावा, म्हणजे तो आनंद निर्माण होईल, असे जर कोणी समीकरण बसवू लागले तर ती थट्टा होईल. ती हात फिरविण्याची क्षुद्र क्रिया परंतु त्या क्रियेत आईचे हृदय ओतलेल आहे. ते विकर्म ओतले आहे म्हणून तो अपूर्व आनंद मिळतो. तुलसी-रामायणात एक प्रसंग आहे. राक्षसांशी लढून वानर येतात ते जखमी झालेले असतात. अंगातुन रक्त वहात असते. परंतु प्रभू रामचंद्रांनी त्यांच्याकडे नुसते प्रेमपुर्वक पाहिले आणि त्या वानरांच्या सर्व वेदना नाहीशा झाल्या. त्यावेळेस रामाने डोळे किती उघडले होते त्याचा फोटो घेऊन, त्याप्रमाणे दुसऱ्या कोणी आपले डोळे उघडून पाहिले असते तर तसा परिणाम झाला असता का? तसे करणे हास्यास्पद होईल.

- विनोबा भावे

संग्राहक:- सुरेश काशिद

## गीतेचे महत्व

मुलांना गुरूजी गीतेविषयी सांगत असत. सर्वाना आठवड्यातून एकत्र जमवून गीता शिकविणे हे गुरुजींचे आवडते काम. पाप आचरणापासून परावृत्त करून सदाचरणाकडे नेणे हा त्या मागे हेतू होता. जवळ जवळ तीन-चार महिने अशी साधना चालली होती. केवळ उजळणी पाठ म्हणून गुरुजी म्हणाले "आपण आपले काम करीत रहावे. तसेच कार्य करीत असता आपण पापापासून कसे मुक्त व्हावे" असे गितेत सांगितले आहे. या संबंधी आपण सतत ऐकत आहात तर.....

"आपण पापापासून मुक्त होण्यासाठी काय केले पाहिजे? गुरुजीनी खांकरुन प्रश्न विचारला. गुरूजींच्या प्रश्नाने वर्गात शांतता पसरली. शेवटी एक मुलगा उभा राहून म्हणाला, "आपले काम करता करता भरपूर पापही करुन ठेवले पाहिजे."

ghagmaharaj.guru

## परिमाण!

*अमेय प्रमाचे*

*प्रतिबिंब प्रतिमेचे*

*प्राक्तन प्रारब्धाचे*

*प्रतिबंध प्रसंगाचे*

*प्रमोद प्रतिक्षचे*

*प्रदशन प्रभेचे*

*प्रबंध प्रजापतिचे*

*प्रश्न प्रतिष्ठेचे*

*प्रकार प्रचाराचे*

*प्रकरण प्रभावाचे*

*प्राधान्य प्रधानाचे*

*प्रेरक प्रक्षोभाचे*

*प्रेक्षक प्रकोपाचे*

*प्रवचन प्रज्ञेचे*

*प्रतीत प्रतिज्ञेचे*

*प्रसन्न प्रतिभेचे*

*प्रगटन परमेश्वराचे*

सेवानंद

ghagmaharaj.guru

## चक्राचे रहस्य

*मोठे चक्र, छोटे चक्र, आणि चक्रात चक्र |*
*सरळ आहे चाल, नाहो कोठे वक्र || १ ||*

*चक्राकार धरती फिरते, फिरे चंद्र सूर्य |*
*उगवणे मावळणे, हेच नित्य त्यांचे कार्य || २ ||*

*चक्राच्याच गतीत फिरते हे सर्व जीवन |*
*नाही कुणाचे फिरणे, एकमेकांसमान || ३ ||*

*एकामध्ये एक गुंतवणूकच त्यांची सारी |*
*फिरण्याची परी प्रत्येकाची रीत आहे न्यारी || ४ ||*

*नाही चुकत ताळतंत्र अहोरात्र आहे फिरत |*
*त्याच्या गतीने आहेत, सर्व जीवनें फुलत || ५ ||*


*मूळचक्र शोधण्यासाठी थकले सर्वजण |*
*ज्याच्यावर आहे फिरणे सर्वांचे अवलंबून || ६ ||*

*साधू, संत, वैज्ञानिक गुंतले याच चक्रात |*
*हीच तर आहे किमया मायेच्या तंत्रात || ७ ||*

विश्वंभर

ghagmaharaj.guru

## प पू. सद्‌गुरु श्री सिध्दयोगेश्वर महाराज एकसष्ठी समारंभ समितीतर्फे



* स्मरणिकेला उदार अंतःकरणाने दिलेल्या सर्व जाहिरातदारांचे
* समितीला सहकार्य करणाऱ्या बाबांच्या सर्व साधकांचे.
* स्मरणिकेत अनुभवाबाबत लेख देणाऱ्या लेखक / साधकांचे
* प. पू. सद्‌गुरु श्री. सिध्दयोगेश्वर महाराज व त्यांच्या पत्नी सौ. आईसाहेब यांनी दिलेल्या प्रेम व आशिर्वादाबद्दल अंतःकरणपूर्वक आभारी आहोत.